नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १९६ * * नागपूर * शुक्रवार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## बूट फेकणाऱ्या वकिलाविरुद्ध अवमान खटला

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६ :** भारताचे सरन्यायाधीश बीआर गवई यांच्यावर बूट फेकणाऱ्या वकिलाविरुद्ध अवमानना खटला सुरू करण्यास ॲटर्नी जनरलनी परवानगी दिली आहे, अशी माहिती गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाला देण्यात आली. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता आणि सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे प्रमुख विकास सिंह यांनी न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमल्या बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणीसाठी अपील केले आहे. सिंह म्हणाले की, ६ ऑक्टोबर रोजी घडलेल्या या घटनेने सोशल मीडियावर खळबळ उडाली आहे. हे सर्वोच्च न्यायालयाच्या अखंडतेला आणि प्रतिष्ठेला धक्का पोहोचवत आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# बहारदार बिहार

बिहार विधानसभेची निवडणूक आता तोंडावर आलेली आहे. अजूनही एनडीए आणि इंडिया आघाडीमध्ये चांगलीच धुसफुस सुरू असल्याचे दिसत आहे. मुख्यमंत्रीपदावर आरूढ असलेल्या नितीश कुमार यांची जदयु आणि भारतीय जनता पक्ष या दोघांमध्ये मौन खडाजंगी सुरू आहे. नितीश कुमार यांच्या पक्षाचे लल्लन सिंग, संजय झा आणि अमित कुमार चौधरी ही मंडळी सध्या केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची आज्ञाधारक झालेली आहेत, असे बोलले जाते. गेल्या अनेक दिवसांपासून नितीश कुमार यांच्या नावाने वेगवेगळ्या वावड्या उठवल्या जात होत्या. ते सध्या निष्क्रिय आहेत, नितीश कुमार आजारी आहेत, असा प्रचार वारंवार होत होता. दिल्लीत बसून अमित शहा यांनी जदयूच्या ज्या तीन कारभाऱ्यांसोबत जागावाटप जाहीर केले. त्यामध्ये भारतीय जनता पक्ष आणि जदयु यांनी प्रत्येकी १०१ जागा लढवाव्यात. चिराग पासवान यांनी २९ जागा आणि इतर दोन पक्षांना प्रत्येकी सहा/ सहा जागा असा फामूर्ला ठरला आणि तिथेच नेमकी ठिणगी पडली. नितीश कुमार यांना भारतीय जनता पक्षापेक्षा किमान एक जागा जास्त हवी होती. तसेच चिराग पासवान यांना जास्तीत जास्त १५ जागा द्याव्यात असे नितीशजींचे म्हणणे होते. मात्र आम्ही वर म्हटल्याप्रमाणे नितीशजींचे तीन कारभारी अमित शाह यांच्या प्रेमात पडल्यामुळे त्या कारभाऱ्यांनी पडत्या फळाची आज्ञा म्हणून स्वीकारलेला फार्मूला नितीश कुमार यांना पसंत पडला नाही. त्यामध्ये जदयूने जिंकलेल्या अनेक जागा चिराग पासवान यांना देण्यात आलेल्या आहेत. यामुळे असेही म्हणतात की नितिशजींनी त्या तिघांना चांगलेच धारेवर धरलेले आहे. आता जागांमध्ये बदल होणे शक्य नाही असेही सांगण्यात आले आहे. त्यानंतर नितीशजींच्या निष्ठावंतांनी मुख्यमंत्री पदाचे उमेदवार म्हणून नितीशजी यांचे नाव जाहीर करा अशी मागणी केलेली आहे. यादरम्यान नितीशजी यांचे जुने मित्र आणि सहकारी लालूप्रसाद यादव यांचीही चर्चा झाल्याचेही वृत्त आहे. सध्या तरी एनडीएचे असे आहे तर जनसुराज्य पक्षाचे प्रशांत किशोर यांनी अनेक उमेदवारांची घोषणा केलेली आहे आणि ते निश्चितपणे एनडीएची मते खातील. दरम्यान लालूजींनी आपल्या बिहारी भाषेत आपल्या मुख्यमंत्री मित्राला, अऊर कितना अपमान झेलोगे, भईया हद होती है.. असे विचारल्याचेही बोलले जात आहे. तिकडे इंडिया आघाडी मध्येही तिकिटांबाबत चांगलेच घमासान सुरू आहे. राहुल गांधी यांच्या पदयात्रेमुळे काँग्रेसला नवसंजीवनी मिळालेली आहे त्यामुळे तिथेही रणकंदन सुरू आहे. लालूप्रसाद हे आजही जदयूचे लोकप्रिय चेहरा आहेत. त्यांच्याजवळ आजही कार्यकर्ते आहेत. तसे काँग्रेसचे अजिबात नाही. सेनापती कितीही बलवान असला तरी त्याचे शिलेदार आणि सैन्य विस्कटलेले असले तर विजय कसा मिळवू शकेल. त्यामुळेच काँग्रेसला देण्यात येणा?या जागांबद्दल तिथेही चर्वितचर्वण सुरू आहे. तिकडे अमित शहा यांना आपला मुख्यमंत्री बनवायचा आहे. इकडे लालूपुत्र तेजस्वी यालाही तेजाने तळपायचे आहे. पण बिहारचे राजकारण समजणे हे कोणाही येऱ्या-गबाळ्याचे काम नाही कारण या राज्यातील जातीय समीकरणे फक्त आणि फक्त नितीश कुमार आणि लालूप्रसाद या दोघांनाच ठाऊक आहेत. या दोघांजवळ प्रत्येकी १६ ते २० टक्के मतांची हमी असते म्हणूनच भारतीय जनता पक्षाला नितीश कुमार हवे होते. पण आता नितीश कुमार असेच कोप भवनात बसले. तर भारतीय जनता पक्षाच्या जागा अर्ध्या होतील अशी स्थिती आहे. आज दुपारपर्यंत तरी नितीश कुमार कोप भवनातून बाहेर आलेले नाहीत. नामनिर्देशन होईपर्यंत सर्वच पक्ष आपापल्या तो?यात आहेत आणि असतीलही. या पार्श्वभूमीवर लालूजींचे गणित पाहून ओवेसी, आम आदमी पार्टी, वगैरे सारखे पक्षांचे धुरीण कुठे कुठे, काय काय करतील हे सांगता येत नाही. त्याचा अजिबात थांगपत्ता कोणालाच लागणार नाही. एकूणच नितीश कुमार यांच्या क्रोधामुळे भविष्यकाळात काहीही घडू शकते. हे भाजपसह सगळ्यांनाच ठाऊक आहे आणि त्यांचा पक्ष आता संपल्यात जमा आहे, अशा वावड्या उठवणाऱ्यांना नितीशचे बळ आता दिसून आलेलेच आहे. म्हणजेच, बिहारची ही निवडणूक राजकीय दृष्ट्या मोठी बहारदार होईल, यात अजिबात शंका नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## कौशल्य विकासाच्या माध्यमातून
# समर्थ भारताची उभारणी

### सिम्बायोसिसच्या पदवीदान समारंभसत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचे प्रतिपादन



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १६ :** आज जग वेगाने बदलत असून प्रत्येक क्षणाला नवा विचार, नवी व्यवस्था, नवे तंत्रज्ञान समोर येत असताना अशा अनिश्चित जगात आपले कौशल्य आपल्या मदतीला येऊ शकते. त्यामुळे सर्वांनी मिळून कौशल्याच्या माध्यमातून देशाला पुढे नेण्याची गरज आहे. सिम्बायोसिस विद्यापीठदेखील या दिशेने काम करत आहे, असे गौरवोद्गार संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काढले.

सिम्बायोसिस स्किल्स ॲंड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या सहाव्या पदवीदान समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकातदादा पाटील, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, लष्कराच्या दक्षिण कमांडचे प्रमुख ले.जनरल धीरज सेठ, विद्यापीठाचे कुलपती डॉ. शां. ब. मुजुमदार, प्र-कुलगुरु डॉ. स्वाती मुजुमदार, श्रीमती संजीवनी मुजुमदार, सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या प्र-कुलगुरू डॉ. विद्या येरवडेकर उपस्थित होते.

कौशल्य शिक्षण देशाच्या उभारणीसाठी महत्त्वाचे असून कौशल्यप्राप्त व्यक्ती निर्मितीसाठी योगदान देतो. शिकलेल्या बाबींना जीवनात कसे आणावे हे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविणे हेच आजच्या शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे, असे सांगत राजनाथ सिंह पुढे म्हणाले, देशात कौशल्य विकास क्षेत्रातील प्रगती लक्षात घेता आजची पिढी कौशल्य प्राप्त करून पुढच्या युगातील तंत्रज्ञानाची पिढी घडवेल असा विश्वास वाटतो. मात्र कौशल्यासोबत संवेदनशील राहून समाजासाठी त्याचा उपयोग करणे आवश्यक आहे.

कुलपती डॉ. मुजुमदार म्हणाले, देशाला रोजगारक्षम कुशल युवकांची आवश्यकता आहे. देशातील तरुणाईला देशाच्या विकासाशी जोडण्यासाठी त्यांना कौशल्य प्रशिक्षण देणे आवश्यक असून त्यासाठी कौशल्य विकास शिक्षणाला चालना देण्याची गरज आहे. स्नातकांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी केवळ रोजगाराचा विचार न करता जगाच्या कल्याणासाठी ज्ञानाचा उपयोग करावा.

### महाराष्ट्राला संरक्षण तंत्रज्ञानाचे हब बनविणार - फडणवीस

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कौशल्याचे महत्व लक्षात घेऊन देशात एक कौशल्य विकासाचे अभियान सुरू केल्यावर सिम्बायोसिसने कौशल्य विद्यापीठाची कल्पना समोर आणली. सिम्बायोसिसने शिक्षणासोबत मूल्यांवर भर दिला असल्याने या क्षेत्रासाठी आंतरराष्ट्रीय स्तराच्या पायाभूत सुविधा उभ्या केल्या. येत्या दोन ते तीन वर्षात जगातील अग्रगण्य कौशल्य विकास विद्यापीठात सिम्बायोसिसची गणना होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. येत्या काळात या क्षेत्रातील गुंतवणुक, उत्पादन आणि मनुष्यबळ निर्मिती राज्यात होईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. स्नातकांनी शिक्षणाच्या व्यवस्था उभ्या करणाऱ्या समाजासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही फडणवीस यांनी केले.

## गुजरातच्या सर्व १६ मंत्र्यांचा राजीनामा

■ **वृत्तसंस्था, गांधीनगर, दि. १६ :** गुजरात सरकारमधील सर्व मंत्र्यांनी गुरुवारी राजीनामा दिला. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल लवकरच राज्यपालांना मंत्र्यांचे राजीनामे सादर करतील. नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी समारंभ शुक्रवारी सकाळी ११:३० वाजता गांधीनगर येथे होणार आहे.

### नव्या मंत्रिमंडळाचा आज शपथविधी

सरकारमधील १६ मंत्र्यांपैकी आठ मंत्री बदलण्याची शक्यता आहे. सध्याच्या गुजरात मंत्रिमंडळात मुख्यमंत्री पटेल यांच्यासह १७ मंत्री आहेत. यापैकी आठ मंत्री कॅबिनेट दर्जाचे मंत्री आहेत आणि तेवढेच राज्यमंत्री (एमओएस) आहेत. भाजपच्या सर्व आमदारांना आणि मंत्र्यांना दोन दिवस गांधीनगरमध्ये राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मंत्रिमंडळात ज्या आमदारांचा समावेश होण्याची अपेक्षा आहे त्यांना फोनवरून कळवण्यात आले आहे. भाजपचे केंद्रीय नेते अमित शहा आणि जेपी नड्डा शपथविधी समारंभाला उपस्थित राहणार आहेत.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा शुक्रवारी सकाळी गुजरातमध्ये पोहोचतील. सामान्यतः जेव्हा मंत्रिमंडळ विस्तार होतो तेव्हा भाजप हायकमांडमधील इतके नेते उपस्थित नसतात, त्यामुळे सरकारमध्ये मोठे बदल होण्याचे संकेत आहेत.

गांधीनगरमधील महात्मा मंदिरात शपथविधी सोहळ्याची तयारी सुरू झाली. नवीन मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री देखील असू शकतो. सध्याच्या ७ ते १० मंत्र्यांना वगळून ५ ते ७ मंत्र्यांची पुनरावृत्ती करण्याची चर्चा आहे. नवीन चेहऱ्यांमध्ये अर्जुन मोढवाडिया, अल्पेश ठाकोर, सीजे चावडा आणि काँग्रेसमधून आलेले हार्दिक पटेल यांना संधी मिळण्याची शक्यता आहे.

सौराष्ट्रातील जयेश राडाडिया आणि जितू वाघानी यांना मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची शक्यता आहे. पाटीदारांवर विशेष लक्ष दिले जाईल. शिवाय, उत्तर गुजरातमधील ठाकोर समुदायातील एका नेत्यालाही महत्त्वाचे खाते मिळू शकते.

## चिथावणी दिल्यास लष्करी कारवाई

### पाक संरक्षण मंत्र्यांची धमकी



■ **वृत्तसंस्था इस्लामाबाद, दि. १६ :** पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ म्हणाले की तालिबानचे निर्णय दिल्लीत घेतले जात आहेत आणि अफगाणिस्तान भारतासाठी प्रॉक्सी युद्ध लढत असल्याचा आरोप केला.

जिओ न्यूजशी बोलताना आसिफ तालिबान सोबतच्या युद्धबंदीवर म्हणाले, ही युद्धबंदी टिकेल की नाही याबद्दल मला शंका आहे, कारण अफगाण तालिबानला दिल्लीकडून पाठिंबा मिळत आहे.

जर पाकिस्तानला चिथावणी दिली तर लष्करी कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला. आसिफ म्हणाले, आमच्याकडे प्रत्युत्तर देण्याची पूर्ण क्षमता आहे. जर त्यांनी युद्ध वाढवले तर आम्ही हल्ला करू. पण आम्ही चर्चेसाठी देखील तयार आहोत. तालिबानी सैनिकांनी टॅंक लुटल्याच्या बातम्या अफवा असल्याचे सांगत पाकिस्तानी मंत्र्यांनी त्या फेटाळून लावल्या.

## इलेक्ट्रिक ट्रक निर्मितीसाठी
# राज्य शासनाचे सर्वतोपरी सहकार्य



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १६ :** ब्ल्यू एनर्जी मोटर्स निर्मित स्वॅपेबल बॅटरी असलेला इलेक्ट्रिक ट्रक म्हणजे रिव्होल्यूशन ऑन व्हील असून त्यातील तंत्रज्ञान आणि कार्यक्षमता लक्षात घेता येत्या काळात या क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विस्तार होईल. राज्य शासन मुंबई-पुणे इलेक्ट्रीक कॉरिडॉरसारखे अन्य कॉरिडोर करण्यासाठी सर्व सहकार्य करेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

निघोजे येथील ब्ल्यू एनर्जी मोटर्स ईव्ही ट्रकच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला आ. अमित गोरखे, महेश लांडगे, बाबा काळे, पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, ब्ल्यू एनर्जी मोटर्सचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक अनिरुद्ध भुवलकर, धीरेंद्र शास्त्री बागेश्वरबाबा, प्रशांत रुईया, अंशुमन रुईया, अमित बाजाज, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे आदी उपस्थित होते.

ब्ल्यू एनर्जी मोटर्सने इलेक्ट्रीक वाहन क्षेत्रात नवी क्रांती केली असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ब्ल्यू एनर्जीने अत्यंत उत्तम आणि 'मेड इन इंडिया' ट्रकची निर्मिती केली आहे. ही बाब देशाचे 'मेक इन इंडिया'चे स्वप्न साकार करण्यासारखी आहे.

## मनसेला सोबत घेण्यास काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचा विरोध?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :** राज ठाकरे यांच्या मनसेला महाविकास आघाडीत घेण्यावरून काँग्रेस व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात खटके उडत असल्याचे चित्र आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मनसेला सोबत घेण्याच्या मुद्यावर कथितपणे नकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या प्रकरणी थेट काँग्रेस हायकमांडकडे तक्रार केल्याची माहिती आहे.

दुसरीकडे, खा. संजय राऊत यांनी यावर स्पष्टीकरण दिले आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी आमचा उत्तम संवाद आहे. त्यामुळे एखाद्या विषयावर त्यांच्या केंद्रातल्या नेत्यांना बोलण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, अशा शब्दांत खासदार हायकमांडकडे तक्रार केल्याचा दावा फेटाळून लावला आहे.

## भाजपा मंत्र्यांना कडक समज

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, भाजपमध्ये संघटनात्मक स्तरावर मोठी सक्रियता वाढली आहे.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि सहसंघटन मंत्री शिवप्रकाश यांनी भाजपच्या मंत्र्यांसोबत बैठक घेतली. रवींद्र चव्हाण यांनी मंत्र्यांसोबतच्या बैठकीत पक्षाकडे लक्ष द्या, तुमच्या कामाचे मूल्यांकन सुरू आहे, असा इशारा दिला आहे.

## डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव असलेले आधार कार्ड!
# सत्ता आणण्यासाठी खोट्या मतदारांची नोंदणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेत निवडणूक आयोगावर निशाणा साधला आहे. यावेळी त्यांनी स्क्रीनवर मतदारांची खोटी नावे टाकण्यात आल्याचे सांगत थेट अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष यांच्या नावे देखील आधार कार्ड असल्याचे दाखवले.


रोहित पवार म्हणाले, महाविकास आघाडीचे सर्व नेते व त्यांच्यासोबत मनसे अध्यक्ष राज ठाकरे साहेब हे निवडणूक आयोगाकडे गेले होते. जी काही यादी आहे त्यावर आमचा आक्षेप आहे. काही महिन्यांपूर्वी राहुल गांधी यांनी मत चोरीचा मुद्दा काढला होता. २०२४ च्या लोकसभेचा जो काही निकाल एनडीएच्या विरोधात लागला होता. केंद्रात सत्ता आणण्यासाठी त्यांना बरीच समीकरणे जुळवावी लागली होती. महाराष्ट्रात सत्ता आणण्यासाठी त्यांनी खोट्या मतदारांची नोंदणी केल्याचा आरोप पवारांनी केला.



रोहित पवारांचा खळबळजनक दावा

पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले, कर्जत जामखेड मतदारसंघात लोकसभा ते विधानसभा २०२४ या ६ महिन्यांच्या कालावधीत १४ हजार ११३ मतदार वाढले. ३१ ऑगस्ट ते १ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत प्रति महिना ४८९१ मतदार वाढले. त्यामुळे निवडणूक आयोग लोकशाहीला मारते की काय? असा प्रश्न आम्हाला पडला आहे.

रोहित पवारांनी प्रात्यक्षिक दाखवत मतदारसंघातील पत्ता टाकला, यात त्यांनी 'पांढरा बंगला' असा कर्जत मधला पत्ता टाकायला सांगितला, नंतर संपूर्ण तपशील भरायला सांगितला. तारीख १८२५ मधली टाकली. नंतर त्यांनी फेटा असलेला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा फोटो अपलोड केला आणि लगेच डोनाल्ड तात्या ट्रम्प या नावाने संपूर्ण आधार कार्डच तयार झालेले प्रात्यक्षिक स्क्रीनवर दाखवले. यावरून खोटी माहिती कशी टाकली जाते ते रोहित पवार यांनी दाखवले.



## मुंबई एसटी बँकेच्या मीटिंगमध्ये राडा

### गुणरत्न सदावर्ते आणि शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये फ्री स्टाईल



**मुंबई :** राज्य परिवहन (एसटी) को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाची बैठक बुधवारी मुंबई सेंट्रल येथे आयोजित केली होती. यावेळी भ्रष्टाचाराच्या आरोपातून दोन गटात हाणामारी झाली. या प्रकरणी नागपाडा पोलीस ठाण्यात रात्री उशिरा तक्रार दाखल करण्यात आली. एसटी कर्मचाऱ्यांची एसटी को-ऑपरेटिव्ह बँक आशिया खंडातील सर्वात मोठी को-ऑपरेटिव्ह बँक म्हणून ओळखली जाते. मुंबई सेंट्रल येथे बुधवारी एसटी को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत अडसूळ गटातील संचालकांनी सदावर्ते गटातील संचालकांचा बँकेत चालवलेला भ्रष्टाचार बाहेर काढल्याने वाद झाला. या वादाचे रुपांतर हाणामारीत झाले. बाहेरील महिलांना बोलवून संचालक मंडळातील सदस्यांना मारहाण करण्यात आली. मारहाण प्रकरण नागपाडा पोलीस ठाण्यात पोहोचले असून याप्रकरणी पुढील कार्यवाही सुरू आहे. एसटी बँकेत गुणरत्न सदावर्ते यांचे पॅनल निवडून आले आहे. मात्र, त्यानंतर त्यांनी अनेक गैरव्यवहार केले. त्याला कंटाळून त्यांचे काही सदस्य आमच्या बाजूला आले. त्यांच्या या कारभारामुळे लोकांना आता सुरक्षित वाटत नाही. तसेच त्यांनी अनेक वेगवेगळ्या माध्यमातून भ्रष्टाचार केला आहे. एसटी बँकेत १२ कोटींचे एक सॉफ्टवेअर त्यांनी थेट ५२ कोटींना खरेदी केले. या आर्थिक भ्रष्टाचाराबाबत बैठकीत चर्चा सुरू झाली. मात्र, यावरून गुणरत्न सदावर्ते यांच्या पॅनेलमधील सदस्यांनी वाद घालण्यास सुरुवात केला. तसेच हे नियोजित कट कारस्थान असल्याने, बाहेरून महिलांना आणून हाणामारी करण्यात आली.

## क्रीडा धोरणात एक खेळ एक संघटनेचा समावेश करा : ॲड. माणिक कोकाटे



**मुंबई :** जागतिक स्तरावर राष्ट्राची उत्कृष्टता साध्य करण्यासाठी, क्रीडा व आर्थिक आणि सामाजिक विकास तसेच क्रीडा लोकचळवळ वाढविण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने खेलो भारत नीति 2025 धोरण तयार केले आहे. या धोरणाच्या धर्तीवर राज्य क्रीडा धोरण तयार करण्यात यावे, यासाठी समिती स्थापन करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिले. यामध्ये एक खेळ एक संघटनेचा प्राधान्याने समावेश करावा असेही त्यांनी स्पष्ट केले. राज्याचे क्रीडा धोरण तयार करण्याच्या प्रक्रियेबाबत आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार संजय बनसोडे, आमदार विजयसिंह पंडीत, आयुक्त शीतल तेली, उपसचिव सुनील पांढरे आणि स्काऊट गाईडचे प्रतिनिधी उपस्थित होते. क्रीडा मंत्री ॲड.माणिकराव कोकाटे म्हणाले, क्रीडा धोरणात प्राथमिक व माध्यमिक शालेय शिक्षणात क्रीडा उपक्रमांचा समावेश, शालेय व जिल्हास्तरीय क्रीडा प्रतियोगितांना प्रोत्साहन देणे, राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 च्या धर्तीवर बालपणापासून शारीरिक शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी यासाठी उपक्रम राबविणे, क्रीडा स्पर्धा आयोजित करणे, क्रीडा प्रोत्साहन संस्थांची निर्मिती करणे आदि विषयांचा समावेश करावा. तसेच, आमदार खेळाडू, नैपुण्य प्राप्त खेळाडू, प्रशिक्षक, संघटनांचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी, पत्रकार, क्रीडा तज्ज्ञ यांचा क्रीडा धोरण समितीमध्ये समावेश करावा. तसेच, खेळाडूंचे याबाबत ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात याव्यात, अशी सूचनाही मंत्री ॲड. कोकाटे यांनी केली.

## शाळांमधील सुविधांसाठी सीएसआर निधीचा उपयोग व्हावा : दादाजी भुसे



**मुंबई :** राज्यात एक लाखांहून अधिक शाळांमधून दोन कोटींपेक्षा अधिक विद्यार्थी शालेय शिक्षण घेतात. या विद्यार्थ्यांना राष्ट्र प्रथम या संकल्पनेवर आधारित गुणवत्तापूर्ण आणि आनंददायी शिक्षण दिले जाते. शासनाच्या माध्यमातून शाळांमध्ये विविध सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. याचबरोबर विविध उद्योग सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या (सीएसआर) माध्यमातून देखील सहकार्य करतात. यामध्ये सुसूत्रता आणून शाळा आणि विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार हा निधी वापरला जावा, असे आवाहन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले. आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून अनेक उद्योग सीएसआर निधीच्या माध्यमातून शाळा आणि विद्यार्थ्यांना सहकार्य करतात. यामध्ये सुसूत्रता येण्याच्या उद्देशाने विविध उद्योगांच्या सीएसआर प्रमुखांशी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत संवाद साधला.

# सायबर सुरक्षेबाबत जागरूकतेची गरज

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :

सायबर सुरक्षा आणि डिजिटल साक्षरतेबाबत जागरूक राहणे ही बाब आता केवळ लक्झरी नाही, तर काळाची गरज बनली आहे. शासन, प्रशासन आणि सर्वसामान्य नागरिकांनी याबाबत सतत अद्ययावत राहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले.

नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर आणि माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला महाआयटीचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर, अतिरिक्त पोलिस महासंचालक (सायबर) यशस्वी यादव, एनआयसी दिल्लीचे उप महासंचालक डॉ.राजेशकुमार पाठक, बीएआरसीचे वरिष्ठ वैज्ञानिक जीजी जोसेफ आणि एनआयसी महाराष्ट्राच्या सपना कपूर तसेच विविध राज्याचे एनआयसीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. शेलार म्हणाले की, आपल्या दैनंदिन जीवनात आणि प्रशासकीय कामकाजात डिजिटल क्रांतीमुळे आमूलाग्र बदल झाले आहेत. आज मंत्रालयात काम करणारा प्रत्येक अधिकारी डिजिटल प्लॅटफॉर्मवर कार्यरत आहे. त्यामुळे सायबर सुरक्षा आणि आपल्या जबाबदाऱ्या यांचा थेट संबंध निर्माण झाला आहे. अज्ञानामुळे केलेल्या चुकीसाठीही कायदा माफ करत नाही. त्यामुळे सायबर सुरक्षेबाबत अद्ययावत राहणे आवश्यक आहे.

डिजिटल व्यवहारांमध्ये भारत आज जगात अग्रस्थानी आहे. प्रत्येकजण डिजिटल पेमेंट स्वीकारत आहे. भारत आज सर्वाधिक आणि सर्वात सुरक्षित डिजिटल व्यवहार करणारा देश बनला आहे. पण या प्रगतीसोबतच सायबर गुन्ह्यांची जटिलता आणि प्रमाणही वाढले असल्याचे मंत्री ॲड.शेलार यांनी सांगितले.




**ॲड. आशिष शेलार यांचे प्रतिपादन**

सायबर हल्ल्यांपासून वाचण्यासाठी फक्त तांत्रिक कौशल्य नव्हे तर योग्य मानसिकता विकसित करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाने २०१६ पासून सायबर सुरक्षेसाठी सक्षम पायाभूत व्यवस्था उभारली आहे. राज्यात २४ तास कार्यरत कमांड अँड कंट्रोल सेंटर, सायबर हेल्पलाइन आणि मोबाईल ॲप उपलब्ध आहेत. तसेच टेक्नॉलॉजी असिस्टंट इन्व्हेस्टिगेशन युनिट आणि एआय आधारित डिटेक्शन प्रणालीही कार्यरत आहे. महाराष्ट्र हे कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम स्थापन करणारे पहिले राज्य ठरले असल्याचेही मंत्री ॲड.शेलार यांनी अभिमानाने सांगितले.

यावेळी मंत्री ॲड.शेलार यांनी डीपफेक तंत्रज्ञानामुळे उद्भवणाऱ्या गंभीर धोक्यांकडेही लक्ष वेधले. डीपफेकमुळे केवळ व्यावसायिक नव्हे, तर वैयक्तिक आणि कौटुंबिक आयुष्यही उद्ध्वस्त होऊ शकते. त्यामुळे त्याच्या ओळख आणि प्रतिबंधासाठी प्रत्येकाने सतर्क राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

**सायबर सुरक्षेच्या युगात एक क्लिकवर पोलीस मदत**

अतिरिक्त पोलिस महासंचालक यशस्वी यादव डिजिटल युगात सर्व सेवा एका क्लिकवर उपलब्ध होत असताना पोलीस सेवा देखील तितक्याच सहजतेने उपलब्ध व्हावी यासाठी नागरिकांना सायबर मदतीसाठी हेल्पलाइन क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहे. या हेल्पलाइनवर सायबर क्षेत्रातील उत्कृष्ट तज्ञ व अधिकारी अत्याधुनिक सॉफ्टवेअरच्या सहाय्याने तत्काळ मदत करतात, असे महाराष्ट्र सायबरचे अतिरिक्त पोलिस महासंचालक यशस्वी यादव यांनी सांगितले.

## नमो' नावाच्या १० योजना बंद

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने तत्कालीन मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 2023 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने सुरू केलेल्या तब्बल 10 योजना बंद केल्या आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा आमदार अंबादास दानवे यांनी हा दावा केला आहे. 'महाशक्ती'ने शिंदे गटाला बहुदा दैवत आणि देवघर बदलण्याच्याच अटींवर चिन्ह आणि नाव दिले होते, अशी टीका त्यांनी या प्रकरणी केली आहे.

राज्य सरकारने एकनाथ शिंदे यांनी जाहीर केलेल्या काही योजना यापूर्वीच बंद केल्या आहेत. यात आनंदाचा शिधा याच्यासह इतर काही योजनांचा समावेश आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर आलेल्या आर्थिक भारामुळे या योजना बंद केल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू आहे. या प्रकरणी सरकारला विरोधकांच्या चौफेर टीकेला सामोरे जावे लागत असताना आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने एकनाथ शिंदे यांनी 17 सप्टेंबर 2023 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त जाहीर केलेल्या तब्बल 10 योजना बंद करण्याचे धाडस दाखवले आहे.

अंबादास दानवे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सरकारने नमो महिला सशक्तीकरण योजना, नमो कामगार कल्याण योजना, नमो शेततळे अभियान, नमो गरीब व मागासवर्गीय सन्मान योजना, नमो ग्राम सचिवालय योजना, नमो आदिवासी स्मार्ट शाळा योजना, नमो दिव्यांग शक्ती योजना, नमो क्रीडा मैदान व उद्यान योजना, नमो शहर सौंदर्यीकरण योजना व नमो तीर्थस्थळ व गडकिल्ले संवर्धन योजना बंद केल्या आहेत. एकनाथ शिंदे यांनी 17 सप्टेंबर 2023 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त या योजना घोषित केल्या होत्या. विषय हा आहे, हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे दोन जन्मदिवस शिंदेंनी मुख्यमंत्री म्हणून साजरा केले. तेव्हा या कटप्रमुखांना अशा योजना घोषित कराव्या वाटल्या नाहीत? का बरं? शिंदे गटाला 'महाशक्ती'ने बहुदा दैवत आणि देवघर बदलण्याच्याच अटींवर चिन्ह आणि नाव दिले होते.

## ठाणे जिल्ह्यात भाजप-शिवसेनेत रंगला कलगीतुरा

## एकनाथ शिंदे यांची स्वबळाची तयारी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :

महाराष्ट्राच्या राजकारणात महायुतीच्या गोटात पुन्हा एकदा अस्वस्थता वाढताना दिसत आहे. ठाणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने स्वबळावर लढण्याची चाचपणी सुरू केली असताना, आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाण्यातच शिवसेनेच्या नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांकडून ठाणे महापालिकेत शिवसेना स्वबळावर लढली पाहिजे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. त्यामुळे महायुतीतील दोन प्रमुख घटक, भाजप आणि शिंदे गट यांच्यातील संघर्ष आता उघडपणे दिसू लागला आहे.

आनंद आश्रमात खासदार नरेश मस्के यांच्या उपस्थितीत ठाण्यातील शिवसेना नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक पार पडली. ही बैठक महापालिका निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी आयोजित करण्यात आली होती. मात्र,



बैठकीचा सूर भाजपविरोधी ठरला. या बैठकीत अनेक नगरसेवकांनी भाजपकडून ठाण्यातील विकासकामांमध्ये अडथळे आणले जात असल्याची तक्रार केली. काही पदाधिकाऱ्यांनी स्पष्टपणे सांगितले की, भाजपचे नेते ठाण्यातील प्रकल्पांमध्ये हस्तक्षेप करत आहेत आणि शिवसेनेचे श्रेय हिसकावून घेत आहेत. मस्के यांनी परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न केला असला तरी नाराज पदाधिकाऱ्यांनी स्वबळावर लढण्याशिवाय पर्याय नाही, असे स्पष्ट सांगितले, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

## पाणंद रस्ते कामांना गतीसाठी आमदारांच्या समितीला अधिकार : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :

शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासन कार्यवाही करत असून दिवाळीपूर्वी लाभ देण्यासाठी विविध निर्णय घेण्यात येत आहेत. शेतकरी व ग्रामीण भागासाठी 'बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना' महत्त्वाची आहे. यातील पाणंद रस्ते कामांना गती मिळावी यासाठी आमदारांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या विधानसभा मतदारसंघ स्तरावरील समितीला अधिकार देण्यासाठी तरतूद करण्यात येईल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.



बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना राज्यस्तरीय समितीची बैठक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीस रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आमदार सर्वश्री संजय बनसोडे, सत्यजित देशमुख, दिलीप बनकर, सुमित वानखेडे, हेमंत पाटील, राजेश क्षीरसागर, विठ्ठल लंघे, अभिमन्यू पवार, उमेश यावलकर, समीर कुणावर, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले उपस्थित होते. आमदार रणधीर सावरकर दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, विधानसभा मतदारसंघस्तर समितीला योजनेतून करण्यात येणारे रस्ते निश्चित करणे याचे अधिकार देण्यात येईल. यादृष्टीने तरतूद करण्यात येईल. या समितीने रस्त्यांच्या कामांची यादी संबंधित यंत्रणेस द्यावी. सीएसआर व विविध विभागाच्या योजनेतून उपलब्ध होणाऱ्या निधीतून कामे करण्यात येतील. स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करण्यात येईल. पाणंद रस्ते काम करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत देखील कामे करण्यात येतील. यासाठी शासन निर्णय काढण्यात येईल.

# दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सुरक्षेबाबत काळजी घ्यावी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :

दिपावली सण साजरा करताना आनंदाबरोबरच सुरक्षिततेची काळजी घेणे अत्यावश्यक आहे. दिवाळीच्या काळात घरगुती आग, फटाक्यांमुळे होणारे अपघात, शॉर्टसर्किट्स तसेच गर्दीच्या ठिकाणी गोंधळ यासारख्या घटनांची शक्यता असल्याने नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेऊन दीपावली सण साजरा करावा, असे आवाहन राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून करण्यात आले आहे.

दीपावलीच्या कालावधीत दिवे, मेणबत्त्या आणि फटाके वापरताना घरगुती आगी लागण्याचा धोका वाढतो. फटाके फोडताना



मुलांना भाजणे किंवा इतर इजा होऊ शकते. तसेच, विद्युत सजावट करताना निष्काळजीपणा केल्यास शॉर्टसर्किट्स होऊन आग लागण्याची शक्यता असते. सार्वजनिक

**राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचे नागरिकांना आवाहन**

ठिकाणी होणारी गर्दी आणि गोंधळ यामुळे अपघात होण्याचा धोका असल्याने नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी.

नागरिकांनी फटाके केवळ परवाना असलेल्या विक्रेत्यांकडूनच खरेदी करावेत. फटाके फोडताना सुताचे किंवा सुती कपडे वापरावेत; सैल किंवा सिंथेटिक कपडे टाळावेत. लहान मुलांना फटाक्यांपासून दूर ठेवावे आणि त्यांच्यावर लक्ष ठेवावे. फटाके फोडताना पाण्याची बादली, वाळू आणि प्राथमिक उपचार पेटी जवळ ठेवावी. घरात किंवा बंद जागेत फटाके फोडू नयेत. झोपताना किंवा घर सोडताना सर्व विद्युत दिवे बंद करावेत. एकाच सॉकेटमध्ये अनेक दिवे जोडणे टाळावे. संभाव्य आपत्तीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणे, अग्निशमन दल, आरोग्य विभाग आणि पोलीस यंत्रणा सतर्क असून उच्च जोखमीच्या भागांमध्ये संयुक्त जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. अग्निशमन दल आणि आपत्कालीन सेवा दलांना सज्ज राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. स्थानिक संस्था, गृहनिर्माण सोसायट्या, शाळा आणि स्वयंसेवी संस्था यांनी आग प्रतिबंधक जनजागृती कार्यक्रम राबवावेत. तसेच सोशल मीडिया, स्थानिक मंडळे आणि मंदिरांमधून प्रतिबंधात्मक सूचना प्रसारित कराव्यात.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या पुतळ्यांचे अनावरण






■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. १६ :

धम्मप्रभास बुद्ध विहार पवनी (जि.भंडारा ) येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पवित्र दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या पुणार्कृती पुतळ्यांचें अनावरण भंडारा क्षेत्राचे आमदार नरेंद्रभाऊ भोंडेकर यांच्या शुभहस्ते, आंबेडकरी विचारवंत प्रा घनश्याम धाबर्डे यांच्या अध्यक्षतेखाली शेकडो उपासकांच्या उपस्थितीत थाटात पार पडले.

आमदार विकास निधीतून विहार परिसरात उभारण्यात आलेल्या ई - ग्रंथालयाचे लोकार्पण ही यावेळी आमदार भोंडेकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

यांप्रसंगी उपस्थित उपासकांना संबोधित करतांना आमदार भोंडेकर यांनी ई ग्रंथालयात ग्रंथसंपदा,फर्निचर व विहार परिसराचे सौदयीकरण करण्याची हमी दिली. पवनी नगरीला बौद्ध संस्कृतीचा वारसा लाभला आहे. पवनी ही बौद्ध नगरी म्हणून ओळखल्या जाते तेव्हा या नगरीला बौद्ध नगरी म्हणून विकसित करण्यासाठी विकास निधीतून तरतूद करण्याचे अभिवचन आमदार भोंडेकर यांनी यावेळी दिले.

धम्म क्रांती दिनी पुतळ्याचे अनावरण होणे हे धम्मचक्र प्रवर्तनाला चालना देणारे कार्य असून, ज्यांनी धम्माची कास धरली त्यांच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन झालेला आहे. ज्यांनी या क्रांती पासून फारकत घेतली ते आजही अंधकारमय जीवन कंठीत आहेत. डॉ. आंबेडकर व .माता रमाई यांच्या अनंत उपकाराची जर परतफेड करायची असेल तर धम्माच्या कार्याला गती द्यावी असे आवाहन अध्यक्षपदावरून बोलतांना प्रा घनश्याम धाबर्डे यांनी केले.

याप्रसंगी केशवराव नंदेश्वर, ॲड.मेश्राम, युवराज फुलझेल यांनी ही उपस्थितांना संबोधित केले. कार्यक्रमाचा प्रारंभ बुद्ध भीम गीताने झा ल. 85 वर्षीय रमाबाई मेश्राम यांनी बाबासाहेबांच्या चळवळी वर आधारित गीत सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध करून वातावरण भीममय केले. यावेळी भारत भांदककर, दर्शना शेंडे, सुर्यकांता गेडाम, शाहीर रामटेके यांनीही बुद्ध गिते सादर केलीत.

धम्म कार्यात सक्रिय सेवा देणारे डॉ. शिवशंकर बनकर, एकनाथ बागडे, मनोहर शेंडे, चंद्रकला भांदककर, विभाताई गजभिये, अर्जुन घरडे, भीमराव गणवीर, वर्षा गजभिये, सुनीता शेंडे, शशीकांत गजभिये राजेंद्र बनसोड तुळशीदास वंजारी यांचा यांप्रसंगी शाल व पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. वर्षा बनसोड यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन धर्मेंद्र बनसोड यांनी तर आभार छाया गणवीर यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजक सुमेर गजभिये, कुळदीप बागडे, ईश्वर सोमकुंवर, गणपतराव भांदककर, भोजराज गजभिये, अजय रामटेके निलिमा जंगले, मेघा बनकर, गंगाबाई गजभिये, पुष्पाताई रामटेके, तुषीत गजभिये, यांनी सोहळा यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

## लोणार नगर परिषद हद्दवाढ

### काँग्रेसचे तोफिक कुरेशींचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी, लोणार, दि. १६ :



लोणार नगर परिषद हद्दवाढ प्रक्रियेत मतदारांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, अनेक त्रुटींमुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यांची स्वतःची नावे आणि कुटुंबातील इतर सदस्यांची नावे कोणत्या प्रभागांमध्ये गेले आहेत, नेमके तेच सापडत नाहीत. एकाच कुटुंबातील सदस्यांचे नावे वेगवेगळे प्रभागांमध्ये टाकण्यात आलेले आहे. याबाबत काँग्रेसचे तौफिक कुरेशी यांच्यावतीने याबाबत गंभीर आक्षेप घेत निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले आहे. निवेदनानुसार, नगर परिषदेच्या हद्दवाढीत काही विद्यमान रहिवाशांना वगळण्यात आले आहे, तर हद्दीत नसलेले नागरिकही मतदार यादीत समाविष्ट झाले आहेत. निवेदनातील प्रमुख आक्षेपः प्रभाग क्रमांक १ मधील अनेक रहिवासी हद्दवाढीच्या प्रक्रियेमुळे त्यांच्या मतदार यादीतून वगळले गेले आहेत. प्रभाग क्रमांक ३ मध्ये समाविष्ट अनेक मतदाराचे नाव प्रत्यक्षात प्रभाग क्र. १ मध्ये राहणाऱ्या व्यक्तीचे आहे. या गंभीर त्रुटी दूर करण्यासाठी काँग्रेसचे अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष मो. तौफीक हाजी अब्दुल लतीफ कुरेशी यांनी प्रशासनाला मतदार यादीची पुन्हा तपासणी करून बीएलओ मार्फत डोर टू डोर सर्वे करून त्रुटी दूर करण्याची आणि योग्य मतदारांना समाविष्ट करण्याची मागणी केली आहे.

## स्व. श्रीराम कुटे गुरूजी फाउंडेशन अनाथ मुलांसोबत दिवाळी साजरी करणार



■ महासागर प्रतिनिधी, शेगाव, दि. १६ :

स्व. श्रीराम कुटे गुरुजी फाउंडेशनच्या वतीने यंदाही 21 ऑक्टोबर रोजी जळगा जामोद विधानसभा मतदार संघातील अनाथ मुलाझमुलींसोबत दिवाळीचा आनंद साजरा करण्यात येणार आहे.

३ ते १८ वयोगटातील बालकांसाठी हा उपक्रम जळगाव जामोद येथील सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. समाजातील वंचित घटकांपर्यंत आनंदाचे किरण पोहोचविण्याच्या या उपक्रमाच्या नियोजनासाठी भाजपा शेगाव शहर आणि ग्रामीण विभागाची बैठक शेगाव येथील विश्रामगृहात पार पडली. ह भ प संजय महाराज पाचपोर यांच्या प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या बैठकीला आमदार डॉ. संजय कुटे यांचे स्वीय सहाय्यक प्रकाश राऊत प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्दिष्ट, नियोजन आणि जबाबदाऱ्या यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत भाजपा शहराध्यक्ष ज्ञानेश्वर साखरे, गजानन जवंजाळ, राजेश अग्रवाल, अमित जाधव,कमलाकर चव्हाण,राजेंद्र हेलगे, पवन महाराज शर्मा, अशोक डांबे, विजय यादव, मंगेश फुसे, प्रमोद काठोळे, पुरुषोत्तम हाडोळे, संदिप काळे, रविंद्र उन्हाळे, शशिकांत पुंडकर, श्रीधर हिंगणे, अनंता बरडे, अनिल उंबरकर, दिनेश शिंगाडे,डिगांबर हिवरकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या उपक्रमाद्वारे समाजातील वंचित मुलांना सणाचा आनंद देण्याचा आणि त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलविण्याचा संकल्प फाउंडेशनने केला आहे. उपस्थित सर्व मान्यवरांनी या सामाजिक उपक्रमासाठी उत्साहाने सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले.

# वेतनाच्या मागणीसाठी पालिका कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १६ :**

दिवाळीसारखा महत्वाचा सण तोंडावर असताना शहरातील स्वच्छतेची जबाबदारी पार पाडणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना अद्यापपर्यंत रखडलेले वेतनही मिळालेले नाही. त्यामुळे सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांनी शहरातील सर्व स्वच्छतेची कामे बंद करुन आंदोलन पुकारले आहे. सकाळी पालिका कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर ठिय्या मांडून या कर्मचाऱ्यांनी नारेबाजी केली.



या कंत्राटदारांचे मागील ३ महिन्यांचे सुमारे २ कोटींपेक्षा अधीकचे देयके प्रलंबीत आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे काम करणाऱ्या सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांचे देयके रखडलेले आहेत. या रखडलेल्या देयकांसोबत दिवाळीच्या या महिन्याचा पगार आत्ताच करण्यात यावा या मागणीसाठी सर्व कामगारांनी कम बंद करुन पालिकेसमोर ठिय्या मांडला. मात्र दिवाळी सणासाठी आत्ता वेतन करा या मागणीसाठी हे सर्व कर्मचारी देखील बुधवार पासून काम बंद करणार असल्याची माहिती मिळाली.

# अमरावती जि.प. मतदार यादीतून अनेक गावे गायब

## ७ तालुक्यांतून तक्रारी; २० हजार मतदारांवर परिणाम

■ महासागर प्रतिनिधी

**अमरावती, दि. १६ :** जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचा जोर वाढत असतानाच मतदार यादीतून अनेक गावे गायब झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. प्रारूप मतदार यादीवर आक्षेप घेण्याची अंतिम मुदत मंगळवार, १४ ऑक्टोबर रोजी संपली. मोर्शी, वरुड, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी आणि धामणगाव रेल्वेसह ७ तालुक्यांतून या संदर्भात तक्रारी दाखल झाल्या आहेत. यामुळे सुमारे २० हजार मतदारांना मतदानापासून वंचित राहावे लागण्याची शक्यता आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची प्रारूप मतदार यादी ८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. ही यादी १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभा निवडणुकांच्या याद्यांचे विभाजन करून तयार करण्यात आली आहे. मूळ विधानसभा यादीवरच अनेक राजकीय पक्षांनी आक्षेप घेतले असताना, तीच आधारभूत मानून यंत्रणेने हा नवीन घोळ निर्माण केल्याचा आरोप होत आहे. यादीतून नावे गायब झाल्याने संबंधित गावांमध्ये मतदारांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

नागरिकांनी ठिकठिकाणी तहसीलदारांकडे तक्रारी दाखल केल्या आहेत. या सर्व तक्रारी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्यापर्यंत पोहोचल्या असून, प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अंजनगाव सुर्जी तालुक्याच्या मतदार यादीत सर्वाधिक घोळ झाल्याचे दिसून आले आहे. या तालुक्यातील टाकरखेडा मोरे, अहमदपूर, धनेगाव, रौंदळपूर, पोही, रत्नापूर (पोही), जवळा बु., जवळा खुर्द, औरंगपूर, सैदापूर, डोंगरगाव (तुरखेड), मलकापूर बु., अडगाव खाडे, नवापूर, मासमापूर, मूर्तिजापूर, घोंगर्डा, हसनापूर, पार्डी, शिरजगाव, कारला, निमखेड आड, जवर्डी आणि धुळकी या गावातील नागरिकांची नावे मतदार यादीत नाहीत.असाच प्रकार दर्यापूर तालुक्यातही घडला आहे. या तालुक्यात जिल्हा परिषदेचे येवदा, खल्लार, थिलोरी आणि पिंपळोद असे चार मतदारसंघ आहेत. या चारही मतदारसंघातील काही गावे मतदार यादीत दिसून आली नाहीत, अशी तेथील नागरिकांची तक्रार आहे.

मोर्शी तालुक्यातील हिवरखेड, पिंपळखुटा मोठा, अंबाडा, नेरपिंगळाई आणि रिद्धपूर तर वरुड तालुक्यातील पुसला, बेनोडा, जरुड, आमनेर आणि लोणी या पाच मतदारसंघातील काही गावे गायब झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. धामणगाव रेल्वे तालुक्यातही अशीच स्थिती समोर आली आहे. दुसरीकडे, अमरावती आणि भातकुली तालुक्याच्या मतदार यादीतही काही त्रुटी आढळल्या आहेत.

अमरावती तालुक्यातील काही गावांच्या रहिवाशांची नावे दुसऱ्या गावांत दर्शविली आहेत, तर भातकुली तालुक्यातील विवाहित महिलांची नावे अद्याप त्यांच्या माहेरच्या पत्त्यावर कायम असल्याची तक्रार निवडणूक विभागाकडे करण्यात आली आहे.

**आता प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींवर सुनावणी घेऊन आगामी २७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी घोषित केली जाणार आहे.**

**ही यादी घोषित करताना संबंधित मतदारांची मतदान केंद्रे कोणती असतील, याची माहितीही जाहीर केली जाईल.**

# कबरमध्ये झोपून शेतकऱ्यांचे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी

**घाटंजी, दि. १६ :**

सत्ताधारी पक्षाने २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन देऊन त्यांच्या मतांचा कौल मिळवला होता. मात्र सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांचा विसर पडल्याचा आरोप करण्यात येत आहे. दरम्यान, यंदाच्या अतिवृष्टीमुळे संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यातील तसेच घाटंजी तालुक्यातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात मौजा तिवसाळा (ता. घाटंजी) येथे वंचित



बहुजन आघाडीच्या वतीने सुरू करण्यात आलेले अन्नत्याग-दफन-कफन आंदोलन संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधून घेणार ठरले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी वंचीत बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष संघपाल कांबळे यांच्या नेतृत्वात आणि आघाडीचे जिल्हा महासचिव नितीन राठोड यांच्या उपस्थितीत अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

## झोपडपट्टीधारकांना हक्काचे घरकुल मिळायलाच हवे




**अकोला:** झोपडपट्टीधारकांना हक्काचे घरकुल मिळायलाच हवे, अशी मागणी करत मंगळवारी अकोला विकास संघर्ष मंचातर्फे मोर्चा काढण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकलेल्या मोर्चात महिला, पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले. झोपडपट्टीत राहणाऱ्या महिलांना मालकीचे पट्टे मिळत नसल्याने त्यांचे हक्काच्या निवाऱ्याचे स्वप्न पूर्ण होत नाही. झोपडपट्टी धारकांना हक्काचे घरकुल मिळायलाच हवे, अशी मागणी करीत अकोला विकास संघर्ष मंचातर्फे काढण्यात आला. झोपडपट्टीतील कुटुंबांना केवळ तात्पुरते छप्पर नव्हे, तर मालकीहक्क मिळावा. निवारा हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. योजनांचे फक्त कागदी अंमलबजावणीवर समाधान न मानता प्रत्यक्षात तो गरजूंपर्यंत पोहोचला पाहिजे. यावेळी महानगरपालिकेचे आयुक्त तसेच जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देऊन देऊन कारवाई करण्याची मागणी केली. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

# हृदयरोग निदान शिबिरात १२० जणांची तपासणी

■ महासागर प्रतिनिधी

**बाळापूर, दि. १६ :**

मराठा पाटील संघटना बाळापूरतर्फे हृदयरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर अनेक नागरिकांना जीवनदान ठरणारे आहे. कार्य परोपकारी असल्याचे प्रतिपादन गोपाळ महाराज उरळकर यांनी याप्रसंगी केले.



अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल अमरावती व मराठा पाटील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने प्राथमिक आरोग्य केंद्र उरळ हृदयरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटन गोपाळ महाराज उरळकर यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून संदीप पाटील, रेखा राऊत, संजय राऊत, अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलचे प्रशासकीय अधिकारी दिगंबर उपस्थित होते.

डॉ. अनुप डोंगरे, डॉ. पूनम जयस्वाल, डॉ. शुभम बादुकले, प्रज्ञा मनवर, प्राजक्ता वाडेकर, रवीना मोहोळ, वैष्णवी गोडाणे, निशा जामूनकर, प्रतीक्षा वाघमारे, प्रिया छापाने, विशाखा खैरे, कपिलदेव वर्मा, सागर धमाळे, मुकेश ठाकूर यांनी तपासणी केली. प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. दरोकर, डॉ. शुभांगी घुगे, डॉ. चेतना केळकर, डॉ. सिद्धांत इंगळे यांनी सहकार्य केले. शिबिराला मांचितराव पोहरे, प्रा. बाळासाहेब पोहरे, चंद्रकांत माळी, धनंजय नेमाडे, पद्माकर माळी, रवींद्र पोहरे, हिंमतराव मेटांगे, पुरुषोत्तम पाटील, शिवाजीराव म्हैसने, गोपाल पोहरे आदी होते. सूत्रसंचालन सहसचिव वसंतराव पोहरे यांनी तर आभार मराठा पाटील संघटनेचे अध्यक्ष शरद वानखडे यांनी मानले. या शिबिरात १२० रुग्णांनी तपासणी करून घेतली.

# घरकुल योजनेअंतर्गत भूखंडाचे पट्टे देण्यात यावे



## शिवसेनेची महापालिका आयुक्तांकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी

**अकोला, दि. १६ :** प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना भूखंडाचे पट्टे देण्यात यावेत, अशी मागणी शिवसेनेने महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदन शहर प्रमुख राजेश मिश्रा यांनी सादर केले. अनेक गरजू, गरीबांकडे हक्काचे राहते घर नसून, कडक ऊन असो किंवा कडाक्याची थंडी; पावसाळ्यातही त्याची प्रचंड धांदल उडते. त्यामुळे काही वर्षांपूर्वी केंद्र सरकारकडून सर्वांसाठी घरे हे केंद्र शासनाने महत्वाचे धोरण राबवण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत (पीएमएवाय) जिल्ह्याला उद्दिष्ट प्राप्त झाले. मात्र आता जागेचा प्रश्न निर्माण झाला आहे. महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण करून झोपडपट्टी आहे.

झोपडपट्टीधारांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाभ मिळावा, यासाठी जागेचा भाडेपट्टा नियमानाकुल करणे आवश्यक आहे.

मात्र मनपाकडून अद्याप ही कार्यवाही झालेली नाही. शिवसेना वसाहत, लोकमान्य नगर, गुरुदेव नगर, जयरामसिं प्लॉटचा खालचा भाग, रमाबाई नगर, भोई पुरा आदी भागातील झोपडपट्टी धारकांकडे जागेचे पट्टे नाहीत. त्यांना तातडीने पट्टे देण्याची मागणी शिवसेने निवेदनात केली.

# जिल्हा परिषदेसह पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बैठक




■ महासागर प्रतिनिधी,

**बुलडाणा, दि. १६ :**

आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्वेता महाले यांच्या अध्यक्षतेखाली चिखलीतील अंबिका अर्बन सभागृह येथे महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. या बैठकीत चिखली विधानसभा मतदारसंघातील सर्व जिल्हा परिषद सर्कलमधील पंचायत समिती व जिल्हा परिषद उमेदवारी करिता इच्छुक कार्यकर्ते, कार्यरत पदाधिकारी, सर्व शक्ती केंद्रप्रमुख व बूथ प्रमुख उपस्थित होते.

यावेळी आमदार श्वेता महाले यांनी इच्छुक जिल्हा परिषद व पंचायत समिती उमेदवारांना जनतेमध्ये जाऊन शेवटच्या स्तरावर काम करण्याचे आवाहन केले. उमेदवारीच्या अनुषंगाने आणि जनतेच्या उपयुक्ततेच्या दृष्टिकोनातून विविध सामाजिक उपक्रम, जनसंपर्क कार्यक्रम व शिबिर आयोजित करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

या शिबिरांना त्या स्वतः उपस्थित राहून पाहणी करतील असे सांगत, जे कार्यकर्ते प्रत्यक्ष जनतेशी जोडले जातील, त्यांचे सर्वेक्षण तालुका मंडळ प्रमुख करतील आणि त्यानंतरच उमेदवारी निश्चित केली जाईल,ख्व असेही आमदार श्वेता महाले यांनी स्पष्ट केले.

# कस्तुरीचा सुगंध मेळघाटात दरवळणार ग्रामस्थांसोबत साजरी करणार दिवाळी

■ महासागर प्रतिनिधी

**अकोला, दि. १६ :**

माणुसकीची प्रकाशमय ज्योत सातत्याने तेवत ठेवत कस्तुरी चॅरिटेबल सोसायटी या सेवाभावी संस्था यंदा धनतेरसच्या पूर्वसंध्येला शुक्रवारी, १७ ऑक्टोबर रोजी दिवाळीचा सण मेळघाट परिक्षेत्रातील रुईपाठा येथील आदिवासी बांधवांसोबत साजरा करणार आहे. तेथील लहान मुलांना कपड्यांसह गावास मिष्टान्न भोजन देण्यात येणार आहे. यानिमित्ताने आदिवासी बांधव-भगिनी, चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यात येणार आहे.

यंदा अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले. पिकांच्या रुपाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून घेतला. अनेकांच्या घरातही पुराचे पाणी घुसले. परिणामी गृहपयोगी साहित्य वाहून गेले. घरातील धान्याची नासाडी झाली. शैक्षणिक साहित्यही भिजले. अतिवृष्टीमुळे मेळघाटतही नुकसान झाले.

आधीच शहरांच्या तुलनेने मुलभूत सुविधांची वाणवा मेळघाटात असून त्यात नैसर्गिक संकटाची भर पडली.



त्यामुळे दिवाळी सारख्या सणात त्या भागातील ग्रामस्थांच्याही जीवनात आनंद निर्माण व्हावा, यासाठी नाही कस्तुरी चॅरिटेबल सोसायटी या सामाजिक संस्थेतर्फे सामाजिक दायित्व निभावण्याच्या भावनेतून मेळघाट परिक्षेत्रातील रुईपाठा गावात दिवाळी साजरी करण्यात येणार आहे. यावेळी ग्रामस्थांना साहित्याचे वितरण होणार आहे. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी कस्तुरीचे संस्थापक प्रा. किशोर बुटोले यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारिणी सदस्य तथा प्रकल्प प्रमुख संजय गायकवाड यांच्या नेतृत्वात एक समिती गठित करण्यात आली आहे.

या समितीत संजय ठाकरे, यशवंत देशपांडे, डॉ. कुसुमाकर घोरपडे, राजेश्वर पेठकर, अनिल पालवे, गोविंदसिंह गहिलोत, प्रा. रिता घोरपडे, मीरा देशपांडे, चेतना आनंदानी, ज्योती सुलताने, सुधीर नितनवरे, गोपाल घाटे यांचा समावेश आहे.

बरेच जण दुर्गम भागात राहत असून, त्यांच्याही जीवनात दिवाळी सण साजरा होण्यासाठी धनतेरस च्या पूर्वसंध्येला शुक्रवार रुईपाठा गावात कस्तुरीकडून मदतीचा हात देण्यात येणार आहे.

चिखलदरा पंचायत समिती अंतर्गत असणारे अतिदुर्गम व सर्व सुखसोयींपासून वंचित आहे. दिवाळीनिमित्त तेथील लहान मुलांना नवीन कपडे, फटाके, महिलांना भाऊबीज भेट म्हणून नवीन साडी व मिष्टान्न भोजन देण्यात येणार आहे.

# डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्त अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी

**अकोला, दि. १६ :**

वृत्तपत्र विक्रेता, अणुवैज्ञानिक आणि देशाचे राष्ट्रपती असा प्रेरणादायी जीवनप्रवास करणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिवसानिमित्त १५ ऑक्टोबर हा दिवस 'वृत्तपत्र विक्रेता दिन' म्हणून साजरा करण्यात आला. राम जुमडे यांनी वृत्तपत्र विक्रेत्यांचे स्वागत केले. भल्या पहाटे वाचकांना वृत्तपत्र घरपोच पोहोचविण्याचे अविरत कार्य करणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांप्रती यानिमित्ताने कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. माजी राष्ट्रपती डॉ. कलाम हे एक थोर शास्त्रज्ञ म्हणून सर्वत्र परिचित आहेत. मात्र बालपणी कुटुंबाला आर्थिक मदत करण्यासाठी त्यांनी वृत्तपत्र वितरणाचे कार्य केले होते. ही बाब फार कमी लोकांना माहिती आहे.

स्वतः डॉ. कलाम यांनी आपल्या आत्मचरित्रात 'विंग्ज ऑफ फायर' मध्ये याचा उल्लेख केला आहे. वृत्तपत्र विक्रेत्यांचे आपल्या रोजच्या आयुष्यात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

आपण झोपेतून उठण्यापूर्वीच, पाऊस असो वा थंडी, या मंडळी ताज्या बातम्या घरपोच पोहोचवतात. त्यांच्या या समर्पित सेवेबद्दल समाजाने कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले कर्तव्य आहे, या भावनेतून बुधवारी अकोला वृत्तपत्र संघटना आणि विविध संस्थांच्या वतीने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी, संघटनेचे अध्यक्ष बी संतोष कुमार अभिजित परळीकर,सुधीर मेश्राम, ज्ञानेश्वर कोगदे विजय भदिर्गे, राहुल खोब्रागडे, राजू हिवरकर, विठ्ठल वानखेडे, गोपाल वाडेकर, चिंटू परळीकर आदी होते. सरकारने याकडे द्यावे लक्ष, असे वृत्तपत्र संघटनेचे अध्यक्ष बी. संतोष कुमार म्हणाले. 'लोकशाहीतील चौथा स्तंभ म्हणून आपण वृत्तपत्र क्षेत्राकडे पाहतो. तळागाळातील घटक म्हणजे वृत्तपत्र विक्रेता होय. या घटकाकडे सरकारने लक्ष द्यावे.


महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता**

**सार्वजनीक बांधकाम विभाग क्र. १**

div1nagpur.ee@mahapwd.gov.in

**ई निविदा सुचना क्र. एस /३५/२०२५ – २०२६**

कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग क्र१ नागपूर हे अनुभवी व महाराष्ट्र अस्थापनेच्या नोंदणीचा दाखला असलेल्या एजन्सीकडून खालील कामाकरीता ई निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन) विहीत नमुन्यामध्ये (बाबवार दर) निविदा मागवित आहेत. निवद। कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावी. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| Sr. No. | Name of Work | Estt. cost (Rs. in lakhs) | Cost of blank tender form |
|---|---|---|---|
| 1 | Hire of various type of material for Rac-2025at MLA Hostel | 45.00 | 590.00 |
| 2 | Hire of Various Types of Material for RAC-2025 at Various campus under sub dn III and Sub dn IV, Building Sub Dn, Nagpur | 15.00 | 590.00 |
| 3 | Hire of various type of material for Rac-2025at 160 Tenament and Ravinagar etc | 75.00 | 1180.00 |
| 4 | Hire of various type of material for RAC-2025 Ravibhavan, Nag bhavan, Ramgiri, Deogiri, HyHouse , Vijaygad, Suyog,etc. | 80.00 | 1180.00 |
| 5 | Hire charges of 42", 55" & 65" Colour T.V. & LCD with Remote Control & Setup Box full all Channels Recharge with 24x7 Technical Support & required no. of Service Manpower During entire RAC-2025 at Ravibhavan | 75.00 | 1180.00 |
| 6 | Hire charges of 32" Colour T.V. & LCD with Remote Control & Setup Box full all Channels Recharge with 24x7 Technical Support & required no. of Service Manpower During entire RAC-2025 at MLA Hostel, and Milk scheme Nagpur | 35.00 | 590.00 |

१) या कामाची निविदा माहीती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर निविदा सुचनेची प्रत या कार्यालयातील सुचना फलकावर पहायला मिळेल.

२) निविदेच्या अटी / शर्ती. प्रारूपात दर्शविल्याप्रमाणे राहील.

३) या निविदा सुचनेत काही बदल होत असल्यास वरील वेबसाइटवरती शुध्दीपत्रक प्रकाशित होईल.

४) कोणतेही कारण न दर्शविता अंशतः किंवा संपूर्ण निविदा रद्द अथवा फेरफार करण्याचा अधिकार सक्षम अधिकाऱ्याने राखून ठेवलेला आहे.

जावक क्र. ११५९३ दिनांक १३ ऑक्टोबर २०२५

(लक्ष्मीकांत राऊळकर)
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १
नागपूर

DGIPR-2025-26/No.-5/C3272



कार्यालय

**नगर परिषद नरखेड**

जि. नागपूर

क्रमांक: नपन /स्वमअ (ना) २.०/Bioremediation निविदा सूचना – ११५२/२०२५ दिनांक– १६/१०/२०२५

**निविदा सूचना (पहिली वेळ)**

याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, नगर परिषद नरखेड नागरी स्वच्छता विभाग अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत **Bioremediation** बाबतच्या कामाची ऑफलाईन (द्वी-लिफाफा पद्धतीने) निविदा प्रक्रिया करण्यात येत असून यासाठी पात्र व इच्छुक कंत्राटदाराने खालील प्रमाणे वेळापत्रकानुसार निविदा सादर करावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची किंमत (रु) | निविदा पत्रकाची किंमत (रु) | अनामत रक्कम (रु) | निविदेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | नगर परिषद नरखेड हद्दीतील Old Legacy Waste - 890 MT यावर Bioremediation प्रक्रिया करणे. | ४,८९,५००/- | ५००/- | ५०००/- | दि. १७/१०/२०२५ ते ३१/१०/२०२५ पर्यंत (कार्यालयीन वेळेत) |

वरीलप्रमाणे निविदा नगर परिषद नरखेड कार्यालयातून B1 फॉर्म प्राप्त करून त्यासह निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे आवश्यक सर्व दस्तावेजासह विहिती मुदतीत नगर परिषद कार्यालयात निविदा सादर करावी.

मुख्याधिकारी
नगर परिषद नरखेड

# गरिबी निर्मूलन : समानतेच्या नव्या युगाकडे वाटचाल

दरवर्षी १७ ऑक्टोबर हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय गरिबी निर्मूलन दिन म्हणून पाळला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकाराने १९९३ पासून या दिनाचे औपचारिक स्वरूप सुरू झाले. या दिनामागचा उद्देश केवळ आर्थिक आकडेवारीवर प्रकाश टाकणे नसून, गरिबीच्या सामाजिक, राजकीय आणि मानवी पैलूंवर चिंतन करणे हा आहे. या दिवसाचे प्रतीकात्मक महत्त्व असे की, जगातील सर्वात वंचित आणि उपेक्षित लोकांच्या आवाजाला ऐकले जावे, त्यांच्या संघर्षाची दखल घेतली जावी आणि समान संधींचे दार सर्वांसाठी खुले व्हावे.

------------------

गरिबी ही केवळ पैशांचा अभाव नाही, तर ती सन्मान, शिक्षण, आरोग्य आणि संधी यांचा अभाव आहे. ती माणसाच्या मानवी हक्कांवर आघात करते. जागतिक बँकेच्या जून २०२५ च्या अहवालानुसार, २०२२ मध्ये सुमारे ८३८ दशलक्ष (८३ कोटी ८० लाख) लोक अजूनही अत्यंत गरिबीत जीवन जगत आहेत. हे प्रमाण जगाच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास १० टक्के आहे.

२०२५ मध्ये जागतिक बँकेने अत्यंत गरिबीची नवी व्याख्या निश्चित केली असून, त्याव्याख्येमध्ये २०२१ च्या क्रयशक्ती समतोल प्रमाणे दररोज प्रती व्यक्ती ३ डॉलर्सपेक्षा कमी उत्पन्न असलेली व्यक्ती अत्यंत गरीब समजली जाते. या आकडेवारीतून स्पष्ट होते की आधुनिक तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण आणि प्रगतीच्या घोषणांनंतरही जगात गरिबीचे संकट टिकून आहे. उप-सहारा आफ्रिका आणि दक्षिण आशिया हे अजूनही सर्वाधिक प्रभावित प्रदेश आहेत. हवामान बदल, युद्धस्थिती, बेरोजगारी आणि महागाई यामुळे गरीब वर्गावर सर्वाधिक परिणाम झाला आहे.

भारतातील परिस्थितीही वेगळी नाही. गेल्या दोन दशकांत भारताने विकासाच्या क्षेत्रात मोठी झेप घेतली, लाखो लोकांना गरिबीरेषेबाहेर आणले, तरीही अजूनही ग्रामीण भारतातील मोठा वर्ग बहुविमीय गरिबीच्या छायेखाली जगतो. राष्ट्रीय बहुविमीय गरिबी निर्देशांक २०२४ नुसार, भारतातील जवळपास ११.३ टक्के लोक अजूनही बहुविमीय गरिबीत असून, त्यांना शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पिण्याचे पाणी, पोषण आणि रोजगार यांसारख्या मूलभूत गरजांपासून वंचितता भासत आहे.

गरिबीचा उगम केवळ आर्थिक नाही. ती सामाजिक विषमता, जातीय असमानता, लिंगभाव असमानता, शिक्षणाचा अभाव आणि संसाधनांच्या असमान वाटपाशी निगडित आहे. ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूर, आदिवासी, स्थलांतरित कामगार आणि महिला हे या दुष्चक्राचे सर्वात मोठे बळी ठरतात. महिलांच्या बाबतीत तर गरिबीचे ओझे दुप्पट असते, कारण त्यांना घरगुती जबाबदाऱ्या, आरोग्यसेवेचा अभाव, कमी शिक्षण आणि वेतनातील अन्याय यांचा सामना करावा लागतो.



संयुक्त राष्ट्रांचे ह्यशाश्वत विकास उद्दिष्टे या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे ठरते. शाश्वत विकास उद्दिष्टांच्या पहिल्या उद्दिष्टातच स्पष्ट म्हटले आहे की 'End Poverty' म्हणजेच २०३० पर्यंत जगभरातून गरिबी संपवणे. परंतु हे लक्ष्य गाठण्यासाठी फक्त सरकारी योजना पुरेशा नाहीत.

सामाजिक जागरूकता, नागरिकांचा सहभाग आणि नैतिक जबाबदारी यांचा संगम होणे आवश्यक आहे. भारत सरकारने गरिबी निर्मूलनासाठी अनेक प्रभावी योजना राबविल्या आहेत. प्रधानमंत्री जनधन योजनेने आर्थिक समावेशनाची दारे उघडली; मनरेगाने ग्रामीण रोजगाराची हमी दिली; प्रधानमंत्री आवास योजनेने घरविहीनांना आश्रय दिला; उज्ज्वला योजनेने स्वयंपाकासाठी स्वच्छ इंधन पुरविले; तर राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याने सर्वसामान्य नागरिकांना अन्नाचा हक्क दिला. या योजनांचा उद्देश अंत्योदय होय. म्हणजे समाजातील सर्वात शेवटच्या माणसापर्यंत विकासाचा लाभ पोहोचवणे हा आहे.




डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)


तथापि, या सर्व योजनांची अंमलबजावणी तळागाळात प्रभावीपणे व्हावी यासाठी पारदर्शक यंत्रणा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे सशक्तीकरण आवश्यक आहे. काही वेळा निधीचा अपुरा वापर, माहितीचा अभाव आणि प्रशासनातील भ्रष्टाचारामुळे योजनांचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे गरिबी निर्मूलनासाठी आर्थिक सुधारणा बरोबरच प्रशासनिक सुधारणा सुद्धा तितक्याच गरजेच्या आहेत.

गरिबी निर्मूलनाचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे शिक्षण आणि कौशल्यविकास होय. आजच्या डिजिटल आणि तंत्रज्ञानाधारित युगात शिक्षण हे केवळ ज्ञान मिळवण्याचे साधन नाही, तर आत्मनिर्भरतेचे मूळ आहे. शिक्षणामुळे माणूस केवळ रोजगारक्षम होत नाही, तर तो सामाजिक बदलाचा घटक बनतो. म्हणूनच गरिबीविरोधी लढाईत प्राथमिक शिक्षण, स्त्री शिक्षण आणि तांत्रिक शिक्षणाला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

शहरीकरणाच्या वेगामुळे शहरी गरिबी ही नवी समस्या निर्माण झाली आहे. महानगरांतील झोपडपट्ट्या, अस्थिर रोजगार, आरोग्याच्या समस्या आणि घरांच्या टंचाईमुळे गरिबीचे नवे रूप तयार झाले आहे.

ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर झाल्यानंतरही लोकांना सन्मानजनक जीवनमान मिळत नाही. त्यामुळे गरिबीविरुद्धच्या लढाईत ग्रामीण आणि शहरी विकासाचा संतुलित दृष्टिकोन आवश्यक आहे. सामाजिक न्याय आणि आर्थिक समता यांचा संगम साधणे हेच खरे गरिबी निर्मूलनाचे सूत्र आहे.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत समाजातील दुर्बल घटक मागे राहू नयेत यासाठी संसाधनांचे पुनर्वाटप, महिलांचे सक्षमीकरण, तसेच आरोग्य आणि पोषणावर अधिक गुंतवणूक करणे आवश्यक आहे. भारतात महिलांच्या स्वयंसहाय्यता गटांनी ग्रामीण भागात आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणले आहे. हे गट महिलांना केवळ बचतीची सवयच लावत नाहीत, तर लघुउद्योग, हस्तकला आणि उद्योजकतेच्या संधीही उपलब्ध करून देतात.

गरिबी निर्मूलनासाठी औद्योगिक क्षेत्र आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभागही महत्त्वाचा आहे. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत वेगवेगळ्या कंपन्या शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्यासाठी योगदान देतात.

या प्रकारचा खाजगी क्षेत्राचा सहभाग सार्वजनिक धोरणांना बळकटी देतो. गरिबी ही माणसाच्या मानसिकतेवरही परिणाम करते. ती आत्मविश्वास कमी करते, सामाजिक विभागणी वाढवते आणि निराशा निर्माण करते. त्यामुळे गरिबीविरुद्धची लढाई ही केवळ आर्थिक नसून, ती मानवी सन्मान आणि आत्मविश्वास पुनर्स्थापित करण्याची लढाई आहे.

आज जग हवामान बदल, युद्ध, महागाई आणि अन्नसुरक्षेच्या संकटात अडकले आहे. या सर्व समस्यांचा सर्वाधिक फटका गरीब लोकसंख्येलाच बसतो. त्यामुळे हवामान न्याय आणि सामाजिक न्याय यांना एकत्रित दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे.

भारतातील अनुभव सांगतो की, जेव्हा विकासाचा केंद्रबिंदू माणूस ठरतो, तेव्हा प्रगतीचा प्रवाह सर्वांसाठी खुला होतो. डिजिटल व्यवहार, थेट लाभ हस्तांतरण आणि ग्रामीण पायाभूत सुविधा यामुळे पारदर्शकता वाढली आहे. परंतु शिक्षण, आरोग्य आणि रोजगार या तीन क्षेत्रांत अद्याप सर्वसमावेशक सुधारणा आवश्यक आहेत.

शेवटी, गरिबी निर्मूलन हा केवळ सरकारचा कार्यक्रम नाही, तर तो संपूर्ण समाजाचा सामूहिक संकल्प आहे. आपण एका गरीब व्यक्तीकडे दयेने नव्हे तर सन्मानाने पाहिले, तर खऱ्या अर्थाने सामाजिक समता निर्माण होईल. गरिबी ही नियती नाही, ती अन्यायाचा परिणाम आहे ही जाणीव प्रत्येक नागरिकात रुजली पाहिजे.

या आंतरराष्ट्रीय गरिबी निर्मूलन दिनानिमित्त आपण हे ठरवूया की कोणतेही धोरण, योजना किंवा प्रगती तेव्हाच अर्थपूर्ण ठरेल, जेव्हा ती समाजातील सर्वात शेवटच्या माणसापर्यंत पोहोचेल. अंत्योदय हीच खरी प्रगती आहे. गरिबीविरुद्धची लढाई म्हणजे मानवतेच्या समानतेसाठीचा संघर्ष आहे, आणि हा संघर्ष आपल्याला अधिक न्याय्य, समतामूलक आणि सशक्त जगाकडे नेईल.

# अस्मानी संकट आणि शेतकरी मातीशी नातं ठेवणारा जिवंत देवदूत



शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे, परंतु आज या कण्यालाच अस्मानी संकटाने वाकवून ठेवले आहे. निसर्गाचा कोप, हवामानातील अनिश्चितता, पावसाची बेभरवशाची चाल आणि त्यातून निर्माण झालेली आर्थिक बिकट परिस्थिती या सगळ्यामुळे शेतकऱ्याचे आयुष्य जणू एका न संपणाऱ्या संघर्षात अडकले आहे.

एकेकाळी आषाढात पेरणी आणि श्रावणात हिरवळ ही म्हण खरी ठरत होती, पण आता हवामान बदलाच्या सावटाखाली ही म्हण फिकट पडली आहे. पाऊस वेळेवर न पडणे, अचानक अतिवृष्टी होणे, गारपिटीचा तडाखा बसणे या अस्मानी संकटांनी शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. कधी दुष्काळाचे सावट, तर कधी पुरस्थिती अशा दोन्ही टोकांमध्ये शेतकरी झुलत आहे.

माणूस शहरात छत्री घेऊन पावसापासून वाचतो, पण शेतकरी मात्र त्या पावसाची वाट बघत असतो. अस्मानी संकट म्हणजे फक्त आकाशातून कोसळणारा पाऊस नव्हे; ते म्हणजे शेतकऱ्याच्या मनावर कोसळणारी काळजी, त्याच्या भविष्यावर आलेलं सावट आणि त्याच्या जगण्याच्या तुटलेला धागा. निसर्गाचा कोप, आशेचा अपघात कधी दुष्काळाने भूमी फाटते, तर कधी अतिवृष्टीने पिके वाहून जातात. गारपीट, वादळ, पूर या प्रत्येक घटनेसोबत शेतकऱ्याचे हृदयही मोडते. त्याच्या आयुष्यातील प्रत्येक ऋतू ही परीक्षा ठरते.




प्रविण बागडे
नागपूर.
9923620919


पेरणीच्या वेळी आशा असते, पण कापणीच्या वेळी नेहमीच भीती. कारण निसर्गाचा एक कोप आणि वर्षभराच्या घामाचे स्वप्न एक क्षणात उद्ध्वस्त! शेतकरी घामाचं सोनं करतो पण त्याला मोबदला मातीचा मिळतो. शेतकरी रात्रंदिवस कष्ट करतो, भूमीला जीव देतो, पण त्याला त्याचा योग्य मोबदला मिळत नाही. तो जमिनीवर घाम गाळतो, जीव ओततो, पण त्याला मिळतो फक्त तोट्याचा हिशेब. पिक बुडालं तर विमा कंपन्या हात झटकतात, नुकसान भरपाई मिळेपर्यंत कर्जाचे ओझे वाढते. एकीकडे बँकेच्या नोटिसांचे सावट, तर दुसरीकडे घरच्यांच्या पोटाची जबाबदारी या द्वंद्वात शेतकरी तुटत चालला आहे. पिकांचं दर घसरतो, विमा मिळत नाही आणि मग तोच शेतकरी, जो अन्नदाता आहे, तो स्वतःचं अन्न मिळवण्यासाठी झगडतो. हे केवळ अन्याय नाही, ही व्यवस्थेची संवेदनशून्यता आहे.

शासन अनेक योजना जाहीर करते विमा योजना, अनुदाने, कर्जमाफी, परंतु त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याआधीच फाईल्सच्या दलदलीत अडकतात. मदतीचा लाभ मिळेपर्यंत शेतकऱ्याची आशा कोरडी पडते. शासनाकडून मिळणारी मदत ही सहानुभूती नसून न्याय असायला हवी. प्रत्येक वेळी नवनवी योजना, घोषणा आणि मदतीच्या आश्वासनांचा पाऊस पडतो. पण त्या थेंबांमध्ये शेतकऱ्याला आधार नाही, तर फसवणूक असते.

शासनाच्या घोषणा आशेची पतंग की दिखाऊ फुगा! नुकसानीचे पंचनामे, कागदपत्रं, अर्ज या सगळ्या प्रक्रियेत शेतकऱ्याचं आयुष्य फाईलमध्ये अडकून राहतं. त्याला हवी आहे तत्काळ मदत, खऱ्या अर्थाने न्याय आणि मानवी संवेदना. अस्मानी संकटाने कितीही तडाखे दिले, तरी शेतकरी पुन्हा उभा राहतो. त्याच्या हातात माती असते, पण मनात विश्वास असतो पाऊस येईल, पिकं येतील.

ही आशा म्हणजे भारतीय कृषी संस्कृतीचं प्रतीक आहे. परंतु या आशेचा गैरफायदा घेणं थांबवलं पाहिजे. निसर्गाने कितीही तडाखे दिले, तरी शेतकरी पुन्हा मातीशी नातं जोडतो. त्याच्या अंगावर कर्जाचं ओझं असतं, तरीही तो नव्या पिकाचं स्वप्न पाहतो. कारण त्याला माहीत आहे. मातीचा वास म्हणजे जीवन आणि आशा म्हणजेच शेती तरीही उभा राहणारा शेतकरीच. आपण शहरात अन्न खातो पण त्या अन्नामागे कोणाचा घाम आहे हे विसरतो. शेतकरी केवळ उत्पादक नाही, तो जीवनदाता आहे. त्याचं जगणं सुरक्षित असलं, तर देशाचं उद्याचंही सुरक्षित राहील. म्हणूनच समाजाने आणि शासनाने मिळून या अस्मानी संकटाला मानवी संवेदनेनी उत्तर द्यायला हवं.

हवामानाच्या बदलत्या परिस्थितीनुसार शाश्वत शेती पद्धती राबविणे आवश्यक आहे. विमा यंत्रणेतील सुधारणा व्हावी व नुकसानीचे वास्तव मूल्यांकन करून तत्काळ मदत मिळावी. कृषी शिक्षण आणि प्रशिक्षणः नवीन तंत्रज्ञान, जलसंवर्धन, आणि जैविक शेती यावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे.

बाजारभाव स्थिरीकरण होऊन मध्यस्थांच्या ऐवजी थेट ग्राहकांपर्यंत शेतकऱ्यांचे उत्पादन पोहोचावे. शेतकरी रात्रंदिवस मेहनत करून भूमीला फुलवतो, पण उत्पादन वाढलं तरी उत्पन्न वाढत नाही. पिकांच्या दरातील अनिश्चितता, बाजारपेठेतील मध्यस्थांची लूट आणि विमा कंपन्यांच्या कारभारातील त्रुटी या सगळ्यांनी शेतकरी आर्थिकदृष्ट्या कमकुवत झाला आहे.

अलिकडच्या काही वर्षांत पावसाच्या पॅटर्नमध्ये मोठा बदल झालेला दिसतो. कधी पाऊस उशिरा येतो, तर कधी काही दिवसांतच एवढा कोसळतो की संपूर्ण हंगामाची समीकरणे बिघडतात. त्यातच गारपीट आणि वादळासारख्या आपत्तीमुळे शेतकऱ्याच्या मेहनतीचा सगळा मातीमोल होतो. फक्त तात्पुरती मदत पुरेशी ठरणार नाही. हवामान बदल लक्षात घेऊन शेतीला वैज्ञानिक व तंत्रज्ञानाधारित स्वरूप देणे गरजेचे आहे.

जलसंधारण, पाण्याचा तर्कशुद्ध वापर, हवामानस्नेही शेती पद्धती आणि थेट ग्राहकांपर्यंत विक्री यांसारख्या उपायांवर भर दिला पाहिजे. विमा योजनांना सुलभ आणि पारदर्शक बनविणे अत्यावश्यक आहे. फक्त तात्पुरती मदत पुरेशी ठरणार नाही. हवामान बदल लक्षात घेऊन शेतीला वैज्ञानिक व तंत्रज्ञानाधारित स्वरूप देणे गरजेचे आहे. जलसंधारण, पाण्याचा तर्कशुद्ध वापर, हवामानस्नेही शेती पद्धती, आणि थेट ग्राहकांपर्यंत विक्री यांसारख्या उपायांवर भर दिला पाहिजे. विमा योजनांना सुलभ आणि पारदर्शक बनविणे अत्यावश्यक आहे.

अस्मानी संकट हे थांबवता येणार नाही, पण त्याचा परिणाम कमी करता येऊ शकतो. यासाठी शासन, समाज आणि शेतकरी तिघांनीही एकत्र येऊन उपाययोजना राबवायला हव्यात. शेतकऱ्याच्या घामाने या भूमीला अन्न मिळतं, म्हणूनच त्याच्या डोळ्यातील अश्रू पुसणं ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. आकाश काळं झालं तरी पेरणी थांबत नाही, कारण शेतकरी आशेचा पेरणीवाला असतो. त्याच्या डोळ्यातली आस, त्याच्या मातीची ओल हाच आपल्या देशाचा खरा आत्मा आहे. तर चला, शेतकऱ्याच्या संघर्षाला सलाम करू या. कारण तो फक्त अन्नदाता नाही तर तो या भूमीचा श्वास आहे!

# कामाख्या देवीचे दर्शन : काही अनुभव, काही सूचना

३ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबर अशी १२ दिवसांची तीन बहिणींची म्हणजेच आसाम, मेघालय आणि अरुणाचल प्रदेश राज्ये ; अशी (3 Sisters) आमची सहल सुखरूप पार पडली. सुखरूप अशासाठी की, इतके डोंगर, इतक्या दऱ्या इतके सारखे वळणावळणाचे अरुंद रस्ते की, टेम्पो ट्रॅव्हलर पेक्षा मोठी गाडी जाऊच शकत नाही. काही ठिकाणी तर कार, जीपनेच प्रवास करावा लागतो.

वाहन चालक अतिशय सफाईदारपणे वाहने चालवित असतातच. पण तरीही कित्येकदा आपल्या काळजाचा ठोका चुकतोच आणि आलो आहोत तर खरे, पण सुखरूप घरी पोहोचू की नाही? अशी धास्ती सारखी वाटत असते.

आमच्या सहलीच्या शेवटच्या दिवशी आसाम राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी; म्हणजेच गुवाहाटी येथे असलेल्या कामाख्या देवीचे दर्शन घ्यायचे ऐनवेळी ठरविण्यात आले. ऐनवेळी अशासाठीकी मुंबईहून निघण्यापूर्वीच आमच्या टुर ऑपरेटर नम्रता कारखानीस यांनी कामाख्या देवीच्या दर्शनासाठी ऑनलाईन बुकिंग करण्याचा प्रयत्न केला होता. पण बुकिंग फुल असल्याचे दिसून येत होते.

त्या यापूर्वीही कामाख्या देवीच्या मंदिरात येऊन गेलेल्या असल्याने, त्यांना तिथे नेमके काय चालते, कसे चालते याची चांगलीच कल्पना होती. त्यामुळे त्यांनी आदल्या दिवशी ज्यांना देवीचे दर्शन घ्यायचे आहे त्यांनी प्रत्येकी ११०० रुपये जमा करावेत, असे सांगितले. तसेच आपल्या संबंधामुळे प्रत्येकी ४०० रुपये वाचले अन्यथा जास्तीचे हजार रुपये दिल्याशिवाय स्पेशल एन्ट्री कूपन मिळतच नाही, असे ठणकावून सांगितले. नम्रता आणि निखिल कारखानीस हे दोघे आयोजक सोडून आम्ही एकूण ३७ पर्यटक होतो. त्यापैकी चार पाच जण वगळता सर्वांनी दर्शन घ्यायचे ठरविले.

खरं म्हणजे, देवीच्या स्पेशल एन्ट्री कूपनचा अधिकृत दर हा ५०१ रुपये आहे. पण जास्तीचे ६०० रुपये हे एका पंड्याला द्यायचे असून तोच पास देतो,अशी तेथील व्यवस्था असून आम्ही सर्व पर्यटन कंपन्या या व्यवस्थेपुढे हतबल आहोत,यासाठी काही तरी केले पाहिजे, अशा शब्दात नम्रता यांनी आपला उद्वेग, संताप व्यक्त केला.

आता इतके जास्तीचे पैसे भरल्याने आपले दर्शन लगेच होईल, अशा भ्रमात आम्ही होतो. अर्थात लगेच म्हणजे, दोन तास तरी



लागतील,अशी कल्पना आम्हाला देण्यात आली होती. शिवाय पहिल्यांदा ज्या हॉल मध्ये आम्हाला बसविण्यात आले होते, तो वातानुकूलित असल्याने तिथे वाट पहात बसणे सुसह्य होते. त्यात परत खाजगी चहा, कॉफी विक्रेते, करगोटे,अन्य धार्मिक साहित्य विकणारे येत जात असल्याने दोन तास कसे गेले, हे कळलेच नाही.

खरा वैताग सुरू झाला, तो या वातानुकूलित हॉल मधून अतिशय चिंचोळ्या अशा जिन्यावर जाऊन उभे राहायला लागल्यावर. हळूहळू बाजूच्या रांगेतील काही भाविक महिला मोठमोठ्याने आरडाओरडा करू लागल्या. त्यांच्या काही मुलांना घाबरेघुबरे होत होते. काहींना उलट्या, मळमळणे सुरू झाले होते. त्यामुळे त्यांचे म्हणणे होते की,आम्हाला दर्शन नको पण एकदाचे इथून बाहेर पडू द्या. या रांगेतील भाविकांकडे चौकशी केली असता, कळाले की ही बिना स्पेशल एन्ट्री कूपनच्या भाविकांची रांग असून ते बिचारे पहाटे दोन वाजेपासून रांगेत उभे आहेत!




देवेंद्र भुजबळ
मुंबई.


शेवटी एकदाचा त्या महिलांचा आरडाओरडा सुरक्षा रक्षक महिलेच्या कानी पडला आणि तिने तणतणत का होईना, मधले दार उघडून त्या महिला आणि त्यांच्या मुलाबाळांना बाहेर जाऊ दिले.

आधीच्या हॉल मध्ये निदान चहा, कॉफी, नैसर्गिक विधी करण्यासाठीची जागा तरी होती. पण या मधल्या रांगांमध्ये मात्र वाट पहात बसणे आणि होत असलेला त्रास सहन करीत बसणे या शिवाय दुसरा काही मार्ग नव्हता.

शेवटी कसेबसे एकदाचे आम्ही गाभाऱ्यापर्यंत पोहोचलो. बघतो तर काय, गाभाऱ्याच्या अलीकडेच बळी दिलेल्या काही रेडे, बकरे यांची मुंडकी पडलेली होती. आमच्यातील कट्टर शाकाहारी असलेल्यांना तर ते दृश्य बघून भोवळ यायचीच बाकी राहिली होती.

त्यात मध्ये मध्ये बसलेल्या पंड्यांचा ,इधर पैसे डालो, असा तगादा सुरू होता. शेवटी एकदाचे आम्ही अंधाराच्या मार्गे गाभाऱ्यात जाऊन दर्शन घेतले.हा गाभारा इतका चिंचोळा आहे की, एका वेळी एकच जण खाली उतरू शकतो किंवा वर येऊ शकतो. त्यामुळे या दरम्यान जर दुर्दैवाने चेंगराचेंगरी झाली तर सुटकेचा मार्ग काय? कुठूनही हवा येण्याचा,बाहेर जाण्याचा मार्ग दिसत नव्हता. शेवटी दर्शन घेऊन,अक्षरशः जीव मुठीत घेऊन आम्ही बाहेर पडलो आणि मोकळा श्वास घेतला.

सकाळी साडे आठ वाजता आलेलो आम्ही, दुपारी दोन वाजता देवीचे दर्शन घेऊ शकलो. त्यात परतीच्या विमानाची वेळ संध्याकाळी पाच वाजताची असल्याने दुपारी तीन पर्यंत आम्हाला विमान तळावर पोहोचणे आवश्यक होते.त्यामुळे आम्हाला जेवण काय, चहापाणी घ्यायला सुद्धा वेळ नव्हता. शेवटी कसेबसे आम्ही बरोबर तीन वाजता विमान तळावर पोहोचलो.

दरम्यान मंदिरात न आलेले आमचे काही सह पर्यटक, विशेषतः निवृत्त सहसचिव श्री सातपुते साहेब हे त्यांच्या बरोबर सगळ्यांचे फूड पॅक घेऊन आलेले होते. एखाद्या निर्वासितासारखे आम्ही विमान तळावरील एक कोपरा पकडून ते कसेबसे खाल्ले. पुढचे सोपस्कार पार पाडून एकदाचा आमचा जीव विमानात पडला!

उपरोक्त सर्व अनुभवांवरून एक भाविक म्हणून मला संबंधित मंदिराचे ट्रस्टी, आसाम सरकार,भारत सरकार आणि अन्य संबंधित यंत्रणा, व्यक्ती यांना पुढीलप्रमाणे सूचना कराव्याशा वाटतात, जेणेकरून ज्या श्रद्धेने सर्व भाविक इथे देशविदेशातून मोठ्या संख्येने येत असतात, त्यांच्या भावनांना ठेच पोहोचणार नाही आणि त्यांचे दर्शन सुखावह होईल.

१) सध्या देण्यात येत असलेल्या स्पेशल एन्ट्री कुपन वर कोणत्याही व्यक्तीचे नाव, गाव, वय, पत्ता,दिनांक, वेळ, इतकेच काय तर बुक नंबर, सिरीयल नंबरसुद्धा नाहीय. त्यामुळे तो सहजच हस्तांतरणीय असल्याने मला वाटते आतील कर्मचाऱ्यांशी मिलीभगत करून पंडा लोक हे पास एक गठ्ठा मिळवितात आणि त्यांचा काळा बाजार करतात.

असे करण्याची संधी त्यांना मिळू नये म्हणून ऑनलाइन पास वर संबंधित व्यक्तीचे नाव, गाव, दिनांक, वेळ असावे. तसेच या कूपनवर वर डोलाई म्हणून छापील सही आहे. पण कलेक्टर असे लिहिलेल्या जागेवर मात्र कुणाचीच छापील सुद्धा सही नाहीय!

२) उपरोक्त काहीच तपशील या स्पेशल एन्ट्री कूपनवर नसल्यामुळे कदाचित हे कूपनच पूर्णपणे बनावट, बोगस असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या कूपनवर संबंधित व्यक्तीचे नाव, गाव, वय, पत्ता, वार , दिनांक, वेळ असा तपशील असावा. तसेच भाविकाचे कूपन आणि त्या सोबत त्याचे आधारकार्ड किंवा सरकारमान्य अन्य ओळखपत्र याची खातरजमा करूनच आत सोडण्यात यावे. केवळ भ्रष्टाचार रोखण्यासाठीच नाही तर सुरक्षेच्या दृष्टीनेही ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे.

३) संपूर्ण मार्गात जिने, पायऱ्या इथे हवा खेळती राहील, ज्यांना पिण्याचे पाणी हवे, नैसर्गिक विधी करण्यासाठीची काही जागा असावी,अशी काही व्यवस्था करण्यात यावी.

४) आणखी काय सुयोग्य बदल, सुधारणा करता येतील, याचा अभ्यास करण्यासाठी मंदिराचे ट्रस्टी, प्रशासकीय अधिकारी यांनी तिरुपती देवस्थान, शिर्डीचे श्री साईबाबा मंदिर, शेगावचे श्री गजानन महाराज मंदिर अशा मंदिरांना भेटी देऊन,तेथील व्यवस्थेचा अभ्यास करून कामाख्या देवीच्या मंदिरात, परिसरात बदल घडवून आणावेत, जेणेकरून दूरदुरून आलेल्या भाविकांना तिथे आल्याचे सार्थक झाले,असे वाटेल.

जय कामाख्या मॉं .

## सफरचंद सालासकट खावे की साल काढून?

सफरचंद खाणे आपल्या आरोग्यासाठी किती महत्त्वाचे असते हे आपल्या सर्वांना माहित आहे. डॉक्टर स्वतः सफरचंद खाण्याचा सल्ला देतात. सफरचंदात खूप पोषक तत्वे असतात. पण आपण अनेकदा पाहिलं असेल की काही लोक सालासकट तसेच सफरचदं खातात आणि काहीजण त्यावरील साल काढून फक्त आतला भाग खातात. पण यातील योग्य पद्धत कोणती?





बरेच लोक सफरचंद सोलल्यानंतर खातात, ज्याचे कारण असते स्वच्छता आणि चव. तर काहीजणांना सफरचंदाचे सालही पोषक वाटते म्हणून ते सालासकट खातात. मग नक्की योग्य आहे आहे. तर तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की सफरचंद सोलून तुम्हाला जास्त पोषक तत्वे मिळत नाहीत. सफरचंदाच्या गरामध्ये फायबर, व्हिटॅमिन ए, अँटी-ऑक्सिडंट्स आणि कार्बोहायड्रेट्स भरपूर असतात, मात्र सफरचंदाच्या सालीमध्ये इतरही अनेक गुणधर्म असतात.

जर तुम्ही सालाशिवाय सफरचंद खात असाल तरः

**फुफ्फुसांचे संरक्षण** : सफरचंदाच्या सालीमध्ये क्वेर्सेटिन असते, जे एक दाहक-विरोधी संयुग असते जे फुफ्फुसांना अनेक आजारांपासून वाचवते.

**निरोगी हृदय** : सफरचंदाच्या सालीमध्ये अँटीऑक्सिडंट्स आढळतात, जे रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉलची पातळी राखण्यास मदत करतात, ज्यामुळे हृदय निरोगी राहते.

**वजन कमी करण्यास मदत करते** : सफरचंदाच्या सालीमध्ये भरपूर पोषक तत्वे असतात जी तुम्हाला जास्त वेळ पोट भरलेले ठेवतात आणि जास्त खाण्यापासून रोखतात. जर व्यायाम आणि कॅलरीजचे प्रमाण कमी केले तर ते तुमचे वजन कमी करण्यास मदत करू शकतात.

**निरोगी पचनसंस्था** : सफरचंदाच्या सालींमधील फायबर घटक वजन कमी करण्यासाठी मदत करते. जे यकृताचे आरोग्य आणि हाडांच्या आरोग्यासाठी देखील योगदान देते. मधुमेहींमध्ये पचन सुधारते आणि बद्धकोष्ठता, गॅस किंवा पोटफुगीचा त्रास असलेल्यांसाठी फायदेशीर आहे.

**जीवनसत्त्वांचा समृद्ध स्रोत** : सफरचंदांमध्ये जीवनसत्त्वे अ, के आणि क भरपूर प्रमाणात असतात. त्यात पोटॅशियम, कॅल्शियम आणि फॉस्फरस देखील असतात, ज्यामुळे ते मूत्रपिंड, हृदय, मेंदू, त्वचा आणि हाडांच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरतात.

■ ■ ■

## अशोकायन


प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)




### पांढरं सोनं ...!

माह्या वराडी भूमित
पांढरं सोनं पिकते
तरी बळीच्या अंगावर
नेहमी फाटके कुडते ...

पांढरं सोनं पिकवाया
खर्च जितका येते
त्याही परता कमी
दाम पदरी पडते ..

जय जवान जय किसान
आमचं शासन म्हणते
कष्टाचं दाम देण्यासही
कां बरे मागं पुढं पहाते ?..

# दिवाळीत आरोग्यदायी आहाराचे महत्त्व



आनंदासोबत आरोग्याचा उत्सव स्वाती अवस्थी, मुख्य आहारतज्ज्ञ, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर

**नागपूर, १६ ऑक्टोबर :** दिवाळी म्हणजे प्रकाशाचा सण, पण हा सण फक्त दिवे, फटाके आणि सजावटीपुरताच मर्यादित नाही, तर विविध स्वादिष्ट पदार्थांसह प्रेम आणि आनंद वाटण्याचा सण आहे. मिठाई, तळलेले पदार्थ आणि स्वादिष्ट जेवण हे या सणाचा महत्त्वाचा भाग आहेत. पण या उत्साहात जास्त खाल्ल्यामुळे आम्लता, अपचन आणि वजन वाढणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. या दीवाळीत, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूरच्या मुख्य आहारतज्ज्ञ स्वाती अवस्थी यांनी स्वाद आणि आरोग्य कायम ठेवत आरोग्यदायी पद्धतीने दीवाळी साजरी करण्यासाठी काही उपयुक्त टिप्स शेअर केल्या आहेत.

संतुलन सर्वात महत्त्वाचे : मुख्य आहारतज्ज्ञ स्वाती अवस्थी म्हणतात, सणासुदीच्या खाण्यात लाडू किंवा समोसा खाणं सोडून द्यायचा नाही, फक्त ते योग्य प्रमाणात खायचा. योग्य प्रमाणात खाल्ल्याने तुम्ही सणातील सर्व गोड आणि स्वादिष्ट पदार्थांचा आनंद घेऊ शकता आणि तुमचं आरोग्यही टिकवू शकता.

स्मार्ट खाण्याच्या टिप्स

* तळलेले पदार्थ टाळा- डीप-फ्रायड स्नॅक्सच्या ऐवजी बेक केलेली मठरी, खाकरे किंवा भाजलेला चिवडा खा. बेक केलेल्या समोश्याचा स्वाद तोच असतो, फक्त तेल कमी असते.
* आरोग्यदायी मिठाई निवडा - साखरेच्या मिठाई ऐवजी गूळ, खजूर, अंजीर आणि सुका मेवा पासून बनवलेली मिठाई खा.
* बदाम, अक्रोड, जवस आणि भोपळ्याच्या बिया यांचा समावेश करा. हे स्वाद आणि पोषण दोन्ही वाढवतात.
* भरपूर पाणी आणि हर्बल टी प्यायल्याने शरीरातील विषारी घटक बाहेर पडतात आणि जास्त खाण्यापासून बचाव होतो.
* सॅलड, फळे, उसळ (स्प्राऊट्स ) आणि हलके जेवण ताटात असू द्या. जेणेकरून सणाचा आनंद घेताना संतुलन टिकेल

तुमचे ताट रंगोळीप्रमाणे रंगीबेरंगी आणि पोषक बनवा.

सजगपणे खाण्याचा सल्ला : दिवाळीच्या पार्टीत गेट-टुगेदरमध्ये गप्पा मारताना किंवा टीव्ही पाहताना जास्त खाल्ले जाते. त्यामुळे बसून, हळूहळू आणि प्रत्येक घासाचा आनंद घेत खाण्याचा सराव करा. याने पचन सुधारते आणि जास्त खाण्यापासून बचाव होतो.

व्यायामालाही स्थान द्या : सणात व्यायामाला विसरू नका. सकाळी चालणे, हलके योगासन किंवा सणाच्या वेळी नाचणे या गोष्टींमुळे ऊर्जाआणि फिटनेस टिकून राहते. त्यामुळे दीवाळी अधिक उत्साही आणि आनंददायी होते.

आरोग्यदायी भेटवस्तूंची नवी परंपरा : या दीवाळीत नवीन परंपरा सुरू करा मिठाईच्या डब्यांच्या ऐवजी सुका मेवा, हर्बल टी किंवा औषधी वनस्पतींची झाडे भेट द्या. ही अशी भेट असेल जी आरोग्य आणि आनंद दोन्ही देईल.

सणाचा खरा अर्थ : दिवाळी म्हणजे प्रकाशाचा अंधारावर आणि चांगुलपणाचा वाईटावर विजयाचे प्रतीक आहे. यंदा आरोग्याचा आजारावर आणि सजग खाण्याचा अनियंत्रित खाण्यावर विजय साजरा करूया. आनंद, प्रेम आणि आरोग्यासह दीवाळी साजरी करा कारण खरा सण तोच जो चांगल्या आरोग्यासह साजरा केला जातो.

या दिवाळीत तुमचं घर दिव्यांनी उजळू दे, मन आनंदाने भरू दे आणि ताट आरोग्याने सजू दे, असा संदेश स्वाती अवस्थी यांनी दिला.

# शालिनीताई मेघे हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटरने मानस सिंगिंग क्लबची सुरूवात



**नागपूर, १६ ऑक्टोबर :** वानाडोंगरी, नागपूर येथील दत्ता मेघे मेडिकल कॉलेजशी संलग्न असलेले १०२० बेडचे मल्टी-सुपर-स्पेशालिटी हॉस्पिटल, शालिनीताई मेघे हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटरने त्यांच्या ज्येष्ठ नागरिक, पॅलिएटिव्ह केअर आणि डी-अॅडिक्शन विभागांमध्ये संगीत थेरपीची सुरुवात करून रुग्ण-केंद्रित आणि संपूर्ण आरोग्य सेवा उपक्रमाला अधिक मजबूत केले आहे.

मानस सिंगिंग क्लब या नव्या उपक्रमाद्वारे रुग्णांना संगीताच्या माध्यमातून भावनिक, मानसिक आणि आध्यात्मिक आधार मिळेल. मानसिक आरोग्य विभागाच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन डीएमआयएचईआर(डीयू) ऑफ-कॅम्पसचे संचालक डॉ. अनुप मारार यांनी वरिष्ठ शिक्षक व आरोग्य व्यावसायिकांच्या उपस्थितीत केले. यामध्ये डॉ. अभिजीत फाये, डॉ. प्रियंका बोधारे, डॉ. प्रीतम चांडक, डॉ. अपूर्वा जोशी, डॉ. अतीबा अहमद, डॉ. सुरभि बोरकर, डॉ. सीमा सिंग, डॉ. सोनिया खत्री, ब्रदर नीरज कालिहारी आणि सिस्टर विशाखा यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे समन्वयन नर्सिंग इंचार्ज श्री यशवंत वाघमारे यांनी केले, जे ज्येष्ठ नागरिक रुग्णांना सहानुभूतीपूर्ण सेवा देणाऱ्या नर्सिंग आणि पॅरामेडिकल टीमचे नेतृत्व करतात.

मानसिक आरोग्य विभागाचे प्राध्यापक व प्रमुख डॉ. पी. पाटील यांनी सांगितले की, संगीत थेरपी ही एक प्रस्थापित आणि पुराव्यावर आधारित प्रभावी पद्धत आहे, जी चिंता, नैराश्य आणि दीर्घकालीन वेदना कमी करून जीवनमान सुधारण्यास मदत करते तसेच ज्येष्ठ नागरिक आणि पॅलिएटिव्ह केअर रुग्णांमध्ये आकलनशक्ती आणि स्मरणशक्ती सुधारण्यास उपयोगी ठरते. डॉ. अभिजीत फाये यांनी सांगितले की, पॅलिएटिव्ह केअरमध्ये संगीत थेरपी रुग्णांना भावनिक व्यक्त होण्याचा मार्ग उपलब्ध करून देते आणि रुग्ण, त्यांच्या कुटुंबीय आणि काळजी घेणाऱ्यांमध्ये संवाद अधिक मजबूत करते.

रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. वसंत गावंडे यांनी सांगितले की, संगीत थेरपीचा समावेश शालिनीताई मेघे हॉस्पिटलच्या संपूर्ण आरोग्य सेवा व नवकल्पनात्मक, पुराव्यानुसार उपचार पद्धतीतल्या बांधिलकीचे प्रतीक आहे. यामुळे रुग्णांना केवळ वैद्यकीय उपचार नाही तर सन्मान, आराम आणि नव्याने आनंद अनुभवण्याची संधी देखील मिळते.

# सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स सलग सहाव्या वर्षी जागतिक ब्रँड्समध्ये ५व्या क्रमांकावर

**गुरूग्राम, १६ ऑक्टोबर :** सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सने आज घोषणा केली की, कंपनीला जागतिक ब्रँड कन्सल्टन्सी इंटरब्रँडने सलग सहाव्या वर्षी ५व्या क्रमांकाचा जागतिक ब्रँड म्हणून सन्मानित केले आहे. इंटरब्रँड दरवर्षी त्यांची 'बेस्ट ग्लोबल ब्रँड्स' यादी जारी करते. यंदाच्या यादीसाठी सॅमसंगने ९०.५ बिलियन डॉलर्स ब्रँड मूल्याची नोंद केली, ज्यासह २०२० पासून जागतिक टॉप ५ मध्ये राहणारी आशियातील एकमेव कंपनी म्हणून आपले स्थान कायम ठेवले आहे.

''एआय नाविन्यता आणि खुल्या सहयोगाच्या माध्यमातून सॅमसंगने अधिकाधिक ग्राहक त्यांच्या दैनंदिन जीवनामध्ये एआयचा अनुभव घेऊ शकण्याची खात्री घेण्यासाठी काम केले आहे,'' असे सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सच्या ग्लोबल मार्केटिंग ऑफिसचे अध्यक्ष व प्रमुख वोन-जिन ली म्हणाले. ''अधिक पुढे जात आम्ही ग्राहकांना आरोग्य व सुरक्षिततेमध्ये फायदे देण्यावर लक्ष केंद्रित करू, ज्यामुळे सॅमसंग अधिक लोकप्रिय ब्रँड म्हणून विकसित होऊ शकेल.''

'इनोव्हेशन फॉर ऑल' दृष्टिकोनांतर्गत सॅमसंग सतत जगभरातील अधिकाधिक ग्राहकांना एआय उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करते.

या वर्षी सॅमसंगने गॅलेक्सी एआयच्या सतत सुधारणेसह मोबाइल एआयमधील आपले नेतृत्व दृढ केले, ज्यामागे एआयच्या लोकशाहीकरणाला चालना देत वर्षभरात ते ४०० दशलक्ष डिवाईसेसवर उपलब्ध करून देण्याचा मनसुबा आहे.

कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स (सीई)मध्ये सॅमसंगने व्हिजन एआय आणि बीस्पोक एआय अशा प्रत्येक उत्पादन श्रेणीसाठी डिझाइन केलेले एआय तंत्रज्ञान सादर करत एआय स्पर्धात्मकता वाढवली आहे.

विविध सहयोगींसोबत खुल्या सहयोगाच्या माध्यमातून सॅमसंगने ग्राहकांसाठी वैयक्तिकृत एआय अनुभवांमध्ये सुधारणा केली आहे, तसेच सॅमसंग नॉक्ससह उद्योगामधील अग्रणी सुरक्षितता देखील देत आहे.

सेमीकंडक्टर्समध्ये सॅमसंग क्लाऊड, ऑन-डिवाईस आणि फिजिकल एआयमधील सर्वसमावेशक पोर्टफोलिओसह एआयसाठी वाढत्या मागणीची पूर्तता करत आली आहे. यामध्ये एचबीएम, उच्च क्षमतेचे डीडीआर५, एलपीडीडीआर५एक्स आणि जीडीडीआर७ अशा प्रगत उत्पादनांसाठी सक्रिय प्रतिसादाचा समावेश आहे.

एआय व्यतिरिक्त, सॅमसंग आपली उत्पादने व सर्विसेसची उपलब्धता वाढवत आहे आणि सर्व व्यवसाय विभागांमध्ये शाश्वत नाविन्यतेला गती देत आहे. यामध्ये स्मार्टथिंग्जद्वारे कनेक्ट केलेल्या ऊर्जा-कार्यक्षम अप्लायन्सेसच्या माध्यमातून ऊर्जा बचतींचा समावेश आहे.

# सॅमसंग इंडियाने पंजाबमध्ये पूरग्रस्त ग्राहकांना साह्य करण्यासाठी आपत्ती मदत व देखभाल उपक्रम सुरू केला

**गुरूग्राम, १६ ऑक्टोबर :** सॅमसंगने पंजाबमध्ये नुकतेच महापूरामुळे बाधित झालेल्या ग्राहकांना व समुदायांना मदतीचा हात पुढे करण्यासाठी समर्पित आपत्ती मदत व देखभाल उपक्रम सुरू केला आहे. हा उपक्रम आपत्तीग्रस्त भागांमध्ये आवश्यक घरगुती सेवा देण्यासाठी काळजीपूर्वक डिझाइन आखण्यात आला आहे, जेथे देखभाल शिबिरांमध्ये मुलभूत अप्लायन्सेस आणि आपत्कालीन किट्स आहेत.

वर्षानुवर्षे सॅमसंगने विविध उपक्रमांच्या माध्यमातून आव्हानात्मक काळात समुदायांना साह्य करण्यासाठी पुढाकार घेतला आहे, जसे श्रीनगरमध्ये व्हॅली ऑफ होप (२०१४), केअर फॉर केरळ (२०१८) आणि केअर फॉर महाराष्ट्र (२०१९). या हस्तक्षेपांनी हजारो व्यक्तींना मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास, त्यांचे जीवन सुरळीत करण्यास आणि आव्हानात्मक स्थितींमध्ये आशेचा किरण मिळण्यास मदत केली आहे.

प्रत्येक गजरेसाठी केअर कॅम्प

पंजाबमधील गुरदासपूरमध्ये नुकतेच आलेल्या महापूरामुळे जनजीवन विस्कळीत झाले. सॅमसंगला त्यांची संपर्क केंद्रे व सेवा केंद्रांच्या माध्यमातून साह्यतेसाठी विनंत्या मिळत आहेत. लोक पाठिंब्यासाठी सतत शिबिरामध्ये येत आहेत आणि आसपासच्या गावांमध्ये स्थानिक घोषणा व संवाद केले जात असल्यामुळे ही आकडेवारी वाढण्याची अपेक्षा आहे.

बहुतांश विनंत्या पाण्यामध्ये बुडलेले स्मार्टफोन्स, वॉशिंग मशिन्स व रेफ्रिजरेटर्ससाठी करण्यात आल्या आहेत. कुटुंबं दररोज या महत्त्वपूर्ण उपकरणांवर अवलंबून असतात. त्वरित मदतीसाठी सॅमसंगने आपल्या कस्टर सर्विस टीम्स तैनात केल्या आहेत, ज्या प्रत्यक्ष साह्य करतील.

व्यक्तींमध्ये या शिबिरांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी अधिकृत सेवा केंद्रांमध्ये शाखा कार्यलयांवर पोस्टर्स लावण्यात आली आहेत, तसेच सॅमसंग मेम्बर्सवर बॅनर्स लाइव्ह आहेत, सोशल मीडियावर पोस्ट्स वाढवण्यात येत आहेत आणि पंजाबमधील पूरग्रस्त गावांमध्ये स्थानिक घोषणा करणाऱ्या वेईकल्स तैनात करण्यात आल्या आहेत.

# एण्ड टीव्ही कलाकारांनी त्यांच्या आवडत्या दिवाळी फराळासह वर्ल्ड फूड डे साजरा केला!




**नागपूर, १६ ऑक्टोबर :** वर्ल्ड फूड डे निमित्त एण्ड टीव्ही कलाकार दिवाळी सण जवळ आला असताना ते घरी बनवल्या जाणाऱ्या फराळाबाबत सांगत आहेत. नीहारिका रॉय (सावी, 'घरवाली पेडवाली), सोनल पनवार (मलायका, 'हप्पू की उलटन पलटन') आणि रोहिताश्व गौड (मनमोहन तिवारी, 'भाबीजी घर पर है'), जे त्याच्या घरी बनवल्या जाणाऱ्या दिवाळी फराळाला खास बनवणाऱ्या पाककलांबाबत सांगत आहेत.

आगामी मालिका 'घरवाली पेडवाली' मधील नीहारिका रॉय ऊर्फ सावी म्हणाल्या, ''दिवाळीला माझ्या घरामध्ये नेहमी तूप, साखर व त्यासोबत आनंदाचा सुगंध येतो. माझी आई नेहमी बेसनाचे लाडू बनवते, जे मी पाहत मोठे झाले आहे आणि आता मी दरवर्षी तिला लाडू बनवण्यामध्ये मदत करते.''

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील सोनल पनवार ऊर्फ इन्स्पेक्टर मलायका म्हणाल्या, ''मी खूप फूडी आहे आणि दिवाळीला मी मनसोक्त फराळाचा आस्वाद घेते. माझी नानी आणि मी एकत्र चकली व शंकरपाली बनवायचो आणि आजही ही परंपरा सुरू ठेवली आहे.''

'भाबीजी घर पर है'मधील रोहिताश्व गौड ऊर्फ मनमोहन तिवारी म्हणाले, ''प्रत्येक दिवाळीला माझ्या घरी गुजिया बनवले जातात. माझ्या आईची पाककला नेहमी माझी आवडती राहिली आहे आणि आता माझ्या पत्नीने देखील तीच परंपरा कायम राखली आहे.''

# दिवाळीला होणार मोठा धमाका!



**मुंबई, १६ ऑक्टोबर :** यंदा दिवाळीला एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन' आणि 'भाबीजी घर पर है'च्या आगामी एपिसोडमध्ये हास्य, नशीब आणि संपन्नता पाहायला मिळणार आहे. मालिका 'हप्पू की उलटन पलटन'च्या एपिसोडबाबत राजेश ऊर्फ गीतांजली मिश्रा म्हणाल्या, ''हप्पूला (योगेश त्रिपाठी) स्वप्न पडते की, लक्ष्मीदेवी स्वत: यंदा दिवाळीला त्यांच्या घरी आशीर्वाद देण्यासाठी येणार आहे. आपले नशीब बदलणार या आशेने तो राजेशला त्या स्वप्नाबाबत सांगतो. दरम्यान काही काळापूर्वी हप्पूकडून कर्ज घेतलेला आणि कर्जाची परतफेड करू न शकलेला बेनी (विश्वजीत चॅटर्जी) त्याला त्यावरील तोडगा म्हणून लॉटरीचे तिकिट देतो. हप्पू राजेशकडे लॉटरीचे तिकिट सुरक्षितपणे ठेवण्यासाठी देतो, पण ती नकळतपणे तिच्या पॅण्टमध्ये ते तिकिट ठेवते, ज्यानंतर पॅण्टसोबत तिकिट देखील धुतले जाते आणि तिकिट खराब होते. हप्पूच्या प्रतिक्रियेला घाबरत ती सत्य लपवते, दरम्यान मनोहर (नितीन जाधव) ते लपवण्यासाठी खोटे लॉटरीचे तिकिट बनवतो. स्थितीला गोंधळात्मक वळण मिळते, जेथे कमिशनर (किशोर भानुशाली) देखील प्लॅनमध्ये सामील होतो आणि तथाकथित लॉटरी एजंट स्टॅम्प पेपर व उर्वरित कायदेशीर औपचारिकांसाठी २ लाख रूपयांची मागणी करतो. सर्वजण त्या रात्री श्रीमंत होण्याचे स्वप्न पाहू लागतात, पण या प्लॅनमुळे खरंच लक्ष्मी घरी येईल का की ते अधिक संकटात सापडतील?''

मालिका 'भाबीजी घर पर है'च्या एपिसोडबाबत शुभांगी अत्रे ऊर्फ अंगूरी भाबी म्हणाल्या, ''दिवाळीसाठी केल्या जाणाऱ्या साफसफाईला विनोदी वळण मिळते, जेथे अनिता (विदिशा श्रीवास्तव) व विभुती (आसिफ शेख) घरकामावरून एकमेकांशी भांडतात. अंगूरीला प्रभावित करण्यासाठी विभुती खोटे सांगतो की, त्याने क्लीनिंग सर्विस सुरू केली आहे. त्याच वेळी हप्पू कॉलनीमधील एक जोडपे संशयित दरोडेखोर असण्याबाबत चेतावणी देतो. साफसफाई करण्यासाठी भेट दिल्यानंतर विभुतीला नकळतपणे तिवारी (रोहिताश्व गौड) आणि अंगूरी यांचा दरोडेखोरांच्या वेषातील फोटो सापडतो. तो घाबरून जातो, त्याला वाटते की ते गुन्हेगार आहेत. त्यानंतर विनोदी मनोरंजन सुरू होते, जेथे विभुती अंगूरी व तिवारी यांच्यावर नजर ठेवण्यास सुरूवात करतो, तर तिवारीला अनिताच्या कधीच न संपणाऱ्या साफसफाई मागण्यांचा सामना करावा लागतो. पण, विभुतीच्या धक्कादायक शोधानंतर तिवारी व अंगूरी तथाकथित दरोडेखोर म्हणून उघडकीस येतील का? की यंदा दिवाळीला मॉडर्न कॉलनीमध्ये विनोदी ट्विस्ट पाहायला मिळेल?''

# ऑक्सिस फायनान्सकडून उदयोन्मुख भारतासाठी शक्ती - कमी रकमेच्या मालमत्ता कर्जाचा पर्याय

**नागपूर, १६ ऑक्टोबर :** भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या नॉन-बँकिंग वित्तीय कंपन्यांपैकी एक असलेल्या ऑक्सिस फायनान्स लिमिटेडने (एएफएल) आज धनत्रयोदशीच्या शुभ मुहूर्तावर ऑक्सिस फायनान्स शक्ती, मायक्रो लोन अगेन्स्ट प्रॉपर्टी (मायक्रो एलएपी) उत्पादन लाँच करण्याची घोषणा केली. व्यावसायिक तसेच वैयक्तिक गरजांसाठी योग्य असे आर्थिक पर्याय उपलब्ध करून देऊन ग्राहकांना सक्षम करण्यासाठी हे उत्पादन डिझाइन केले आहे.

ऑक्सिस फायनान्स शक्ती हे उत्पादन, व्यापार आणि सेवा क्षेत्रातील अत्यंत छोटेउद्योजक, व्यापारी आणि स्वयंरोजगार असलेल्या व्यक्ती तसेच पगारदार ग्राहकांना सेवा देण्यासाठी डिझाइन केले आहे. योग्य कागदपत्रांमुळे काम अडणार नाही, याची देखील पुरेपूर काळजी घेण्यात आली आहे. विविध व्यवसाय प्रोफाइलसाठी हे उत्पादन क्रेडिटची औपचारिक उपलब्धता वाढविण्याचा प्रयत्न करते. सोप्याप्रक्रिया, कालावधीचा लवचिकपर्याय आणि तारण म्हणून विस्तृत श्रेणीतील मालमत्तांच्या स्वीकृतीसह, ऑक्सिस फायनान्स शक्ती ग्राहकांना व्यवसाय वाढीसाठी, खेळत्या भांडवलाची गरज किंवा वैयक्तिक उद्दिष्टांसाठी त्यांच्या मालमत्तेचा वापर करण्यास सक्षम करते. उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये ग्राहक-केंद्रित आणि सानुकूलित आर्थिक उपाय प्रदान करण्याच्या एएफएलच्या वचनबद्धतेला हे बळकटी देते.

या लॉंचिंगबद्दल ऑक्सिस फायनान्स लिमिटेडचे एमडी आणि सीईओ, साई गिरिधर म्हणाले, धनत्रयोदशीला ऑक्सिस फायनान्स शक्तीचे लॉंचिंग होणे म्हणजे आर्थिक समावेशन आणि ग्राहक-केंद्रित उपायांसाठी असलेली आमची वचनबद्धता सातत्याने अधोरेखित होते आहे. औपचारिक कर्ज मिळविण्यात अनेकदा आव्हानांचा सामना करावा लागतो, असे छोटे उद्योजक, व्यापारी आणि स्वयंरोजगार असलेल्या व्यक्तींना सेवा देण्यासाठी या उत्पादनाची रचना केली आहे. लवचिक कालावधी, व्यापक तारण स्वीकृती आणि सरलीकृत दस्तऐवजीकरण देऊन, शक्ती ग्राहकांना व्यवसाय आणि वैयक्तिक वाढीसाठी त्यांच्या मालमत्तेची क्षमता उघड करण्यास सक्षम करते. आम्हाला विश्वास आहे की, हा उपक्रम क्रेडिट गॅप भरून काढण्यास आणि उदयोन्मुख विभागांमध्ये प्रगती करण्यास मदत करेल.

# भारती एअरटेलने एअरटेल क्लाउड ला अधिक सक्षम करण्यासाठी आयबीएमसोबत धोरणात्मक एक महत्त्वपूर्ण भागीदारीची घोषणा



**मुंबई, १६ ऑक्टोबर :** भारतातील अग्रगण्य दूरसंचार सेवा प्रदात्यांपैकी एक असलेल्या भारती एअरटेलने त्यांच्या नुकत्याच सुरू केलेल्या एअरटेल क्लाउड ला अधिक सक्षम करण्यासाठी आयबीएम सोबत धोरणात्मक भागीदारी केली आहे. या भागीदारीमुळे एअरटेल क्लाउडची टेल्को-ग्रेड विश्वसनीयता, उच्च दर्जाची सुरक्षा आणि डेटा रेसिडेन्सी (स्थानिक डेटा संचयन) आयबीएमच्या क्लाउड तंत्रज्ञान आणि विशेषतः आर्टिफिशियल इंटेलिजन्ससाठी (एआय) बनवलेल्या आधुनिक सॉफ्टवेअरसोबत जोडली जाईल.

एकत्रितपणे, एअरटेल आणि आयबीएम या दोन्ही कंपन्यांचे उद्दिष्ट नियमनाधीन उद्योगांतील उद्योगसंस्थांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वर्कलोड्स अधिक कार्यक्षमतेने वाढविण्यास सक्षम बनविणे आहे. ही भागीदारी ऑन-प्रिमाइस (स्थानिक सर्व्हर), क्लाउड, एकापेक्षा जास्त क्लाउड्स आणि एज इन्फ्रास्ट्रक्चर यांसह सर्व स्तरांवर अखंड इंटरऑपरेबिलिटी (परस्पर सुसंगतता) प्रदान करण्यास मदत करेल.

गोपाल विट्ठल, उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, भारती एअरटेल, म्हणाले, एअरटेल क्लाउड अत्यंत सुरक्षित आणि नियामक अनुरूप (कम्प्लायंट) राहील, अशा प्रकारे तयार करण्यात आले आहे. हे एक चपळ आणि लवचिक (रेझिलियंट) क्लाउड प्लॅटफॉर्म म्हणून उद्योगात नवे मापदंड निर्माण करत आहे. आज, आयबीएम सोबतच्या या भागीदारीमुळे आम्ही आमच्या क्लाउड प्लॅटफॉर्ममध्ये अनेक महत्त्वपूर्ण क्षमता जोडत आहोत, ज्यामुळे आयबीएम पॉवर सिस्टम्स वरून स्थलांतराची आवश्यकता असलेल्या आणि एआय-सक्षमतेसाठी अपेक्षित असलेल्या विविध उद्योगांच्या गरजा पूर्ण केल्या जातील. या भागीदारीद्वारे, आम्ही भारतातील आमच्या उपलब्धता क्षेत्रांची संख्या चारवरून दहापर्यंत वाढवत आहोत, आणि या सर्व झोन आमच्या स्वतःच्या पुढील पिढीतील शाश्वत डेटा सेंटर्समध्ये होस्ट केली जातील. तसेच, आम्ही एकत्रितपणे लवकरच मुंबई आणि चेन्नई येथे दोन नवीन मल्टिझोन रीजन्स स्थापन करणार आहोत.

रॉब थॉमस, वरिष्ठ उपाध्यक्ष आणि मुख्य व्यावसायिक अधिकारी, आयबीएम, म्हणाले, आजच्या काळात उद्योगसंस्थांना आधुनिकीकरणासोबत वाढत्या नियमनाधीन तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) संबंधी आवश्यकतांमध्ये संतुलन राखणे गरजेचे आहे. भारती एअरटेलसोबतच्या आमच्या या भागीदारीद्वारे, भारतभरातील ग्राहकांना आयबीएमच्या नाविन्यपूर्ण क्लाउड सेवांचा लाभ घेता येईल, ज्या त्यांच्या धोरणात्मक व्यवसाय प्राधान्यांना पूरक अशा वर्कलोड्ससाठी डिझाइन केल्या आहेत. आम्ही एकत्रितपणे एआय(एआय) च्या युगात ग्राहकांना खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवून आणण्यास मदत करू.

# कोटक सिक्युरिटीजने यंदाच्या दिवाळीच्या मुहूर्त ट्रेडिंगनिमित्त गुंतवणूकीसाठी निवडलेले मुख्य समभाग

**मुंबई, १६ ऑक्टोबर :** कोटक सिक्युरिटीजच्या प्रमुख इक्विटी रिसर्च, श्रीकांत चौहान यांनी दिवाळी मुहूर्त ट्रेडिंगसाठी निवडलेले टॉप स्टॉक्स पुढीलप्रमाणे आहेत: अडानी पोर्ट्स एंड एसईजेड, एक्यूटास केमिकल, कमिंस इंडिया, इटर्नल, आईसीआयसीआय बँक, महिंद्रा एंड महिंद्रा, रिलायंस इंडस्ट्रीज अमेरिकेत व्याजदर कपातीला सुरुवात झाली आहे. परंतु फेडरल बँक सावधानतेची भूमिका घेईल, असा आमचा अंदाज आहे. व्यापार शुल्क युध्दामूळे चालू वर्ष २५ मध्ये दुसऱ्या सहामाहीत अमेरिकी अर्थव्यवस्थेची वाढ ही मध्यम पातळीवर राहण्याची अपेक्षा आहे, परंतु ग्राहकांच्या उत्पन्नातील वाढीमुळे अमेरिकी अथव्यवस्थेला मंदीचे संकट टाळण्यास मदत होईल. वाढीव व्यापार शुल्काचा परिणाम ग्राहक वस्तू किंमतीत दिसण्यास सुरुवात होणार असल्यामुळे चालू वषाच्या २५ मधील चौथ्या तिमाहीत महागाई दर उसळी मारण्याची शक्यता आहे.

आम्ही बाजार, सेक्टर आणि शेअर्सच्या मूल्यांकनाच्या आधारावर ७ संभाव्य स्टॉक आयडियाज निवडले आहेत, जे संवत २०८२ मध्ये चांगले प्रदर्शन करू शकतात.

अडानी पोर्ट्स एंड एसईजेड : १,९०० रुपये, एक्यूटास केमिकल : १,७८० रुपये, कमिंस इंडिया : ४,४०० रुपये, इटर्नल : ३७५ रुपये, आईसीआईसीआई बैंक : १,७०० रुपये, महिंद्रा एंड महिंद्रा : ४,००० रुपये, रिलायंस इंडस्ट्रीज : १,५५५ रुपये

व्यापार धोरणातील अनिश्चिततेमुळे युरोपात अर्थव्यवस्थेवर ताण राहण्याची शक्यता असताना, नजीकच्या काळात जीडीपी वाढ केवळ माफक प्रमाणात घटण्याची आणि नंतर २०२५ च्या अखेरीस आणि २०२ च्या सुरुवातीला वाढण्याची अपेक्षा आहे. याला कारण म्हणजे दरकपात आणि राजकोषीय सवलतीमुळे जीडीपीत वाढ होईल. तथापि, भूराजकीय आणि स्पर्धात्मक पातळीवर अनेक मोठी आव्हाने अजूनही उभी आहेत, तसेच उत्पादकतेत धिमी वाढ ही या भागासाठी अजुनही एक महत्त्वाचा अडथळा आहे. चीनच्या दृष्टिकोनावर तसेच भूमिकेवर परिणाम करणारे प्रमुख घटक म्हणजे सध्या व्यापार क्षेत्रात निर्माण झालेली अनिश्चितता, वाढ स्थिर राहण्यासाठी आर्थिक वाढीला प्रतिरोध करणाऱ्या प्रवाहांवर मात करण्यासाठी आर्थिक धोरणाची अंमलबजावणी आणि अलिकडच्या काळात डीपसीकच्या यशातून दिसलेली नवोपक्रमाची लाट हे आहेत. तेथे देशांतर्गत आघाडीवर, सरकारकडून अतिरिक्त धोरणात्मक प्रोत्साहन योजना जाहीर होण्याच्या अपेक्षा आता कमी झाल्या आहेत. तसेच गृहनिर्माण क्षेत्रात घरांची मागणी अजुनही कमकुवत असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे.

## राशीभविष्य

**मेष :** कौटुंबिक सौहार्द राखण्यात तुम्ही महत्त्वाची भूमिका बजावाल. काही लोक तुमच्या व्यवसायात खूप मदतगार ठरतील आणि तुम्हाला दुसजया कंपनीत काम करण्याची संधी मिळेल.

**वृषभ :** प्रेमी युगुलांसाठी आजचा दिवस खूप छान असेल. मीडिया आणि कम्युनिकेशनशी संबंधित व्यवसायात यश मिळण्याची शक्यता आहे. या संधीचा पुरेपूर वापर करा.

**मिथुन :** तुमचे आरोग्य चांगले राहील. इतरांचे दृष्टिकोन समजून घेण्याचा प्रयत्न करा; हे फायदेशीर ठरेल. तुम्ही तुमच्या प्रियजनांना मदत कराल. वैयक्तिक कारणांमुळे व्यवसायावर तुमचे लक्ष मर्यादित होईल.

**कर्क :** आज, कोणत्याही गोष्टीची चिंता न करता, तुम्ही मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या खूप उत्साही वाटेल.तुमचे वरिष्ठ तुम्हाला कोणत्याही महत्त्वाच्या ऑफिसच्या कामात मदत करतील.

**सिंह :** तुमच्या सध्याच्या व्यवसायात नवीन गोष्ट, फायदा होण्याची शक्यता आहे. अधिकृत प्रवास आणि पदोन्नती शक्य आहे. वैवाहिक जीवन आदर आणि प्रेमाने भरलेले असेल. भावनात्मक असताना निर्णय घेणे टाळा.

**कन्या :** जवळच्या नातेवाईकांच्या आगमनाने घरात उत्सवाचे वातावरण निर्माण होईल. विविध विचारांची देवाणघेवाण होईल. कर्मचाजयांच्या पाठिंब्यामुळे ताण कमी होईल. तब्येतीकडे लक्ष पुरवा.

**तुळ :** नियमित दिनचर्या आणि आहारामुळे निरोगी आणि उत्साही रहाल. तुमच्याकडे स्वत:ची कामे करण्याची क्षमता असेल. आर्थिक परिस्थितीमुळे तुम्हाला कौटुंबिक खर्चात कपात करावी लागू शकते.

**वृश्चिक :** ज्यामुळे ते पूर्ण करणे सोपे होईल. आज, तुम्ही कौटुंबिक समस्यांवर शांततापूर्ण उपाय शोधू शकाल. सामाजिक कार्यात देखील सहभागी व्हाल. व्यावसायिक भागीदारांसोबतचे संबंध सुधारतील.

**धनु :** घरातील महत्वाच्या समस्या सुटतील. वरिष्ठ कर्मचाजयांचा सल्ला घ्या. तुम्ही तणावमुक्त राहाल आणि वैयक्तिक बाबींवर लक्ष केंद्रित कराल. मुलांच्या करिअरशी संबंधित बाबींमध्ये सहभागी होऊ शकता.

**मकर :** सध्या वाढत्या खर्चात कपात करणे अशक्य असले तरी, संयम बाळगा. रागावण्याऐवजी, शांततेने समस्या सोडवा. दुपारनंतर परिस्थिती सुधारेल. तुम्ही वैयक्तिक आणि सामाजिक कार्यात रस घ्याल.

**कुंभ :** विद्यार्थ्यांना आज अभ्यासात एक नवीन बदल अनुभवायला मिळेल, जो त्यांच्या भविष्यासाठी फायदेशीर ठरेल. तुमचे आरोग्य चांगले राहील. तुम्ही प्रियजनांसोबत खूप छान वेळ घालवाल.

**मीन :** तुमच्या पालकांसोबतचे तुमचे संबंध सुधारतील. तुमचा जोडीदार तुमच्या बोलण्याने प्रभावित होईल. आज तुम्हाला गोंधळ आणि रागाची भावना येऊ शकते, ज्यामुळे कुटुंबातील सदस्य चिंतेत पडतील.

# 'तुम से तुम तक' ही मालिका १०० भाग पूर्ण करत गाठत आहे एक खास पल्ला!

**मुंबई, १६ ऑक्टोबर :** झी टीव्हीवरील प्रेक्षकांची मने जिंकणाऱ्या तुम से तुम तक या मालिकेच्या सेटवर सध्या जल्लोषाचे वातावरण आहे कारण मालिकेने आपले १०० भाग अभिमानाने पूर्ण केले आहेत. मालिकेच्या मनाला भिडणाऱ्या कथानकाच्या हा पल्ला पुरावा आहे, ज्यात भारतीय मध्यमवर्गीय जीवनाचा खरा आत्मा सुरेखपणे रेखाटला आहे. आपलीशी वाटणारी पात्रे, त्यांचे दैनंदिन संघर्ष, कुटुंबातील नातेसंबंध, स्वप्ने आणि परंपरा व आधुनिकतेचा समतोल या सगळ्यामधून ही मालिका मध्यमवर्गीय जीवनाचा नाजूक छटा वास्तविकतेसह दर्शवत आहे आणि म्हणूनच ते प्रेक्षकांची आवडती ठरली आहे.

शरद केळकर म्हणाला, आतापर्यंतचा प्रवास खूपच सुंदर राहिला आहे आणि आमच्या प्रेक्षकांच्या प्रेम आणि पाठिंब्याने तो अधिक संस्मरणीय बनला आहे. या खास प्रसंगी, आमच्या पात्रांसोबत जोडून घेतल्याबद्दल आणि त्यांच्या कथामध्ये सहभागी झाल्याबद्दल मी प्रेक्षकांचे मनापासून आभार मानतो.

निहारिका चौकसी म्हणाली, तुम से तुम तक चे १०० भाग पूर्ण होणे हे माझ्यासाठी एक स्वप्न साकार झाल्यासारखे आहे. हा प्रवास अनुच्या आत्मा, तिच्या साधेपणाला, तिच्या स्वप्नांना आणि प्रेमावरील तिच्या अढळ विश्वासाला सामावून घेणारा आहे.

सर्व कलाकार आणि तंत्रज्ञांसोबत सेटवर केक कापून आम्ही भावनिक क्षण शेअर करून हा पल्ला साजरा करण्यात आला. हा खास क्षण साजरा करत असताना आता पडद्यावरील नाट्यही अधिक रोचक होत आहे. सध्या सुरू असलेल्या कथानकात अनुला जाणवते की एक रहस्यमयी माणूस तिचा पाठलाग करत आहे. दरम्यान, जालंधरचा सूडाचा डाव अधिक गहन होत जातो कारण तो नीलला आपल्या योजनेत ओढतो आणि त्यामुळे पुढे एक भावनिक वादळ उभे राहते.

# जागतिक आयोडीन कमतरता दिनाच्या पूर्वसंध्येला आयोडीनबाबत जनजागृतीचे नेतृत्व टाटा सॉल्टकडे

**अमरावती, १६ ऑक्टोबर :** यंदाच्या जागतिक आयोडीन कमतरता दिनाच्या निमित्ताने, भारतातील आयोडीनयुक्त मिठाचा अग्रदूत आणि बाजारातील आघाडीचा ब्रँड टाटा सॉल्टने देशभरातील मुलांमधील आयोडीनच्या कमतरतेमुळे उद्भवणाऱ्या आजाराविरुद्ध (आयडीडी) लढा देण्याच्या आपली कटिबद्धता पुन्हा एकदा व्यक्त केली आहे. देशातील पहिले राष्ट्रीय पातळीवरचे आयोडीनयुक्त मीठ म्हणून, टाटा सॉल्ट हा ब्रँड लोकांमध्ये आयोडीनचा सूक्ष्म पण अत्यावश्यक पोषक घटकाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे कार्य सातत्याने करीत आहे. विशेषत: बाल्यावस्थेतील बौद्धिक विकासासाठी आयोडीन हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने टाटा सॉल्टचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

आयोडीनयुक्त मीठ हे फक्त सरकारने अनिवार्य केलेला पूरक आहार नसून, तो आपल्या स्वयंपाकघरातील एक साधा घटक आहे. मीठ आपल्या अन्नाला केवळ चव देत नाही, तर आपल्या आरोग्याचीही अनेक प्रकारे संरक्षण करते. मीठ हे सर्वत्र वापरले जाणारे उत्पादन असल्यामुळे, त्याद्वारे आयोडीनचा पुरवठा करणे ही सर्वात प्रभावी पद्धत ठरली आहे. युनिव्हर्सल सॉल्ट आयोडायझेशन या कार्यक्रमाद्वारे जगभर आयोडीन अभावजन्य आजार (आयडीडी) रोखण्यासाठी यशस्वी प्रयत्न झाले आहेत.

# झी टीव्हीचा अपनोत्सव घेऊन येत आहे हृदयस्पर्शी कथा

**नागपूर, १६ ऑक्टोबर :** भारत सगळ्यात आनंददायी अशा सणांच्या काळात प्रवेश करत असताना झी टीव्ही वाहिनी करवा चौथ, धनतेरस, दिवाळी आणि भाऊबीज या सणांना केवळ साजरे करण्यापुरते न ठेवता त्या सणांना कथा, एकत्र येणे आणि आपलेपणाचा उत्सव बनवण्यासाठी सज्ज आहे. आपली नवीन ओळख आपका अपना झी टीव्हीनुसार ही वाहिनी घेऊन येत आहे अपनोत्सव - एक महिनाभर चालणारा उत्सव, जो कुटुंब, हास्य आणि सामूहिक परंपरांचा जादुई संगम सोशल मीडिया, ऑन-एअर आणि ऑन-ग्राऊंड या सर्व प्लॅटफॉर्म्सवर एकत्रित अनुभव म्हणून सादर करेल.

गेल्या तीन दशकांहून अधिक काळापासून झी टीव्हीने भारतीय दूरदर्शनवरील सणांच्या कार्यक्रमांची परंपरा पुढे नेली आहे. कुटुंबांना एकत्र आणणारे भव्य कार्यक्रम आणि विशेष भाग प्रेक्षकांना सादर केले आहेत. अपनोत्सवच्या माध्यमातून झी टीव्ही पुन्हा एकदा सणासुदीचा काळ घराघरात उजळवणार आहे, नात्यांचा आणि आपलेपणाचा उत्सव बनवत आहे. सुनील ग्रोव्हर सोनूच्या भूमिकेत दिसणार असून हे कॅम्पेन घरी परतण्याचा आनंद आणि आपलेपणाच्या भावनेत सुंदररित्या व्यक्त करते. महिनाभर चालणाऱ्या मोहिमेत प्रेक्षकांना विविधरंगी आणि आकर्षक कार्यक्रमांचा संगम पाहायला मिळणार आहे. झी टीव्हीवरील लोकप्रिय नवीन मालिका जगधात्रीचा विशेष भाग, आयडियाबाज नवकल्पना आणि उद्योजकतेचा उत्सव सादर करणारा रिअॅलिटी शो, झी रिश्तों का मेला दिवाळी विशेष भाग आपुलकीच्या नात्यांचा उत्सव; तसेच ब्लॉकबस्टर चित्रपटांचे प्रीमियर आणि महा एपिसोड्सचा सतत प्रवाह. सणांचा उत्सव फक्त पडद्यापुरता मर्यादित न ठेवता, झी टीव्ही एक अनोखी आणि पहिल्यांदाच सादर होणारी इंटरॅक्टिव्ह ऑन-एअर स्पर्धा घेऊन येत आहे. ही स्पर्धा प्रेक्षकांनाही सहभागी करून घेईल.

# दियाच्या फटकळ आईच्या रूपात रितू वशिष्ठ सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत नाट्य आणि मोहकता वाढवते



**मुंबई, १६ ऑक्टोबर :** सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत अन्विता (सुंबुल तौकीर खान) आणि तिच्या भावंडांची गोष्ट आहे, जे सर्व मिळून आपले खडतर जीवन हिंमतीने, आशेने आणि चिकाटीने जगत आहेत. त्यांच्या वडिलांच्या सुहासच्या (वरुण बडोला) डोक्यावर कर्जाचे ओझे आहे आणि त्याने वारंवार घेतलेल्या चुकीच्या निर्णयांमुळे त्याच्या कुटुंबाची दुर्दशा झाली आहे. अशा परिस्थितीमुळे कुटुंबाचा भार अकाली अन्वितावर येऊन पडला आहे. प्रत्येक आव्हान पार करताना तिचा दृढनिश्चय आणि तिची लढण्याची जिद्द ही तिची ताकद बनते आणि त्याच्या बळावर ती आजवर आपल्या कुटुंबाला एकत्र ठेवण्यात यशस्वी झाली आहे. या कथानकात अलीकडेच जेव्हा अभिनेत्री रितू वशिष्ठची एंट्री झाली आहे. ती फीबी फर्नांडिसची भूमिका करत आहे. फीबी ही अन्विताची खास मैत्रीण दिया (मनिका मेहरोत्रा) ची फटकळ आणि हेकेखोर स्वभावाची आई आहे. तिच्या आगमनामुळे या कथानकात एक गंमत आणि प्रत्यक्ष जगाचा दृष्टिकोन आला आहे, ज्यामुळे विविध पात्रांमध्ये नाती आणि अधिक गतिशील आणि समृद्ध झाली आहेत.

फीबी ही सर्वसामान्य आईसारखी नसली, तरी तिचे आपल्या मुलीवरील प्रेम तसेच अढळ आहे. ती दियाचे हित आणि संरक्षण याची सतत काळजी करत असते. आपल्या स्वभावाला धरून बऱ्याचदा फीबीचे रोखठोक आणि त्याला उघडपणे विरोध केला, पण दियाचा आनंद जपण्याच्या अन्विताने तिला दिलेला सल्ला तिने मानला होता. तिला जेव्हा कळेल की तिची सर्व आधीपासून विवाहित असून दियाशी विवाह करण्यासाठी तो घटस्फोट मिळवण्याच्या मागे लागला आहे, तेव्हा ती काय प्रतिक्रिया देते, हे बघणे रोचक असेल.

रितू म्हणाली, मला फीबीची भूमिका करताना आपलेपणा, चातुर्य आणि मोहकता आणता आली आहे. ती एक अशी आई आहे जी लुडबूड करते पण तिचा उद्देश चांगला असतो. तिच्या येण्यामुळे इत्ती सी खुशी मालिकेत विनोद, भावनिकता आणि एक नवी ऊर्जा आली आहे.

आपल्या भूमिकेबाबत बोलताना रितू वशिष्ठ म्हणाली, फीबी एक कणखर, ममताची आणि उत्साही स्त्री आहे. ती सर्वसामान्य मातेसारखी नाही. हीच गोष्ट मला फार आवडते. तिला जे वाटते, ते ती बोलते, आपल्या मताबर ठाम असते पण या सगळ्याच्या मुळाशी आपल्या मुलीविषयीचे तिचे प्रेम आहे. ती भूमिकेच्या बाबतीत मला आवडलेली एक गोष्ट म्हणजे तिच्यातील गांभीर्य आणि विचित्रपणा यांचे संतुलन. फीबी आपल्या मुलीच्या सुरक्षेबाबत फारच दक्ष आहे, पण कधीकधी तिच्या लहरी स्वभावामुळे गंमतीशीर प्रसंग उद्भवतात. हलका-फुलका विनोद निर्माण होतो, जो लोकांना नक्की आवडेल असे मला वाटते.


गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

जा.क्र./गोंवि/म.वि.वि.वि./१७५८/२०२५ जाहिर सूचना दिनांक :१६/१०/२०२५

महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचा हस्तांतरणावर आक्षेप, हरकती व सुचना नोंदविण्याबाबत

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, [illegible] महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाच्या हस्तांतरणाबाबत प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सदर व्यवस्थापनाच्या हस्तांतरणासंबंधी कोणाचे आक्षेप, हरकती व सूचना असल्यास त्यांनी विद्यापीठाकडे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत सादर कराव्यात. [illegible]

कुलसचिव

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी युवक चढले टॉवरवर

■ महासागर प्रतिनिधी
**उमरखेड, दि. १६ :**




शहरातील स्थानिक छत्रपती शिवाजी महाराज चौकातील लीज संपलेला पेट्रोल पंप हटवा, पंपाच्या अतिक्रमण काढण्यावरून कामात हलगर्जी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे नोंदवा आदी मागण्यावरून मागील १७ दिवसांपासून सुरु असलेल्या उपोषणाची दखल प्रशासनाने न घेतल्याने छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ समितीच्या दोन सदस्यांनी चक्क एका हातात फाशीचा दोर व दुसऱ्या हातात पेट्रोल भरलेली बाटली घेवून नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजी मार्केटच्या टॉवरवर पोहचल्याने प्रशासनात एकच खळबळ उडाली.

दरम्यान चक्क चार तासानंतर टावरवर चढून पोलिसांनी आंदोलनकर्त्या दोघांना ताब्यात घेतल्यानंतर प्रशासनाने सुटकेचा स्वास सोडला मात्र या चार तासा दरम्यान आज आठवडी बाजाराच्या दिवशी उमरखेड शहरवासीयांची मोठ्या प्रमाणात वाहतूक विस्कळीत झाली होती.

गजानन देशमुख व गोपाल झाडे या उपोषण कर्त्यांनी पेट्रोलपंपासमोर आमरण उपोषण सुरु असताना समोरील नगर परिषद छत्रपती शिवाजी महाराज मार्केटच्या टॉवरवर जावून घोषणा देणे सुरु केले होते.

---

**कोर्ट विद्यमान श्रीमती पुनम कदम, अप्पर तहसीलदार, देवलापार यांचे न्यायालय**

प्र.क्र. /एम.आर.सी. ८१/२०२५
मौजा कडबिखेडा, ता. रामटेक
जि. नागपूर

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी नवीन मंगल इनवाते रा. टूयापार ता. रामटेक जिल्हा नागपूर यांनी त्यांचा जन्म दिनांक २०/१२/२०१० रोजी राहते घरी टूयापार ता. रामटेक येथे झाला परंतू त्यावेळेस अर्जदाराचे कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीनी अर्जदारांची जन्माची नोंद संबधीत गट ग्रामपंचायत कार्यालय वंडबा ता. रामटेक येथे केली नाही. त्याबाबत गट ग्रामपंचायत वंडबा यांनी दिनांक ०१/०४/२०२५ रोजी प्रमाणपत्र दिले आहे. करीता नामे नवीन मंगल इनवाते यांच्या जन्माची नोंद गट ग्रामपंचायत वंडबा ता. रामटेक येथे करण्याबाबत आदेश देणेकरीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त नामे नवीन मंगल इनवाते, राह, टूयापार ता. रामटेक यांचा जन्मदिनांक २०/१२/२०१० ची नोंद मोजा टूयापार ता. रामटेक येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक १६/१०/२०२५ पावेतो आपले आक्षेपअथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वत: उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ३०/०९/२०२५ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ :- देवलापार
दिनांक :- ३०/०९/२०२५

कार्यकारी दंडाधिकारी,
तथा अप्पर तहसीलदार, देवलापार

---

**कोर्ट विद्यमान श्रीमती पुनम कदम, अप्पर तहसीलदार, देवलापार यांचे न्यायालय**

प्र.क्र. /एम.आर.सी. ८१/२०२५
मौजा कडबिखेडा, ता. रामटेक
जि. नागपूर

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी श्री विशाल मंगल इनवाते रा. टूयापार ता. रामटेक जिल्हा नागपूर यांनी त्यांचा जन्म दिनांक २४/११/२००७ रोजी राहते घरी टूयापार ता. रामटेक येथे झाला परंतू त्यावेळेस अर्जदाराचे कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीनी अर्जदारांची जन्माची नोंद संबधीत गट ग्रामपंचायत कार्यालय वंडबा ता. रामटेक येथे केली नाही. त्याबाबत गट ग्रामपंचायत वंडबा यांनी दिनांक ०१/०४/२०२५ रोजी प्रमाणपत्र दिले आहे. करीता नामे श्री विशाल मंगल इनवाते, यांच्या जन्माची नोंद गट ग्रामपंचायत वंडबा ता. रामटेक येथे करण्याबाबत आदेश देणेकरीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त नामे श्री विशाल मंगल इनवाते, राह. टूयापार ता. रामटेक यांचा जन्मदिनांक २४/११/२००७ ची नोंद मौजा टूयापार ता. रामटेक येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक १६/१०/२०२५ पावेतो आपले आक्षेपअथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वत: उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामाआज दिनांक ३०/०९/२०२५ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ :- देवलापार
दिनांक :- ३०/०९/२०२५

कार्यकारी दंडाधिकारी,
तथा अप्पर तहसीलदार, देवलापार

---

**कोर्ट विद्यमान श्रीमती पुनम कदम, अप्पर तहसीलदार, देवलापार यांचे न्यायालय**

प्र.क्र. /एम.आर.सी. ८१/२०२५
मौजा कडबिखेडा, ता. रामटेक
जि. नागपूर

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी कुमारी संध्या मंगल इनवाते रा.टूयापार ता. रामटेक जिल्हा नागपूर यांनी त्यांचा जन्म दिनांक २०/१२/२००६ रोजी राहते घरी टूयापार ता. रामटेक येथे झाला परंतू त्यावेळेस अर्जदाराचे कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीनी अर्जदारांची जन्माची नोंद संबधीत गट ग्रामपंचायत कार्यालय वंडवा ता. रामटेक येथे केली नाही. त्याबाबत गट ग्रामपंचायत वंडबा यांनी दिनांक ०१/०४/२०२५ रोजी प्रमाणपत्र दिले आहे. करीता नामे कुमारी संध्या मंगल इनवाते यांच्या जन्माची नोंद गट ग्रामपंचायत वंडबा ता. रामटेक येथे करण्याबाबत आदेश देणेकरीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त नामे कुमारी संध्या मंगल इनवाते, राह. टूयापार ता. रामटेक यांचा जन्मदिनांक २०/१२/२००६ ची नोंद मौजा टूयापार ता. रामटेक येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक १६/१०/२०२५ पावेतो आपले आक्षेपअथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वत: उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामाआज दिनांक ३०/०९/२०२५ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ :- देवलापार
दिनांक :- ३०/०९/२०२५

कार्यकारी दंडाधिकारी,
तथा अप्पर तहसीलदार, देवलापार

---

## शिक्षक-प्राचार्य सेवानिवृत्ती वय ६५ करा; कुणी केली ही मागणी?

**अमरावती :** राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी-२०२०) प्रभावीपणे राबवण्यासाठी विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील शिक्षक व प्राचार्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे करण्यात यावे, अशी मागणी अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाने केली आहे. या संदर्भात महासंघाने राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांना सविस्तर निवेदन सादर केले आहे.युजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांचा आधारकेंद्र सरकारच्या सातव्या वेतन आयोगाच्या चौकटीतील युजीसी आणि एआयसीटीईच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्राध्यापक आणि प्राचार्यांसाठी सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, पात्रतेनुसार ७० वर्षांपर्यंत करारनियुक्तीचा पर्यायही उपलब्ध करावा, असे यात नमूद आहे. पश्चिम बंगाल, बिहार, मध्य प्रदेशसारख्या राज्यांनी घेतलेल्या सकारात्मक निर्णयाचा संदर्भही महासंघाने दिला आहे.

राज्यातील दुहेरी व्यवस्था संपुष्टात आणावीसध्या राज्यात बहुतेक शिक्षक ६० व्या वर्षी, तर प्राचार्य ६२ व्या वर्षी सेवानिवृत्त होतात. परंतु, काही ठिकाणी प्राचार्यांना ६५ वर्षांपर्यंत सेवा दिली जाते, ज्यामुळे एक मोठी विसंगती निर्माण झाली आहे.

---

# मूळ प्रारूप मतदार यादीत गंभीर चुका

■ महासागर प्रतिनिधी
**उमरखेड, दि. १६ :**

नगर परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत मोठ्या प्रमाणावर चुका व विसंगती झाल्याचे उघड झाले आहे. अनेक पात्र मतदारांची नावे वगळल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे तत्काळ दुरुस्त करण्याची मागणी महाराष्ट्र डेमोक्रेटिक फोरमने निवडणूक आयोगाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नगर परिषद क्षेत्रांतील प्रारूप मतदार यादीचे तत्काळ पुनर्परीक्षण करावे, मतदारांच्या तक्रारींसाठी विशेष हेल्प डेस्क किंवा तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्यात यावे, ज्यांच्या नावे वगळली गेली आहेत अशा नागरिकांना नाव समाविष्ट करण्यासाठी अतिरिक्त संधी द्यावी, तसेच मतदार यादीबाबत असलेले आक्षेप तत्काळ दुरूस्त करावेत, संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांकडून अंतर्गत चौकशी व जबाबदारी निश्चित करावी, दोषी कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात यावे, न्याय्य व पारदर्शक निवडणूक प्रक्रियेच्या दृष्टीने यावर तत्काळ कारवाई करून नागरिकांना न्याय द्यावा, आदी मागण्या महाराष्ट्र डेमोक्रेटिक फोरम (एमडीएफ) तर्फे मुख्य निवडणूक आयोग, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आल्या.

---

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनीक बांधकाम विभाग क्र. १**
ई मेल : div1nagpur.ee@mahapwd.gov.in

**ई निविदा सुचना क्र. एस /४२/२०२५ – २०२६**

**कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग क्र १ नागपूर हे अनुभवी व महाराष्ट्र अस्थापनेच्या नोंदणीचा दाखला असलेल्या एजन्सीकडून खालील कामाकरीता ई निविदा प्रणालीद्वारे ऑफलाईन) विहीत नमुन्यामध्ये (बाबवार दर) निविदा मागवित आहेत. निवदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahapwd.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावी. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.**

| Sr. No. | Name of Work | Estt. cost (Rs. in lakhs) | Cost of blank tender form |
|---|---|---|---|
| 1 | Providing labour for Arranging furniture of various barracks , Outer cleaning and Sweeping Before,During & After Assembly and Providing grass cutting services and transportation of Debris at old Hy. House , Nagpur. | 5.00 | 590.00 |
| 2 | Providing House keeping and Room Services management of Household affairs various Barracks & Offices at premises of old and new Hy House Nagpur. | 10.00 | 590.00 |
| 3 | Providing labour at Hy.House Nagpur | 10.00 | 590.00 |
| 4 | Providing and Supplying various office furniture and Providing Cleaning material at Hy.House Nagpur | 5.00 | 590.00 |
| 5 | Arranging furniture of various offices before , during and after RAC at Third and Fourth Floor of New Hy. House building | 8.00 | 590.00 |
| 6 | Restoration of EPABX system at Hon'ble C.M. secretariate at Hy. House, Nagpur | 5.00 | 590.00 |
| 7 | Providing and supplying of drinking water ( packed container ) during assembly period for all barracks in the premises of Old Hydrabad House, at Nagpur | 8.00 | 590.00 |
| 8 | Providing and Supplying Manpower for Various Allied Services at Hyd House nagpur | 10.00 | 590.00 |
| 9 | Providing and Supplying mid Bock Chair for Hyd House nagbhvan and New Hydrabad House Nagpur | 5.00 | 590.00 |
| 10 | Providing and Installation of EPABX ,LAN Wifi at C .S office Barracks No 12 and CCTV Servillance wifi New Hyd House | 10.00 | 590.00 |
| 11 | Providing and supplying of drinking water ( packed container ) during assembly period for CM Secreteriat Office, CS Office, ASC Office in the premises of Old Hy.House and various officves in thhe premise of new Hydrabad House, at Nagpur | 8.00 | 590.00 |
| 12 | Providing & Supplying Various Type Of Office Furniture In Buildings Offices At Vidhanbhavan, Nagpur. | 10.00 | 590.00 |
| 13 | Providing Carpenter, Plumber, Sweeper, Mason & Helper With Tools At Vidhanbhavan, Nagpur. | 8.00 | 590.00 |
| 14 | Providing EPABX system and CCTV Camera Services At Vidhanbhavan, Nagpur | 5.00 | 590.00 |
| 15 | Providing Packed Drinking Water Container during Winter Assembly period in Vidhanbhavan, Nagpur. | 10.00 | 590.00 |
| 16 | Prooviding servises Lift Oprater,Pump Oprator ,meson at Vidhanbhavan Nagpur | 10.00 | 590.00 |
| 17 | Providing Automatic Air Dispencer,Aircube etc at Vidhanbhavan,Nagpur | 10.00 | 590.00 |
| 18 | Providing & Supplying Glass, Table, Chair In Reporting Branch At Vidhanbhavan,Nagpur | 10.00 | 590.00 |
| 19 | Providing and supplying of miscienes and cleaning , hardware cloth, statonary , kitchen materials articles at etc. At vidhanbhavan | 10.00 | 590.00 |
| 20 | Providing housekeeping , kitchen Services at Suyog building for press reporter for RAC 2025 Nagpur | 10.00 | 590.00 |
| 21 | Providing manpower services such as pump operator, plumber,carpenter with assistant and supervisor at patrakar nivas & Shifting of furniture before and after assembly atSuyog for RAC 2025 Nagpur | 5.00 | 590.00 |
| 22 | Providing and Installation of Data/Voice Digital Comunivcation With LAN wifi System at Suyog | 5.00 | 590.00 |
| 23 | Providing Drinking Water to Driver Camp At Sarpanch Bhavan, Aakar Building No.12 & 13 at Nagpur. (RAC-2025) | 5.00 | 590.00 |
| 24 | Providing additional manpower, outer cleaning and security guard at Divisional Commissioner Office, civil line Nagpur (For RAC-2025) | 5.00 | 590.00 |
| 25 | Providing additional manpower services removal of grass and transportation of debris at Administrative building No.1 and 2. (For RAC-2025) | 5.00 | 590.00 |

१) या कामाची निविदा माहीती https://mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर निविदा सुचनेची प्रत या कार्यालयातील सुचना फलकावर पहायला मिळेल.
२) निविदेच्या अटी / शर्ती. प्रारूपात दर्शविल्याप्रमाणे राहील.
३) या निविदा सुचनेत काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती शुध्दीपत्रक प्रकाशित होईल.
४) कोणतेही कारण न दर्शविता अंशत: किंवा संपूर्ण निविदा रद्द अथवा फेरफार करण्याचा अधिकार सक्षम अधिकाऱ्याने राखून ठेवलेला आहे.

जावक क्र. ११६०३ दिनांक १३ ऑक्टोबर २०२५

(लक्ष्मीकात राऊळकर)
कार्यकारी अभियंता
सार्वजनीक बांधकाम विभाग क्र. १
नागपूर

DGIPR-2025-26/No.-5/C3283

---

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनीक बांधकाम विभाग क्र. १**
ई मेल : div1nagpur.ee@mahapwd.gov.in.
**ई निविदा सुचना क्र. एस /३८/२०२५ – २०२६**

**कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग क्र.२ नागपूर हे अनुभवी व महाराष्ट्र अस्थापनेच्या नोंदणीचा दाखला असलेल्या एजन्सीकडून खालील कामाकरीता ई निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन) विहीत नमुन्यामध्ये (बाबवार दर) निविदा मागवित आहेत. निवदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावी. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही**

| Sr. No. | Name of Work | Estt. cost (Rs. in lakhs) | Cost of blank tender for |
|---|---|---|---|
| 1 | Providing Services of Houskeeping ,catering and Management of Household affairs of Minister Cottag no.1 to 15,Before,During & After RAC Session at Ravibhvan Nagpur (during assembily period only) | 35.00 | 590.00 |
| 2 | Providing Services of Houskeeping , Management of Household affairs and catering (including kitchen no. 1 and 2 ) to building no. 1,2,3,4, 40 suited building of Ravibhvan Naagpur. (during assembly period only) | [illegible]5.00 | 590.00 |
| 3 | Providing and supplying labour for Room Services (Fasting Snacks,Lunch Dinner etc.. ) at Canteen premises at Ravibhvan Nagpur | 15.00 | 590.00 |
| 4 | Providing vaccume cleaning and floor cleaning by machine for sofa set, floor before & during assembly period for various suits and corridor of building No. 1 , 2 , 3 & 4, 40 Suited & 12 Suited building and Cottage no. 1 to 21 in Ravi bhavan premises at Nagpur | 15.00 | 590.00 |
| 5 | Providing & Suppplying labour for arranging of furniture before; during and after RAC session for Building no. 1 , 2 , 3 , 4 and 40 Suit Building and cottages No. 1 to 21 in Ravi bhavan Premises at Nagpur | 15.00 | 590.00 |
| 6 | Providing and Supplying VIP Sofa set (3+1+1 Seater) at Various Cabinate Minister cottages , Supplying Executive Revolving Chair and Visitor Chair,Supplying Wooden Tea Table and Dinning Table with Chair (6 Chair) ,Supplying Executive Office Table at Various Cabinate Minister cottages , Supplying Dressing Table,TV Unit table & Bed Side Table and Supplying Wooden Bed , Side table , dressing table at Various Cabinate Minister cottages and allied Furniture for 5 Room of building no. 4 at Ravibhvan Nagpur | [illegible]2.00 | 590.00 |
| 7 | Providing and Supplying Steel Almirah, Repairing of Sofa set & Chair with Changing of foam cloth and various acessories,Supplying automatic air despencer & Hand wash Steel Dispenser,urine pad etc., Supplying cleaning material like Godrej air pkt, Mosquito Repalent,Room freshner sented aircube etc at Various Cabinate Minister,Repairs various type of furniture and polishing work to furniture and wall panneling at Ravibhvan Nagpur | 15.00 | 590.00 |
| 8 | Stiching of curtains for door / windows', tea poy cover etc with fitting and fixing of stainless steel curtains rod with necessary fittings for Mi/C No. 1 to 21, building no. 1 to 4 , 12 suited building ,40 suited building, and Supplying anti skid matting for Minister bathrooms and VIP Carpet/Galicha & Bed side Runner for various M/c at Ravibhvan,Deogiri & Nagbhavan and Supplying Vertical Blinds and repairing of old Vertical Blinds for various M/c at Ravibhvan Nagpur. | 13.00 | 590.00 |
| 9 | Providing Outer cleaning and sweeping Before,During & After RAC 2024 at M/C No 1 to 21 and Providing plumbers, carpenter and sweepers to various building premises of Ravi bhavan Nagpur | 12.00 | 590.00 |
| 10 | Providing and supplying Khansama & Helper at Various Cabinate Minister cattage & 12 Suited Bldg Canteen and Providing skilled workers such as plumbers, carpenter and sweepers including supply of pluming material for RAC to ministers cottages at Ravibhvan During RAC ,Nagpur | 13.00 | 590.00 |
| 11 | Providing and installation TV 43 "With Tata Sky of Cottage No 1 to 15 and providing and Supplying 75" tv at Ravibhvana Meeting Hall and Various Type of Misc Items at Ravibhavan Nagpur. | 15.00 | 590.00 |
| 12 | Providing and fixing of wooden furniture table, side runner and sofa set,wooden cot ward drower, dressing table,tv unit , etc., executive office table with side runner and copy table ,shoe rack,office table etc. At Ravibhavan Nagpur. | [illegible]2.00 | 590.00 |
| 13 | Providing Services of Houskeeping ,catering and Management of Household affairs for Minister Cottag no.1 to 16 Before,During & After RAC Secssion in the premises of Nag Bhavan at Nagpur (during assembily period only) | 15.00 | 590.00 |
| 14 | Providing security Guard & Pump oprator, Providing & Suppplying labour for arranging of furniture ,, Supplying Manpower for Various Allied Services and labour During & After Assembly, Providing outer cleaning and sweeping, Transportation of Debris obtained from grass cutting, bhushes in the premises of Nag bhavan Nagpur | [illegible]5.00 | 590.00 |
| 15 | Providing and Supplying Sofa set,Dinning Chair with change of foam and Cushion etc for Cottages , Secretariet Bunglow & Suits, wooden wardrobe and bed side table, corner table, tea / central table, Dressing table with stool to various Minister cottages and Suits in the premises of Nag bhavan Nagpur | 12.00 | 590.00 |
| 16 | Providing and laying cable for EPABX system with maintenance and repairs, wifi internet services including routers and CCTV camera system for RAC to all Buildings and Cottages of ministers in Nag Bhavan Premises at Nagpur | 12.00 | 590.00 |
| 17 | Providing and Supplying Double Bed Wooden and Ex Table, Carpet Antiskid matting in all M/C bathroom 1 to 16,wooden furniture table, side runner and sofa set,wooden cot and misclenes and cleaning , hardware cloth, statonary , kitchen materials articles for RAC 2025 at Nagbhavan nagpur | 15.00 | 590.00 |
| 18 | Providing technical person & supervisor, Providing Housekeeping services ,Security Guard and arranging furniture various offices before , during and after RAC at First & Second Floor of New Hy.House Nagpur | 12.00 | 590.00 |
| 19 | Providing Vaccume Cleaning of floor Carpet, Glass Pans, Chairs, Sofa Sets at Different Chambers, Offices New Building & New Anex Building ,Old Building & Old Anex Building , Barrack 1 To 8 & Barrack 9 To 16 At Vidhanbhavan, Nagpur. | 15.00 | 590.00 |
| 20 | Providing & Supplying of Urinal Screen Gen, Multi Fold Towel & Dispenser, Liquid Soap Refill and Dispenser, Toilet Roll, Micromsit Refill & Dispenser, Two Wheel & S.S. Dustbins etc. at Old & New Building & Old & New Anex Building and barrack No.1 to 16 At Vidhanbhavan, Nagpur. | 24.00 | 590.00 |
| 21 | Providing Curtains, Blinds and Accessories For Barrack No. 1 To 16 & Main Building, Old Anex Building, New Building & New Anex Building At, Vidhanbhavan, Nagpur. | [illegible] | 590.00 |
| 22 | Providing & Supplying Cleaning Material Upkeepness In Building & Barrack No. 1 To 16 in the Premises At Vidhanbhavan, Nagpur. | 16.00 | 590.00 |
| 23 | Providing & Supplying Sofa Set,Steel Storage, Big, Small, Medium , Tandem Chair, Executive Table & Revolving & Waiting Chair In Buildings Offices At Vidhanbhavan, Nagpur. | [illegible]5.00 | 590.00 |
| 24 | Providing Room Services Shifting & Arranging Furniture Before, During and After Assembly in Barrack No. 1 to 16 At Vidhanbhavan, Nagpur. | 30.00 | 590.00 |
| 25 | Providing Room Services Shifting & Arranging Furniture Before, During and After Assembly in Old Building & Old Anex Building At Vidhanbhavan, Nagpur. | [illegible]0.00 | 590.00 |

१) या कामाची निविदा माहीती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर निविदा सुचनेची प्रत या कार्यालयातील सुचना फलकावर पहायला मिळेल.
२) निविदेच्या अटी / शर्ती. प्रारूपात दर्शविल्याप्रमाणे राहील.
३) या निविदा सुचनेत काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती शुध्दीपत्रक प्रकाशित होईल.
४) कोणतेही कारण न दर्शविता अंशत: किंवा संपूर्ण निविदा रद्द अथवा फेरफार करण्याचा अधिकार सक्षम अधिकाऱ्याने राखून ठेवलेला आहे.

जावक क्र. ११६०० दिनांक १३ ऑक्टोबर २०२५

(लक्ष्मीकांत राऊळकर)
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १
नागपूर

DGIPR-2025-26/No.-5/C3279

---

## Change Of Name

MY OLD NAME WAS **RUQAIYA BANO.** NOW MY NEW NAME IS **RUQAIYA BEGUM.**
**ADD :** NEAR KACCHU KIRANA STORES TAKIYA DIWAN SHAH MOMINPURA NAGPUR 440018.

MY OLD NAME WAS **SHEIKH MOHD SHIFANUDDIN MOHD NAZIMUDDIN.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD SHIFANUDDIN.**
**ADD :** SHOUKAT ALI CHOWK OPP, HAJ HOUSE GANJIPETH NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **SHAZIYA RIZWAN.** NOW MY NEW NAME IS **SHAZIA RIZWAN.**
**ADD :** 264,SULEMAN MANZIL, SADAR NAGPUR - 440001

PASSPORT NO. **U1454831,.** MY OLD NAME WAS **RANVEER KAWARE.** NOW MY NEW NAME IS **RANVIR KAWARE.**
**ADD :** PLOT NO. 939, DESH-PANDE LAYOUT, NAGPUR 440008

MY OLD NAME WAS **MOHAMMAD ASRAF RATHOR.** NOW MY NEW NAME IS **MOHD ASHRAF ALTAF HUSAIN RATHOD.**
**ADD :** PLOT NO.84/A NETAJI NAGAR PATDI NAGPUR 440035
PASSPORT NO. **N4321498**

MY OLD PASSPORT NO. **N0546517.** MY OLD NAME WAS **MAYANK GOPALRAO DANDARE.** NOW MY NEW NAME IS **MAYANK GOPALRAO DANDHARE.**
**ADD :** PLOT NO.47, KRUSHNARPAN DURGA NAGAR MANEWADA ROAD NAGPUR 440024

MY OLD NAME WAS **ALI SABAHAT AFRINE ASHFAQUE.** NOW MY NEW NAME IS **SABAHAT AFRIN ASHFAQUE ALI.**
**ADD :** GALLI NO.10, NEAR TAJ HARDWARE, HASANBAG, NAGPUR MS. 440009 MS

MY OLD NAME WAS **NARENDRA SINGH BAIS.** NOW MY NEW NAME IS **NARENDRA LAXMANSINGH BAIS.**
**ADD :** P. NO. 24, MATOSHREE BHAVAN, NEAR NIRMAL NAGARI MIRE LAYOUT, BAPU NAGAR, NAGPUR CITY - 440009

MY OLD NAME WAS **RUPALI BAIS.** NOW MY NEW NAME IS **DEEPMALA BAIS.**
**ADD :** P. NO. 24, MATOSHREE BHAVAN, NEAR NIRMAL NAGARI MIRE LAYOUT, BAPU NAGAR, NAGPUR CITY - 440009

MY OLD NAME WAS **UMA SWARNKAR.** NOW MY NEW NAME IS **MANJU SWARNKAR.**
**ADD :** P. NO. FLAT NO. 202 GANGWANI IMPERIAL NARI RING ROAD UPPALWADI NAGPUR CITY - 440026

MY OLD NAME WAS **SADAF RAFIKKHA PATHAN.** NOW MY NEW NAME IS **SADAF RAFIQUE KHAN PATHAN.**
**ADD :** AT-DONGARTAL, POST-DEOLAPAR, SUB DISTRICT-RAMTEK NAGPUR - 441401

MY OLD NAME WAS **ISHARA-TALI AFSARALI SAYYAD.** NOW MY NEW NAME IS **ISHRAT ALI AFSAR ALI SAYYAD.**
**ADD :** QTR 220/1, SOMWAR-IPETH, NAGPUR, 440009

MY OLD NAME WAS **SHEIKH NISAR SHEIKH USMAN.** NOW MY NEW NAME IS **SHAIKH NISAR SHAIKH USMAN.**
**ADD :** NAVI ABADI HADGAON DISTRICT NANDED 431712

RNINO-20789/71 | Mahasagar Nagpur
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Tekdi Road, Sitabuldi, Nagpur.
**Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak.
**Main office phone numbers:** 7447735851/9922970023/7447735853.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक २०७८९/१९७१ | महासागर नागपूर
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, टेकडी रोड, सिताबर्डी, नागपूर, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, **समूह संपादक :** संदीप रामराव काळे, **प्रबंध संपादक :** पंकज श्रीकृष्ण चांडक
फोन : ७४४७७३५८५१, ७४४७७३५८५३

# अस्मिता

## रवा मसाला डोनट्स

रसगंधा

डोनट्स हा प्रकार लहानांसह मोठ्यांनाही खूप आवडतो. हीच डोनट्स घरी करून बघता येतील. पौष्टीक आणि आरोग्यदायी असे रवा मसाला डोनट्स करून बघा.

**साहित्य :** एक वाटी रवा, कढीपत्ता, कोथिंबिर, दोन मिरच्या, एक चमचा भाजलेलं जिरं, अर्धा चमचा बडिशेप, आलं, चाट मसाला, हळद, एक उकडलेला बटाटा, मीठ, तेल आणि पाणी

**कृती :** कढईत रवा खमंग भाजून घ्या. मग त्यात रव्याच्या तीनपट पाणी घाला. नीट मिसळून घ्या. वरून चमचाभर तेल घाला. आता रव्याला एक वाफ आणा. उकडलेला बटाटा किसून घ्या. गॅस बंद करा. रवा थंड होऊ द्या. हा रवा एका भांड्यात काढून घ्या. त्यात किसलेला बटाटा, आलं. जिरं, बडिशेप,



कढीपत्ता, कोथिंबिर, हळद, मिरच्या, हळद, चाट मसाला, मीठ घाला. हे सर्व घटक एकजीव करून घ्या. या मिश्रणाचा मोठा गोळा तयार करा. आता या गोळ्यापासून छोट्या आकाराचे गोळे बनवा. त्याला डोनट्ससारखा आकार द्या. हे डोनट्स तेलात सोनेरी रंगावर तळून घ्या. फार तेलकट डोनट्स नको असतील तर शॅलो फ्राय करून घ्या. हे डोनट्स सॉस किंवा हिरव्या चटणीसोबत खाता येतील.

## आरोग्याचे डिजिटलतंत्र

टेक्नो टिप्स

आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानाचा वापर आरोग्य सांभाळण्यासाठीही मोठ्या प्रमाणात होतो आहे. अलीकडे मोबाईलमध्ये हेल्थ ॲप्स,स्मार्टवॉचेस आणि फिटनेस ट्रॅकर्स खूप लोकप्रिय झाले आहेत. पावले मोजणे, चाललेले अंतर मोजणे, कॅलरी खर्चाचे निरीक्षण करणे, हृदयाची गती आणि रक्तदाब तपासणे, झोपेची वेळ आणि गुणवत्ता ट्रॅक करणे अशा अनेक सुविधा त्यात मिळतात.यामुळे स्वयं-जागरूकतानिर्माण होते.समजा,दररोज ८००० पावलं चालायचे ठरवले तर ॲप आपल्याला ते लक्ष्य पूर्ण करण्यासाठी प्रेरित करते. झोपेचा वेळ व गुणवत्ता तपासल्याने आपल्याला पुरेशी विश्रांती मिळते आहे का हे समजते.

याशिवाय, बरेच हेल्थ ॲप्सपाणी पिण्याची आठवण करतात. ध्यान किंवा मेडिटेशनची सूचना देतात. डॉक्टरांना रिपोर्ट्स शेअर करण्याची सुविधा त्यात उपलब्ध असते. तसेच अन्न किंवा व्यायामाच्या स'याचे नियोजनकरण्याची अथवा डायटप्लॅन देण्याची सुविधा काही ॲप्स देतात. यामुळे व्यक्ती आपल्या आरोग्यावर लक्ष ठेवू शकते.स्वत:साठी शिस्तबद्ध दिनचर्या तयार करू शकते.मात्र, या ॲप्सवर



पूर्ण अवलंबून राहू नये. आकडे केवळ मार्गदर्शनासाठी असतात.उपचारासाठी नव्हेहे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. शरीराच्या इशाऱ्यांकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे.योग्य आहार घेणे, व्यायाम करणे, पुरेशी झोप घेणे आणि मानसिक स्वास्थ्य सांभाळणे या गोष्टी तंत्रज्ञान वापरताना पाळल्या पाहिजेत.योग्य वापर केल्यास हे हेल्थ टेक साधन आपले जीवन अधिक निरोगी आणि शिस्तबद्ध बनवू शकतात.

## खनिजयुक्त पाणी असेल तर...

ब्युटी टॉक

तुमची तेलकट त्वचा कोरडी पडू लागली आहे का, मुळात कोरडी असणारी त्वचा अधिक रुक्ष वाटू लागली आहे का... थंडी किंवा ऋतूबदलामुळे असं होत असावं, हा तुमचा समज चुकीचा ठरू शकतो. पाण्यातल्या अतिरिक्त खनिजांमुळे तुमच्या त्वचेचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं. त्यामुळे तुमच्या घरी जड पाण्याचा पुरवठा होत असेल आणि त्यात खनिजांचं प्रमाण अधिक असेल तर त्वचेची विशेष काळजी घ्यायला हवी. या खनिजांचा वाईट प्रभाव कमी करणारी सौंदर्यप्रसाधनं तसंच उत्पादनं वापरणं गरजेचं आहे.



जड पाण्यात मॅग्नेशियम आणि कॅल्शियमचं प्रमाण अधिक असतं. साबणाला कमी फेस येणं, कपडे कडक आणि खरखरीत होणं, स्टीलच्या पृष्ठभागावर पांढरा थर साचणं हे पाण्यात अधिक प्रमाणात खनिजं असल्याचे संकेत आहेत. म्हणूनच जड पाण्याने आंघोळ केल्यानंतर लगेचच मॉईश्चरायझरचा वापर करायला हवा. त्वचा ओलसर असताना मॉईश्चरायझर लावल्यामुळे पाण्यातली खनिजं त्वचेत प्रवेश करू शकत नाहीत आणि त्वचेचा बचाव होतो. कोरफड आणि खोबरेल तेलयुक्त मॉईश्चरायझर्स त्वचेचे रक्षण करू शकतात. मॉईश्चरायझर लावण्याआधी टोनरचा वापर करता येईल.

मेक अप काढण्यासाठी या जड पाण्याचा वापर करू नका. या पाण्यामुळे तुमची त्वचा खरखरीत आणि कोरडी होऊ शकते. हे टाळण्यासाठी रसायनयुक्त साबण वापरणं टाळा. जड पाण्यात साबण विरघळत नाही. यामुळे पाण्यातल्या क्षारांसह साबणातली रसायनंही त्वचेत सामावली जातात. त्यामुळे मेक अप काढण्यासाठी वॉटर फ्री क्लीन्सरचा वापर करा. त्वचेला पूर्ण संरक्षण देण्यासाठी रात्री झोपण्याआधी सीरम लावता येईल. सकाळी मेक अप करण्याआधी डे सीरमचा वापर करता येईल. यामुळे त्वचेला आवश्यक पोषण मिळू शकेल.



अडासो कापेसा यांनी आपले प्राथमिक शिक्षण आसाममध्ये पूर्ण केले. आपल्या करिअरची सुरुवात त्यांनी सशस्त्र सीमा बल मध्ये केली. तेथे त्यांनी पिथोरागड, उत्तराखंड येथील ५५ व्या बटालियनमध्ये इन्स्पेक्टर, जनरल ड्युटी म्हणून सेवा केली. त्यांच्या कार्यक्षमतेमुळे त्यांना स्पेशल प्रोटेक्शन ग्रुपमध्ये समाविष्ट होण्याची संधी मिळाली. स्पेशल प्रोटेक्शन ग्रुपही भारतातील पंतप्रधानांच्या वैयक्तिक सुरक्षा व्यवस्था करणारी सर्वोच्च सुरक्षा यंत्रणा आहे.

## अडासो कापेसा - नारीशक्तीचा अभिमान !

मानिनी

२०२५ मध्ये लंडन दौऱ्यादरम्यान पंतप्रधान मोदींच्या अंगरक्षकांच्या तुकडीत एका फोटोत काळा सूट, इअरपीस आणि निर्धारयुक्त चेहऱ्याची एक तरुणी ठामपणे उभी होती. त्या आहेत अडासो कापेसा. मणिपूरच्या सेनापती जिल्ह्यातील काइबी गावातील अडासो कापेसा या माओ नागा समुदायाच्या सदस्य आहेत. त्या एका साध्यासुध्या आणि पारंपरिक विचारांच्या कुटुंबातल्या आहेत. त्यांनी संरक्षण क्षेत्रात करिअर करण्याचे ठरवले तेव्हा त्यांच्या कुटुंबाने त्यांना नेहमीच प्रोत्साहन दिले. अडासो कापेसा यांनी आपले प्राथमिक शिक्षण आसाममध्ये पूर्ण केले. आपल्या करिअरची सुरुवात त्यांनी सशस्त्र सीमा बल मध्ये केली. तेथे त्यांनी पिथोरागड, उत्तराखंड येथील ५५ व्या बटालियनमध्ये इन्स्पेक्टर, जनरल ड्युटी म्हणून सेवा केली. त्यांच्या कार्यक्षमतेमुळे त्यांना स्पेशल प्रोटेक्शन ग्रुपमध्ये समाविष्ट होण्याची संधी मिळाली.स्पेशल प्रोटेक्शन ग्रुपही भारतातील पंतप्रधानांच्या वैयक्तिक सुरक्षा व्यवस्था करणारी सर्वोच्च सुरक्षा यंत्रणा आहे. अडासो कापेसा या मणिपूरच्या पहिल्या महिला अधिकारी आहेत, ज्यांना स्पेशल प्रोटेक्शन ग्रुपमध्ये स्थान मिळवले आहे. एसपीजी' कमांडो बनणे सोपे नाही. अतिशय कठीण प्रशिक्षण, शारीरिक कसोटी, शस्त्र हाताळणी, गुप्तचर कौशल्य तसेच पंतप्रधानांच्या प्रत्यक्ष सुरक्षा जबाबदारीचे कठोर धडे यात अडासो उत्तीर्ण झाल्या आणि त्यांनी स्पेशल प्रोटेक्शन ग्रुपच्या कठोर निवड प्रक्रियेत यश मिळवले. अडासो कापेसा यांच्या या यशामुळे मणिपूर आणि संपूर्ण उत्तर-पूर्व भारतातील महिलांसाठी एक आदर्श निर्माण झाला आहे. त्यांच्या कार्यामुळे महिलांच्या सामर्थ्याची आणि क्षमता याची जाणीव समाजाला झाली आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे महिलांच्या संरक्षण क्षेत्रात उच्च पदांवर पोहोचण्याची प्रेरणा मिळाली आहे.



आज पहिली महिला एसपीजी कमांडो म्हणून अडासो कापेसा हजारो तरुणींसाठी प्रेरणास्रोत ठरली आहे. दुर्गम मणिपूर मधून दिल्लीपर्यंतचा तिचा प्रवास स्त्री शक्तीचे आणि समान संधीचे प्रतीक ठरले आहे. तिच्या रूपाने भारतीय सुरक्षा दलात महिलांचे नवे व वेगळे पर्व सुरू झाले आहे.

## घरीच लावा वेलची

परसबाग

वेलची हा मसाल्याचा पदार्थ. वेलचीमुळे पदार्थाला छान चव येते. हिरव्या वेलचीची लागवड तुम्ही घरच्या बगिच्यातही करू शकता. याबाबतचं हे मार्गदर्शन...

- वेलची हे उष्ण कटिबंधीय प्रदेशातलं पिक आहे. वेलचीच्या वाढीसाठी उष्ण आणि आर्द्र वातावरण लागतं.
- लागवड करण्याआधी वेलचीतले काळे दाणे कोमट पाण्याने स्वच्छ धुवून घ्या. हे दाणे सावलीत धुवून घ्या. त्यानंतर हे वाळलेले दाणे २० ते ३० दिवस फ्रीजमध्ये ठेऊन द्या.
- एका कुंडीत माती घाला. ही माती अगदीच भुसभुशीत असू नये.
- वेलचीचे दाणे कुंडीत १.८ इंच खोल पेरा. यानंतर पाणी घाला. यामुळे मातीतला ओलावा टिकून रहायला मदत होईल.
- वेलचीला अंकुर फुटेपर्यंत वाट बघा. पेरणीनंतर ३० ते ४५ दिवसांनी वेलचीला अंकुर फुटू लागतील. वेलचीला रोपाला पाणी घालत रहा. रोपट्याला दोन पानं येईपर्यंत थांबा.
- वेलचीचं रोपटं सहा ते दहा फूट उंच व्हायला हवं. तोपर्यंत रोपट्याला पाणी घालत रहा. तसंच वेळोवेळी खतही घालत रहा. वेलचीचं पिक येण्यासाठी तुम्हाला दोन ते तीन वर्षं थांबावं लागेल.
- रोपट्याला वेलची लागली की हातांनी काढून घ्या. या रोपट्याला लागणाऱ्या वेलच्यांची संख्या प्रत्येक वर्षी वाढत जाईल.



## संवादकौशल्य वाढवण्यासाठी...

स्किल डेव्हलपमेंट

संवादकौशल्य म्हणजे केवळ बोलण्याची पद्धत नव्हे, तर स्वतःला प्रभावीपणे व्यक्त करण्याचे सामर्थ्य आहे. हे कौशल्य केवळ अंगभूत नसते. ते विकसित करावे लागते. त्यासाठी काही गोष्टींवर लक्ष केंद्रित करायला हवे. सर्वप्रथम ऐकण्याची कला आत्मसात करावी. समोरच्या व्यक्तीचे बोलणे नीट ऐकले की उत्तर अधिक स्पष्ट आणि योग्य देता येते. आवाजात आत्मविश्वास, सौम्यपणा आणि आवाजाची गती यात संतुलित असेल तर संवाद अधिक प्रभावी होतो. पुस्तके, वृत्तपत्रे आणि मासिके वाचल्यामुळे शब्दसंग्रह वाढतो. जास्त शब्द माहिती असतील तर विचार स्पष्टपणे मांडता येतात. त्याचबरोबर लेखनाची सवय लावून घ्यावी. रोज थोडे लिहिल्याने विचारांमध्ये मांडणी सुधारते आणि बोलण्यात सहजता येते.अगदी डायरी लिहिण्यापासून सुरुवात केली तरी चालेल.

संवादकौशल्य वाढवण्यासाठी आरशासमोर बोलण्याचा सराव करावा किंवा मोबाईलवर स्वतःचा आवाज रेकॉर्ड करून सुधारणा कुठे हवी ते तपासावे. सार्वजनिक ठिकाणी, शाळा, ऑफिस किंवा छोट्या गटात प्रस्तावना देणे, भाषण करणे किंवा चर्चेत सहभागी होणे यामुळे भीती कमी होते. आत्मविश्वास वाढतो. संवादासाठी शारीरिक भाषा म्हणजेच देहबोली देखील महत्त्वाची असते. नजरेला नजर मिळवून बोलणे, योग्य हातवारे करणे, हसतमुख राहणे यामुळे संवाद अधिक प्रभावी होतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सकारात्मक दृष्टीकोन आणि नम्रता. समोरच्या व्यक्तिचा आदर ठेवून बोलल्यास संवाद दीर्घकाल टिकतो. सतत सराव, आत्मविश्वास, वाचन-लेखन आणि योग्य वर्तन यामुळे संवाद नक्कीच प्रभावी आणि यशस्वी होतो.



## परिस्थिती कशी हाताळू?

काय करू?

सध्या माझी द्विधा मनस्थिती झाली आहे. आई माझ्या लहानपणीच गेली. त्यानंतर वडिलांनी माझी सर्व जबाबदारी स्वीकारली. त्यांनी मला लहानाचं मोठं केलं. आईची उणीव कधीही भासू दिली नाही. मी मोठी झाल्यावर आमच्या नात्याच्या परिभाषा बदलल्या. त्यांना माझ्याकडून भावनिक आधार हवा होता. गेल्या वर्षी माझं लग्न झालं. त्यानंतर ते एकटे पडले. मधल्या काळात त्यांना नैराश्यही आलं होतं. एकटेपणा वाटत असल्याची तक्रार ते नेहमीच करत असतात. त्यांनी स्वत:ला वेगवेगळ्या कामांमध्ये आणि छंदांमध्ये गुंतवून घेतलं आहे. मात्र गेल्या महिन्यात त्यांनी एक इच्छा व्यक्त केली. यामुळे आम्हाला खूप धक्का बसला आहे. त्यांना पुन्हा लग्न करायचं आहे. शेजारच्या इमारतीत राहणाऱ्या ६० वर्षीय विधवा महिलेशी त्यांची मैत्री झाली आहे. आता या महिलेसोबत त्यांना लग्न करायचं आहे. आम्हाला या महिलेची फारशी माहिती नाही. या गोष्टी चित्रपट, मालिकांमध्ये बघायला चांगल्या वाटतात. पण प्रत्यक्ष आयुष्यात हे स्वीकारणं खूप जड जातं. यावरून आमच्यात वाद निर्माण झाले आहेत. मी काय करू?



- या सगळ्या परिस्थितीला खूप शांतपणे आणि विचारपूर्वक हाताळणं गरजेचं आहे. चिडचिड आणि त्रागा करून काहीही साधणार नाही. तुला वडिलांचा आनंद महत्त्वाचा वाटतो का समाजातली आपली प्रतिमा... हे आधी ठरव. प्रत्यक्ष आयुष्यात अशा गोष्टी स्वीकारणं अवघड असतं हे अगदी खरं आहे. तू वडिलांशी चर्चा कर. तुझा दृष्टीकोन, विचार समजावून सांग. या सगळ्या परिस्थितीचा वडिलांच्या दृष्टीने विचार कर. त्यांच्या एकटेपणाची अनुभूती घे. उगाचच आततायीपणे निर्णय घेऊन तुमच्या संबंधांमध्ये वितुष्ट येऊ देऊ नकोस. त्यांची बाजू ऐकून घे. यामुळे तू त्यांच्या निर्णयात साथ देऊ शकतील. मुलगी म्हणून त्यांना तुझ्या आधाराची आणि पाठिंब्याची गरज आहे.

## जादू चेक्सची

फॅशन फंडा

फॅशनविश्वात काही डिझाइन्सची नेहमीच चलती असते. ही डिझाइन्स सदाबहार असतात. या डिझाइनचे कपडे कोणत्याही प्रसंगात उठून दिसतात. असंच एक डिझाइन म्हणजे चेक्स. शर्टपासून साडीपर्यंत...प्रत्येक प्रकारच्या पेहरावावर चेक्स शोभून दिसतात. चेक्सच्या साड्याही खूप सुंदर दिसतात. तुम्हीही चेक्स वेगवेगळ्या पद्धतींनी कॅरी करू शकता.

- चेक्स हे फॉर्मल डिझाइन आहे. त्यामुळे ऑफिसमध्ये तुम्ही चेक्सचे कपडे घालू शकता. चेक्समुळे तुम्हाला भारदस्त लूक मिळू शकतो. प्लेन फिटेड पँटवर फिकट रंगाचा चेक्सचा कुर्ता घालू शकता. कॉर्पोरेट विश्वात फिश कट चेक्स स्कर्टवर टाय नॉटवाला प्लेन टॉप घालता येईल. मिटिंगसाठी स्मॉल चेक्स पँट सूट कॅरी करता येईल. ऑफिसला जाताना मोठे बटबटीत चेक्स घालण्यापेक्षा छोट्या चेक्सची निवड करा.
- लग्न किंवा इतर समारंभांमध्ये साडी नेसली जाते. अशा प्रसंगी सिल्कची चेक्सवाली साडी नेसू शकता. ही साडी डीप नेक ब्लाउजसोबत कॅरी करता येईल. लग्नप्रसंगात चेक्सवाली बनारसी सिल्क साडी घालता येईल. साडी नेसायची नसेल तर चेक्स चंपसूट विथ बेल्टनॉट किंवा फ्लेअर्ड चेक्स ट्राउझरवर स्मार्ट टॉप आणि ओव्हरलॅपिंग जॅकेट घालता येईल.
- फिरायला गेल्यावर किंवा कॅज्युअल आउटिंगसाठी जीन्स प्लेन राउंड नेक टीशर्टवर ओपन नेक शर्ट कॅरी करा. थंडीत पूर्ण बाह्यांच्या चेक्स शर्टवर राउंड नेक प्लेन स्वेटर घाला. चेक्स स्टोल आणि कॅपचा ऑप्शनही तुमच्याकडे आहे.



हेअर केअर

### आल्याच्या पॅकने वाढवा केस

मैत्रिणींनो, केसांच्या उत्तम वाढीसाठी आल्याचा वापर करता येईल. आल्याचा वापर करून तुम्ही हेअर पॅक तयार करू शकता. आलं आणि लिंबाचा रस एकत्र करून पॅक तयार करा. आलं आणि लिंबाच्या मिश्रणामुळे स्कॅल्पचा पीएच बॅलन्स राखला जातो. पीएच बॅलन्समुळे केसांची वाढ जलद गतीने होते. दोन चमचे आल्याचा किस घ्या. दोन मोठे चमचे तिळाचं तेल घ्या. अर्धा चमचा लिंबाचा रस घ्या. आल्याचा रस काढून घ्या. त्यात लिंबाचा रस घाला. शेवटी त्यात तिळाचं तेल घाला. हे मिश्रण स्कॅल्पला लावा. साधारण अर्ध्या तासाने शँपूने केस धुवून टाका. आठवड्यातून तीन वेळा हा उपाय केल्यामुळे केस वाढायला मदत होईल.



स्मार्ट शॉपिंग

### असे वाचवा पैसे

आपल्याला विविध मेक अप उत्पादनांची गरज असते. ही उत्पादनं खूप महाग असतात. मेक अप उत्पादनं खरेदी करताना तुम्ही पैशांची बचत करू शकता. आवश्यक तेवढीच मेक अप उत्पादनं खरेदी करा. बाजारात विविध प्रकारची मेक अप उत्पादनं मिळतात. आपण प्रत्येक उत्पादन वापरतोच असं नाही. त्यामुळे उगाच कोणत्याही भूलथापांना बळी पडू नका. काही महिला नियमित मेक अप करत नाहीत. अशा वेळी विविध उत्पादनं खरेदी करण्याऐवजी तुमच्याकडच्या उत्पादनांचा वेगवेगळ्या पद्धतींनी वापर करा. लिपस्टिकचा वापर ब्लशर म्हणून करा. काही मेक अप उत्पादनं घरीच तयार करता येतात. याच्या कार्यशाळाही आयोजित केल्या जातात. अशा कार्यशाळांमध्ये तुम्ही मेक अप उत्पादनं तयार करण्याचे धडे घेऊ शकता.



मेक अप

### जादुई निळा रंग

सध्या मेक अपमध्ये निळ्या रंगाची चलती आहे. तुम्ही निळ्या रंगाचा आयलायनर, आयशॅडोचा वापर करू शकता. निळा आयलायनर लावणं विचित्र वाटत असेल तर काळ्या आणि निळ्या लायनरचं कॉम्बिनेशन करा. हा लूक कोणत्याही पार्टीत छान दिसतो. ब्लू आयशॅडोसोबत स्पार्कलिंग लूकही मिळवता येईल.



किचन टिप्स

### टिकवा फ्राईजचा कुरकुरीतपणा

मुलांना फ्रेंच फ्राईज खूप आवडतात. हे फ्रेंच फ्राईज गरमच छान लागतात. पण बाजारातून आणलेले फ्राईज थंड होऊन जातात. हे फ्राईज पुन्हा गरम केल्यावर थंड पडतात. पण त्यांच्यातला खुसखुशीतपणा टिकवून ठेवायला असेल तर फ्रेंच फ्राईज मायक्रोवेव्हमध्ये गरम करू नका. त्याऐवजी गॅसवरच गरम करा. यामुळे फ्राईज छान कुरकुरीत लागतील फ्रेंच फ्राईज गरम करण्यासाठी एक जाड बुडाची कढई घ्या. गरम झाल्यावर त्यात थोडं तेल घाला. मग फ्राईज घालून तळून घ्या. गरमागरम खा.



## उपराजधानीचे शहर नागपूर
# दोन खुनांनी हादरले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

अंधारातून प्रकाशाकडे नेणारा दिपोत्सवाचा सण एन तोंडावर येऊ ठेपला आहे. शहरातल्या उत्साहाला एकीकडे उधाण आले आहे. तर दुसरीकडे शहराच्या हद्दीतल घडलेल्या दोन खुनांमुळे उपराजधानी गुरुवारी हादरून गेली.

इमामवाडा परिसरातल्या जाट तरोडीत पैशांच्या देवाण घेवाणीतून झालेल्या क्षुल्लक वादातून दोन अल्पवयीन मुलांनी एकाचा दगडाने डोके ठेचून खून केला. तर नवीन कामठी पोलीस हद्दीतल जुन्या वैमनस्यातून एकाने पाना- पेचकच चा वार करत खून केला. नेरी गावाजवळच्या विट भट्टीजवळ ही घटना घडली.

निलेश उर्फ बाळा अंबादरे असे इमामवाडा येथे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. निलेश हा सराईत बदमाश होता. त्याच्यावर इमामवाडा, अजनी, गणेशपेठ, सिताबर्डी पोलीस ठाण्यात १२ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल होते. गणेशपेठ येथे अलिकडेच घडलेल्या एका गुन्ह्यात तो पोलिसांना हवा होता.

गेल्या काही दिवसांपासून त्याचा जाटतरोडी भागातील काही जणांशी पैशांच्या देवाण घेवाणीवरून वाद झाला. याच वादातून बुधवारी रात्री त्याचे दोन अल्पवयीन मुलांशी भांडण झाले. त्यामुळे संतापलेल्या दोन्ही मुलांनी जवळच पडलेल्या दगडाने त्याचे डोके ठेचत निलेशचा खून केला. रात्री ११ च्या सुमारास जाटतरोडीतल्या वस्तीत ही घटना घडली. इमामवाडा पोलिसांनी घटनास्थळ गाठत दोन्ही अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले.

**भिंतीवर आक्षेपार्ह मजकूर**

या घडामोडीत कळमना पोलीसठाणे हद्दीतील सुभान नगरातल्या हनुमान मंदिराच्या बाहेरील भिंतीवर समाजकंटकांनी धार्मिक भावना भडकावणारा आक्षेपार्ह मजकूर रंगाने लिहिल्याने रात्रभर परिसरात तणाव होता. त्याचे पडसाद शहरातल्या अन्य भागांत उमटू नयेत, यासाठी शहर हद्दीतील सर्व पोलीस ठाण्यांना रात्री अलर्ट जारी करण्यात आला होता.

मंदिर परिसरातून जाणाऱ्या काही जणांना सायंकाळी साडेसातच्या सुमारास हा मजकूर दिसल्यानंतर काही जणांनी त्याचे समाजमाध्यमांवर चित्रिकरण व्हायरल केले. त्यामुळे संतप्त जमावाने कळमना पोलिसांना रात्री घेराओ घातला होता. पोलिसांनी तडक घटनास्थळी पोलीस बंदोबस्त तैनात केला.



नवीन कामठी पोलीस ठाणे हद्दीतील नेरी गावालगतच्या वीट भट्टीजवळ जुन्या वैमनस्यातून झालेल्या वादाचे भांडणात रुपांतर होऊन विवेक तांडेकर (२७) याचा देवा वंजारी याने पाना आणि ट्रकचे चाक उघडण्यासाठी लावणाऱ्या अवजाराचे वार करत खून केला. रात्री ११ च्या सुमारास ही घटना घडली. रक्ताच्या थारोळ्यात पडजलेल्या विवेकला पाहून कोणीतरी कामठी पोलिसांना माहिती दिली. रात्री दिडच्या सुमारास घटनास्थळी पोचलेल्या पोलिसांनी विवेकला रुग्णालयात नेले. मात्र तोवर त्याचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी या प्रकरणात देवा वंजारी (४१) याच्यावर गुन्हा दाखल करत त्याला अटक केली आहे. वेवेक आणि देवा या दोघांमध्ये गेल्या काही दिवसांपासून गावातल्या वर्चस्वावरून वाद विकोपाला गेला होता. याच वैमनस्यातून देवाने विवेकला संपवले अशी माहिती मिळत आहे.

# आठवलेंची भूपतीला निवडणूक लढविण्याची ऑफर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

गडचिरोलीत आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षलवाद्यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) मध्ये यावे. त्यांना येत्या निवडणूकीत महत्वाची जबाबदारी दिली जाईल, अशी ऑफर थेट केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिली. नागपुरातील रविभवन येथे गुरूवारी आयोजित पत्रकार परिषदेत रामदास आठवले बोलत होते.

नक्षलवाद्यांच्या त्यागाबाबत सहानुभूती आहे. ही चळवळ सामान्यांच्या न्यायासाठी असल्याचे त्यांचे म्हणने होते. परंतु हिंसक मार्गाने कोणत्याही चळवळीत कुणीही सहभागी होणे आमच्यासह कुणालाही मान्य नाही. नक्षलवाद्यांनी एखादे अन्यायाचे कारण सांगत पोलीस, जमिनदारांना जीवानिशी ठार मारल्यास त्यांच्या ऐवजी दुसरा पोलीस व जमिनदार नियुक्त होतो. त्यामुळे नक्षलवाद्यांना वाटणारा प्रश्न सुटत नाही.

दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बुधवारी माओवाद्यांचा पॉलिट ब्युरो मेंबर तसेच सेंट्रल कमिटी मेंबर मल्लोजूला वेणुगोपाल राव उर्फ सोनू उर्फ भूपती याने त्याच्या ६० सहकाऱ्यांसह गडचिरोली पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले.



मोठ्या संख्येने नक्षलवाद्यांनी केलेले आत्मसमर्पण स्तूत्य आहे. या सगळ्यांनी मुख्य प्रवाहात यावे. या सगळ्यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए)मध्ये प्रवेश करायलाही हरकत नाही. त्यांनी आमच्या पक्षाकडून निवडणूकही लढवावी. नवीन जिवनाची सूरवात चांगली व्हायला हवी, असेही आठवले यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) पक्षाचे डॉ. पूरणचंद्र मेश्राम, राजन वाघमारे, अ‍ॅड. विजय आगलावे, बाळासाहेब घरडे, थूल उपस्थित होते.

नागालॅन्डमध्ये दोन आमदार आहेत. मणिपूरमध्येही पक्षाला अधिकृत मान्यता मिळाली आहे. येत्या लोकसभा निवडणूकीत आमच्या पक्षाला दोन जागा मिळाल्या आणि त्या निवडून आल्यास पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळणे शक्य आहे, असेही आठवले यांनी सांगितले.

**मुस्लिम विरोध ही राष्ट्रवादी भूमिका नाही**

अजीत पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अहिल्यानगरमधील आमदार संग्राम जगताप यांनी नुकतेच दिवाळीत धर्म बघून दुकानातून खरेदी करण्याचे आवाहन नागरिकांना केले होते. त्यावर रामदास आठवले यांनीही भाष्य केले आहे. आठवले म्हणाले, मुस्लिम विरोधी वक्तव्य ही राष्ट्रवादी भूमिका नाही. संग्राम जगताप यांचे वक्तव्य चुकीचे आहे. संविधानात सगळ्याच धर्माला समान अधिकार दिले गेले आहे. त्यात मुस्लिम बांधवांनाही समान अधिकार असल्याचेही आठवले यांनी सांगितले.

## एसटी आरक्षण प्रणाली ठप्प : प्रवाशांना फटका!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :

एसटी बसच्या प्रवाशांना ऐन दिवाळीत नाहक त्रासाला सामोरे जावे लागणार आहे. एसटी आरक्षण प्रणाली ठप्प झाल्याने गावी प्रवास कसा करायचा? असा प्रश्न प्रवाशांना पडला आहे. आरक्षण प्रणाली ठप्प झाल्याने याचा एसटी महामंडळाला देखील फटका बसत असल्याचे दिसत असून या नवीन प्रणालीमुळे कर्मचारीही वैतागले असल्याचे बोलले जात आहे.

एसटी आरक्षण प्रणाली सॉफ्टवेअर आणि कंपनीमध्ये दोन वर्षांपूर्वी महामंडळाने बदल केला होता. त्या माध्यमातून जुन्या आरक्षण प्रणालीच्या जागी नवीन आरक्षण प्रणाली आणण्यात आली. पण नवीन आरक्षण प्रणाली जास्तच किचकट असल्याने ऐन दिवाळी सणाच्या तोंडावरच ही प्रणाली बंद पडली असल्याने गावी जाणाऱ्या प्रवाशांना याचा फटका बसण्याचे शक्यता आहे.

एसटी आरक्षणाच्या नव्या प्रणालीमुळे कर्मचाऱ्यांना मेमो देणे, मशीन इश्यू करणे यासाठी पूर्वी एका गाडीसाठी आरक्षण मेमो प्रिंट काढताना एक कागद लागत होता. आता एकाच मेमोची प्रिंट काढण्यासाठी तीन कागद लागत आहेत. त्यामुळे एसटी महामंडळाचा खर्चही वाढला असल्याचे दिसून येत आहे.

आता जी आरक्षण प्रणाली आहे ती अतिशय अवघड आणि खूप किचकट करण्यात आली असल्याचे काही कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे केवळ प्रवासीच नव्हे तर एसटीचे कर्मचारी देखील या नव्या प्रणालीला वैतागले असल्याचे समजते.

राज्य सरकारकडून एसटी कर्मचाऱ्यांना ६ हजार रुपये सानुग्रह अनुदान अर्थात बोनस देण्यात येणार आहे. तसेच १२ हजार रुपयांची उचल देखील देण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच राज्य सरकारकडून ४८ हप्त्यांमध्ये कर्मचाऱ्यांची २२०० कोटी रुपयांची रक्कम देण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

## निवडणुकीसाठी मनुष्यबळ पुरेसं आहे का?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तयारीत मनुष्यबळाची कमतरता हा मोठा मुद्दा समोर आला आहे. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी या बाबतीत गंभीर इशारा दिला आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आवश्यक कर्मचाऱ्यांची उपलब्धता प्राधान्याने सुनिश्चित करण्याचे आदेश दिले.

आयोगाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत मुख्य सचिव राजेश कुमार, पोलिस आयुक्त देवेन भारती, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज आणि वित्त व गृहविभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. वाघमारे म्हणाले की, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक अधिकारी आणि इतर कर्मचाऱ्यांची पुरेशी उपलब्धता आवश्यक आहे, तसेच आयोगातही काही जागा रिक्त आहेत. त्यांनी पोलिसांना कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी भरारी पथके, चेकपोस्ट, तक्रार निवारण केंद्र यासह पुरेशा बंदोबस्ताची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले.

## सरकारचा जीआर निघाल्यानंतर कुणबीचे
# फक्त २७ दाखले जारी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

२ सप्टेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयाविरोधात राज्यातील वातावरण तापलेले असतानाच राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी एक धक्कादायक आकडेवारी समोर आणली आहे. तायवाडे यांच्या मते, मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत २ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर या कालावधीत फक्त ७३ अर्ज प्राप्त झाले, आणि त्यापैकी फक्त २७ अर्ज मंजूर झाले आहेत. बबनराव तायवाडेंनी सादर केलेल्या आकडेवारीमुळे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि ओबीसी नेत्यांना धक्का बसणार आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईच्या आझाद मैदानात उपोषणाची घोषणा केली होती. या उपोषणात लाखो मराठा कार्यकर्ते सहभागी झाले. २ सप्टेंबर रोजी शासनाने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा जीआर मंजूर केल्यानंतर जरांगेंचे उपोषण सुटले. आता तायवाडे यांनी केलेल्या दाव्यामुळे खळबळ उडाली आहे.

राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी एका वृत्तवाहिनी संवाद साधताना मराठवाड्यात कुणबी जात प्रमाणपत्रासाठी किती अर्ज आले आणि किती प्रमाणपत्रे वितरीत झाली याची आकडेवारी दिली. ते म्हणाले, मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत 2 सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर या कालावधीत फक्त ७३ अर्ज प्राप्त झाले आणि त्यापैकी २७ अर्जच मंजूर झाले. २ तारखेच्या जीआनंतर ३५ दिवसांत मराठवाड्यात फक्त २७ अर्ज मान्य झाले. मराठा समाजाला सरसकट ओबीसी प्रमाणपत्र देण्यात आले नसल्याचा सरकारी पुरावाच तायवाडे यांनी सादर केला.

**बबनराव तायवाडेंनी दिली आकडेवारी**



तायवाडे पुढे म्हणाले, जर सरसकट ओबीसी प्रमाणपत्र मिळाले असते तर रांगा लागल्या असत्या. ओबीसी नेत्यांनी अभ्यास करुन वक्तव्य करावे. बेजबाबदारपणे वक्तव्य करु नये. ओबीसी तरुणांनी केलेल्या आत्महत्यांसाठी आरक्षण संपले म्हणणारे जबाबदार असल्याचा आरोप तायवाडे यांनी केला.

हैदराबाद गॅझेटच्या माध्यमातून कुणबी जात प्रमाणपत्राचे वाटप सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, तर सातारा गॅझेटवरही लवकरच निर्णय अपेक्षित आहे. या जीआरवर मंत्री छगन भुजबळ, विजय वडेट्टीवार आणि इतर नेत्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती.

## तू बोल ना नावाने आता मनाचे श्लोक प्रेक्षकांच्या भेटीला!

लोकरंजन



मृण्मयी देशपांडे लिखित आणि दिग्दर्शित चित्रपट तू बोल ना हा चित्रपट आता नव्या नावानं, नव्या उत्साहात पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येण्यास सज्ज झाला आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर हा चित्रपट येत्या गुरुवारी, १६ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित झाला. याआधी या चित्रपटाचे नाव मनाचे श्लोक असं होतं. सेन्सॉर बोर्ड आणि न्यायालयाने चित्रपटाच्या प्रदर्शनाला परवानगी दिल्यानंतरही काही संघटनांच्या वतीने चित्रपटाचं प्रदर्शन थांबवण्याचा प्रयत्न केला गेला.

या सगळ्या गोंधळानंतर निर्मात्यांनी प्रेक्षकांना चित्रपट पाहण्यासाठी कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, थिएटर्स आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होऊ नये, यासाठी नव्या नावासह, नव्या जोमानं चित्रपट पुन्हा सादर करण्याचा निर्णय घेतला आहे.या चित्रपटात मृण्मयी देशपांडे, राहुल पेठे, पुष्कराज चिरपुटकर, सुव्रत जोशी, सिद्धार्थ मेनन, हरीश दुधाडे आणि करण परब अशी तरुणांची तगडी फळी झळकणार आहे.

तसेच लीना भागवत, मंगेश कदम, शुभांगी गोखले आणि उदय टिकेकर हे ज्येष्ठ कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत दिसतील. तू बोल ना हा चित्रपट स्टारलाईट बॉक्स थिएटर्स आणि नितीन वैद्य प्रॉडक्शन्स यांच्या माध्यमातून प्रदर्शित होणार असून, निर्माते श्रेयश जाधव आणि संजय दावरा आहेत.

■ ■ ■



## भूमिका नाटकाच्या शिरपेचात आणखीन एक मानाचा तुरा

प्रेक्षक आणि समीक्षकांच्या पसंतीस उतरलेल्या भूमिका या नाटकाला नुकतंच 'माझा स्पेशल पुरस्कारा' ने सन्मानित करण्यात आले.

या सन्मानानंतर या नाटकाच्या शिरपेचात आणखीन एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. झी २४ तासचा सर्वोत्कृष्ट नाटकाचा पुरस्कार जिगिषा अष्टविनायक निर्मित भूमिका या नाटकाने पटकावला आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार अभिनेत्री निवेदिता सराफ, झी सिनेमाचे बिझनेस हेड बवेश जानवलेकर, निर्माते अजित भुरे यांच्या हस्ते हा सन्मान नुकताच प्रदान करण्यात आला.

भूमिका या नाटकाला मिळणारा हा प्रतिसाद आमच्यासाठी सुखवणारा आहे अशी भावना व्यक्त करत या पुरस्काराबद्दल नाटकाच्या टीमने कृतज्ञता व्यक्त केली. झी २४ तासचे चॅनेल हेड कमलेश सुतार आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे आभार नाटकाचे दिग्दर्शक –चंद्रकांत कुलकर्णी, अभिनेत्री समिधा गुरू, निर्माते श्रीपाद पद्माकर यांनी यावेळी मानले.

भूमिकाह्व घेणं ही आजकाल दुर्मीळ झालेली गोष्ट या नाटकात ठामपणे दाखवली आहे.क्षितीज पटवर्धन यांनी या नाटकाचे लेखन केले असून, चंद्रकांत कुलकर्णी या नाटकाचे दिग्दर्शक आहेत. सचिन खेडेकर, समिधा गुरु, अतुल महाजन, सुयश झुंजूरके, जयश्री जगताप, जाई खांडेकर यांच्या या नाटकात भूमिका आहेत.

■ ■

## दामिनी पुन्हा येतेय प्रेक्षकांच्या भेटीला..

सत्यता शोधण्या, घेऊनी लेखणी, जाहली दामिनी, मूर्त सौदामिनी हे गाणं घराघरांत वाजलं कि, घरातला प्रत्येक जण दूरदर्शनच्या छोट्या पडद्यासमोर हजर व्हायचा आणि 'दामिनी' या मालिकेमध्ये गुंतून जायचा. दूरदर्शन सह्याद्रीवरची पहिली दैनंदिन मालिका 'दामिनी'.. पाच वर्षांचा कालावधी, १५०० एपिसोड्स, अनेक गुणी कलाकार, तंत्रज्ञांचा सहभाग आणिङ्घ प्रेक्षकांचं प्रचंड प्रेम.




'दामिनी' ही मालिका दूरदर्शनच्या छोट्या पडद्यावर सुरू झाली, तेव्हा तिने एक इतिहास घडवला. प्रतीक्षा लोणकर, क्षिती जोग या अभिनेत्रींनी आधी या मालिकेत मुख्य व्यक्तिरेखा साकारल्या. सुबोध भावे आणि क्षिती जोग यांची या मालिकेतील जोडीही गाजली.

आता तीस वर्षांनी, या मालिकेचा दुसरा सीझन नव्या रूपात, नव्या दिमाखात पुन्हा त्याच वाहिनीवरून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दामिनी २ मध्ये किरण पावसे ही साताऱ्याची अभिनेत्री मुख्य व्यक्तिरेखा साकारणार आहे. तिच्यासह पुण्याचा ध्रुव दातार हा अभिनेता नायकाच्या भूमिकेत आहे. १३ ऑक्टोबरपासून, सायंकाळी ७.३० वा. 'दामिनी २.०'.ही मालिका सह्याद्री वाहिनीवर सुरू झाली आहे. ही दामिनी आता नव्या रूपात, नव्या उत्साहात दाखल होणार असली, तरी तिची प्रेरणा, ऊर्जा आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द तीच आहे. आपल्या आजीचा वारसा घेऊनच ही दामिनीही पत्रकारितेच्या नव्या क्षेत्रात लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी सज्ज झाली आहे. ध्रुव दातार हा अभिनेता या मालिकेतून नायकाच्या भूमिकेत झळकत आहे.

■ ■ ■

## क्योंकि सास भी कभी बहू थी सह स्टार प्लसने सुरू केले एक दमदार अभियान #NotJustMoms!



टेलिव्हिजनच्या क्षेत्रात सांस्कृतिक संदर्भ आणि मनोरंजन यांचे मिश्रण करणाऱ्या कल्पना सादर करण्यात स्टार प्लसने लक्षणीय भूमिका बजावली आहे. जनमानसावर प्रभाव टाकणारी अशीच एक मालिका आहे, क्योंकि सास भी कभी बहू थी.

अनेक वर्षांनी ही मालिका टेलिव्हिजनवर परतली आहे आणि समकालीन सामाजिक समस्यांना संबोधित करून परिवर्तनास चालना देण्याचा वारसा चालू ठेवून पुन्हा आपली संबद्धता सिद्ध करत आहे. ह्यक्योंकि सास भी कभी बहू थीङ्घ चा नवीन प्रोमो विचार-प्रवण अभियान #NotJustMoms प्रेक्षकांसमोर घेऊन येतो आणि ही गोष्ट अधोरेखित करतो की, मुलांना सांभाळण्याची जबाबदारी फक्त आईची नसून ती आई-वडील दोघांची संयुक्त जबाबदारी आहे.

हा प्रोमो भारतीय कुटुंबाच्या बदलत्या चेहऱ्या-मोहऱ्याशी सुसंगत अशी चर्चा छेडतो. आजच्या पिढीत जीवनाच्या सर्व पैलूंच्या बाबतीत पालकांची कर्तव्ये दोघे मिळून शेअर करताना दिसतात. पण मग मूल ही केवळ आईचीच जबाबदारी का समजली जाते? या प्रोमोमध्ये असे दैनंदिन क्षण दाखवले आहेत, जेथे मुलांना मूल्य आणि शिस्त शिकवण्याच्या अपेक्षेचे अनुचित ओझे मातांवर टाकले जाते आणि प्रोमोचे समापन एका स्पष्ट संदेशाने केला जातोः मुलांचे पालन पोषण ही सामाईक जबाबदारी आहे.

अलीकडेच योजलेल्या FICCI इव्हेंटमध्ये स्मृती इराणी आणि एकता कपूर यांनी एक दमदार #NotJustMoms प्रोमो सादर केला आणि मुलांच्या पालन-पोषणाबाबत एका भावनिक आणि विचार-प्रवण संवादाला चालना दिली.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## रस्त्यांवरील खड्डयामुळे स्कूल व्हॅन उलटली



■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि.१६ :

शाळेतून विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी स्कूल व्हॅन रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे पुलावरून उलटल्याने सहा ते सात विद्यार्थी जखमी झाले.

कारधा येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विद्यालयातील विद्यार्थ्यांची शाळा सुटल्यानंतर काही विद्यार्थ्यांना घेऊन मारोती ओमनी व्हॅन भंडारा तालुक्यातील मांडवी, माटोरा, खमारी येथील विद्यार्थी सोडण्यासाठी भिलेवाडा सूरेवाडा मार्गाने जात होती. या मार्गावरील पुलाजवळ खड्डयांमुळे गाडी अनियंत्रित होऊन रस्त्याच्या कडेला कोसळली.

यात स्कूलव्हॅन मधील अवेंद्र भोयर, सानिध्या चोपकर, उर्वेश बेदरकर, सानवी बेदरकर, रुद्रानी बेदरकर, गर्ग मेश्राम मेश्राम व गाडीचा चालक उमेश मेश्राम जखमी झाले. नागरिकांनी मदतीला धावून जात विद्यार्थ्यांना गाडी बाहेर काढले. जखमी विद्यार्थ्यांना रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले आहे. यात कोणतेही जीवितहानी झाली नाही.

शासनाच्या परिपत्रकानुसार १६ ते ३१ ऑक्टोबर पर्यंत दिवाळीच्या सुट्टया देण्याचे आदेश आहेत. असे असताना खाजगी शाळा सुरू ठेवण्यात आल्याचे दिसून आले.

## राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षांचा राजीनामा

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि.१६ :

जिल्हापरिषद, पंचायत समित्या आणि नगर परिषदाच्या निवडणुका नजीकच्या काळात लागणार असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) जिल्हा अध्यक्ष रेखा खेडेकर यांनी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसची दोन शकले झाल्यावर शरद पवार गटाच्या जिल्हाध्यक्ष पदी जुन्याजाणत्या नेत्या व चिखलीच्या माजी आमदार रेखा खेडेकर यांची नियुक्ती करण्यात आली होती. मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांच्या अर्धांगिनी असल्याने त्यांना वेगळे वलयं लाभले होते. मात्र जिल्ह्यात लवकसरच स्थानिक स्वराज्य संस्थां निवडणुकीचा रण संग्राम रंगणार असतानाच रेखा खेडेकर यांनी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे.

खेडेकर यांनी आपला राजीनामा प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांना पत्राद्वारे सादर केला असून, त्यात त्यांनी मी बुलढाणा जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा वैयक्तिक कारणांमुळे स्वेच्छेने देत आहे. कृपया तत्काळ स्वीकारावा, अशी विनंती केली आहे. तथापि, त्यांनी राजीनाम्याचे सविस्तर कारण किंवा पुढील राजकीय वाटचाल स्पष्ट केलेली नाही.

दरम्यान, पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी राजीनाम्याच्या वृत्तांला दुजोरा दिला. प्रकृती वा वैयक्तिक कारणामुळे त्यांनी राजीनामा दिला असावा असा अंदाज त्यांनी वर्तविला.

## कुंभमेळा आयोजन
## कामे वेळेत पूर्ण करा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :

राज्यात नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे २०२७-२८ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित करण्यात येत आहे. मोठ्या संख्येने भाविक पर्यटक येणे अपेक्षित असून त्यादृष्टीने कुंभमेळा प्राधिकरणासह संबंधित विभागांनी आयोजनाची सर्व कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्य सचिव राजेश कुमार यांनी दिले.

मुख्य सचिव राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत कुंभमेळा पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला. यावेळी सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

राजेश कुमार म्हणाले, कुंभमेळा आयोजनासाठी सक्षम प्राधिकारी नियुक्त करण्यात आले आहे. यामुळे प्राधिकरणाने प्राधान्याची कामे आणि ती पूर्ण होण्यासाठी लागणारा कालावधी निश्चित करावा. त्यानुसार कामांची प्रशासकीय मान्यता, निविदा आणि कार्यादेश प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. दळणवळण, परिवहन, पाणी पुरवठा, मलनिःसारण, घनकचरा व्यवस्थापन, राहण्याची सोय, आरोग्य व्यवस्था, विद्युत व्यवस्था आदी कामे सर्व संबंधित विभागांनी वेळेत पूर्ण करावीत.


# कार्यालय नगरपरिषद वानाडोंगरी
ता. हिंगणा, जि. नागपुर
E-mail:mcwanadongari2016@gmail.com

जावक क्र. / न.प.वा / स्व. वि. २९३७/२०२५ — दिनांक :- १५/१०/२०२५

**स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी व माझी वसुंधरा ६.० अंतर्गत फटक्यांबाबत जाहीर आवाहन**

वानाडोंगरी शहरातील सर्व फटाके विक्री करणारे व्यावसायिक व फटाके वापर करणारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार, अधिसूचना क्रमांक G.S.R.682 (E) Date. 05/10/1999 अन्वये 125 dB (AI) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री वापर करण्यास मनाई केली आहे. अशा फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाक्यांमध्ये बेरियम सॉफ्ट, लिथीयम, अर्सेनिक, लीड, मर्क्युरी, यासारखे घट असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. या घटकांमुळे विषारी वायु तयार होतात हे वायु प्राणी व वनस्पती या दोघांना घातक आहेत. तसेच जनहित याचिका क्र. १५२/२०१५ मध्ये मा.ना. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाका विक्रेत्यांनी विस्फोटक व अधिनियम १८८४ आणि त्यास अंतर्गत केलेले विस्फोटक नियम २००८ मधील प्रतिबंध व नियम यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करू नयेत. तसेच फटाक्यांची विक्री नगरपरिषदेने निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेवूनच करण्यात यावी.

महाराष्ट्र शासनाने माझी वसुंधरा अभियान ६.० आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२५ अभियानांतर्गत फटाके मुक्त, प्लास्टीक मुक्त, कचरा मुक्त, प्रदुषण मुक्त व पर्यावरणपूरक ग्रीन फेस्टीवल, सण-उत्सव साजरे करण्याचा प्रयत्न करू. सदर अभियानांतर्गत नागरिकांनी फटाक्यांचा वापर टाळावा. प्लास्टीकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करा. सण समारंभामध्ये टाकावू वस्तूंचा व पुनर्वापर करण्यायोग्य वस्तूंचा वापर जास्तीत जास्त करावा. पर्यावरण पुरक, प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करावी. तरी येणारी दिवाळी हरीत व पर्यावरणपूरक दिवाळी म्हणून साजरी करूया. तसेच ही दिवाळी आनंदी व सुरक्षित राहो अशा सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

**वानाडोंगरी शहरातील सर्व नागरिकांना दिवाळीच्या स्वच्छ, स्वस्थ व आनंदमय शुभेच्छा**

मुख्याधिकारी
नगर परिषद वानाडोंगरी

# महासागर वृत्तसागर

नागपूर

■ शुक्रवार, दि. १७, ऑक्टोबर २०२५ ■


## स्वदेशीला प्रोत्साहन देण्यासाठी स्थानिक उत्पादनांचे प्रदर्शन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :
बळकटी देण्यासाठी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुढाकार घेतला आहे. याशिवाय राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी आपल्या भाषणात स्वदेशी वस्तूंवर भर देण्याचे आवाहन केले आहे. याच अनुषंगाने, आता कन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचे राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतिया यांनी स्थानिक उत्पादनांचे प्रदर्शन आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे.

महिन्यात झाशी राणी चौकातील हिंदी मोर येथे स्थानिक उत्पादनांचे प्रदर्शन भरविल्या जाणार असून ७ ते १४ नोव्हेंबर दरम्यान भिलगाव येथे उत्पादनांचे प्रदर्शन राहणार आहे. प्रदर्शनीत दैनंदिन वस्तू, साबण, कपडे धुण्याचे डिटर्जंट, वॉशिंग पावडर, डिटर्जंट, डिश साबण किंवा फरशी साफ करणारे द्रव आदींची विक्री करता येणार आहे. नागरिकांनी आता केवळ उत्पादने खरेदी करावी, असा संदेश यामाध्यमातून दिल्या जाणार आहे. नागपूर शहर व ग्रामीण भागातील स्थानिक उत्पादकांनी या प्रदर्शनात स्टॉल लावण्याचे आवाहन केले आहे. प्रदर्शनीत दैनंदिन वस्तु, साबण, कपडे धुण्याचे डिटर्जंट, वॉशिंग पावडर, डिटर्जंट, डिश साबण किंवा फरशी साफ करणारे द्रव आदींची विक्री करता येणार आहे. नागरिकांनी आता केवळ स्वदेशी खरेदी करावी, असा संदेश या माध्यमातून दिल्या जाणार आहे. अनेक महिला उत्कृष्ट खाद्यपदार्थ तयार येते. अशा सर्व महिलांना प्रदर्शनात आपली उत्पादने प्रदर्शित आणि विक्री करता येईल. बैठकीला राजकुमार गुप्ता, किशोर धाराशिवकर, विनोद गुप्ता, गोविंद पटेल आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राज्य उत्पादन शुल्क नागपूर विभागाची परराज्यातील मद्यावर धडक कारवाई

# ४१ लाखांचा विदेशी मुद्देमाल जप्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :
राज्य उत्पादन शुल्क आयुक्त, राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपआयुक्त गणेश पाटील, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक सुरजकुमार रामोड मार्गदर्शनाखाली 7 ऑक्टोबर रोजी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, जी-विभाग, ई-विभाग व एच विभाग, नागपूर यांनी मध्यप्रदेश निर्मीत व विक्रीस असलेली व महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला एकुण 230 लिटर विदेशी मद्याचा मद्यसाठा व वाहन असा एकूण 16 लाख 13 हजार रुपये किमंतीचा मद्यसाठा जप्त केला.



13 ऑक्टोबर रोजी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अ-विभाग, नागपूर यांनी मध्यप्रदेश, उत्तराखंड निर्मित स्कॉच महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला एकुण 17.11 लिटर स्कॉच मद्यसाठा व वाहन असा एकूण 18 लाख 99 हजार 80 रुपये किमंतीचा मद्यसाठा जप्त केला. तसेच 15 ऑक्टोबर रोजी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ई-विभाग वह-विभाग, नागपूर यांनी मध्यप्रदेश निर्मीत व विक्रीस असलेली व महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला एकूण 146.88 लिटर विदेशी मद्याचा साठा व वहन असा एकूण 6 लाख 5 हजार 824 रुपये किमंतीचा मद्यसाठा जप्त केला असा एकूण 41 लाख 18 हजार 108 रुपये किमंतीचा मध्यप्रदेश व अन्य राज्यात निर्मीत विदेशी मद्यसाठा जप्त करुन कारवाई केली.

या कार्यवाहीमध्ये 4 आरोपीना अटक करण्यात आलेली असून कारवाईमध्ये निरीक्षक शैलेश अजमिरे, विक्रम मोरे, मोहन पाटील, जयेंद्र जठार, आनंद पवार, मंगेश कावळे, दत्तात्रय लाडके, बालाजी चाळणेवार, जितेंद्र पवार, अनिल जूमडे, दुय्यम निरीक्षक व त्यांच्या संपूर्ण पथकाचा समावेश होता. ही कारवाई यापुढेही सुरु ठेवण्यात येणार आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून 2 ते 8 ऑक्टोबर या "दारुबंदी सप्ताह" च्या कालावधीमध्ये अवैध मद्य निर्मिती, विक्री, वाहतूक यांचेवर कारवाई करीता मोहिम राबविण्यात आलेली असून या कालावधीत एकूण 224 गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये एकूण 168 आरोपींना अटक करण्यात आलेली असून एकूण 44 लाख 1 हजार 919 रुपये इतक्या किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीत राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिवाळी व येणाऱ्या सण-उत्सवाच्या कालावधीत परराज्यातून अवैधपणे मद्याची आयात होण्याची शक्यता लक्षात घेता अशा मद्यावर कारवाईकरीता विशेष मोहिमेच आयोजन केले आहे. सध्या महाराष्ट्र राज्यातील विदेशी मद्याच्या किमतीत वाढ झालेली असून त्याकारणास्तव तुलनेने स्वस्त असलेले मद्य परराज्यातून अवैधपणे आयात होण्याची तसेच बनावट दारु निर्मिती करुन त्याची विक्री होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर मद्य हे विषारी व आरोग्यास हानीकारक असू शकते.

अशा मद्याची आयात व विक्री करणे ही बाब महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ नुसार शिक्षा/दंडास पात्र असून अशा व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नागरीकांनी महाराष्ट्र राज्यातील शासनाने प्रदान केलेल्या महा विक्री अनुज्ञप्तीधारकाकडूनच मद्य खरेदी करावे, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

### फसव्या शासन परिपत्रकाची होळी

# सातबारा कोरा करा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :
जळाला रे जळाला, फसवा शासन परिपत्रक जळाला! या घोषणा देत शेतकरी संघटनेने (शरद जोशी विचार मंच) नागपूरच्या व्हेरायटी चौकात गुरुवारी आंदोलन केले. महाराष्ट्र सरकारच्या ९ ऑक्टोबर रोजीच्या फसव्या शासन निर्णयाची होळी करत शेतकऱ्यांनी सरकारविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. या आंदोलनाचे नेतृत्व संघटनेचे नागपूर जिल्हा अध्यक्ष ॲड. श्रीकांत दौलतकर यांनी केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ७ ऑक्टोबर रोजी पत्रकार परिषद घेऊन ३१,६२८ कोटी रुपयांच्या शेतकरी पॅकेजची घोषणा केली होती. मात्र, ही केवळ शाब्दिक मदत असून, प्रत्यक्षात जुनेच पॅकेज नव्या नावाने पुन्हा सादर करण्यात आले, असा आरोप दौलतकर यांनी केला.

या पॅकेजनुसार फक्त २ हेक्टर ऐवजी ३ हेक्टरपर्यंत नुकसानभरपाई देण्याची एकमेव सुधारणा करण्यात आली असून, याआधी जाहीर करण्यात आलेली २२१५ कोटींचीच तुटपुंजी मदत कायम ठेवण्यात आली आहे. त्यामुळे सरकारचा हा निर्णय म्हणजे जुन्या बाटलीत नवी दारू असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

ॲड. दौलतकर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, दिवाळी तोंडावर आली असून देखील अजून एकाही शेतकऱ्याच्या खात्यात मदतीचा रक्कम जमा झालेली नाही. हे सरकार शेतकऱ्यांची फसवणूक करत आहे. निवडणुकीपूर्वी फडणवीस यांनी दिलेले सातबारा कोरा करण्याचे आश्वासन अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे आम्ही सरकारला इशारा देतो की, शेतकऱ्यांचे कर्ज त्वरित माफ करून सातबारा कोरा करा, अन्यथा यापुढे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल आणि मुख्यमंत्र्यांची दिवाळीही साजरी होऊ दिली जाणार नाही.

या आंदोलनात शेतकरी संघटनेचे माजी जिल्हा अध्यक्ष आणि विदर्भवादी नेते अरुण केदार, महिला जिल्हा अध्यक्ष सुधाताई पावडे, नरखेड तालुका अध्यक्ष वसंतराव वैद्य, तसेच मुकेश मासुरकर, सुनील चोखारे, प्रशांत नखाते, नरेश निमजे, सुमित तांदूळकर, विकास गोहाणे, राहुल बनसोड, राज यादव, आनंद निखार आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हे आंदोलन हे फक्त इशारा असून, जर शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लागले नाहीत, तर राज्यभर तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा शेतकरी संघटनेने दिला आहे

## निवडणूक आयोगाचा पुन्हा गोंधळात गोंधळ



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :
मागील काही महिन्यांपासून मत चोरीच्या प्रकरणामुळे निवडणूक आयोग चर्चेत आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मत चोरीचा मुद्दा प्रखरपणे मांडला होता. यानंतर देशाच्या विविध राज्यांमध्ये कशाप्रकारे मत चोरी करण्यात आली यावर सादरीकरणही केले. त्यामुळे निवड आयोगावर आरोप झाले आहे. यानंतर महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्था आणि भविष्यात पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुका होणार आहे. यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे.

मात्र, महाविकास आघाडीला मतदान यादीवर अद्यापही विश्वास नाही. त्यामुळे राज ठाकरे, उद्धव ठाकरे यांच्यासह काही नेत्यांनी नुकतीच राज्य निवडणूक आयोगाची भेट घेतली होती. यावेळी मत चोरी आणि मतदार याद्यांमधील गोंधळावर आरोप करण्यात आले. हा संपूर्ण प्रकार सुरू असतानाच निवडणूक आयोगाचा आणखी एक गोंधळ समोर आला आहे. पदवीधर मतदारसंघासाठी मतदारांची ऑनलाइन नोंदणी सुरू आहे. मात्र, उमेदवारांना नोंदणी करताना अडचणी येत आहेत. नोंदणी करताना एरर येत असून अर्ज सबमीट होत नसल्याची उमेदवारांची ओरड आहे. विभागातील पदवीधर मतदार संघासाठी १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित नव्याने मतदार याद्या तयार करण्याकरिता कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. ३० सप्टेंबर रोजी मतदार नोंदणीची जाहीर सूचना प्रसिद्ध झाली असून ६ नोव्हेंबरपर्यंत याबाबत दावे स्वीकारण्यात येणार आहे. तर अंतिम मतदार यादी ३० डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या विशेष मतदार नोंदणी मोहिमेत नागपूर विभागातील सर्व पदवीधरांनी सहभाग घेवून नोंदणी करावी, असे आवाहन नागपूर विभागाच्या मतदार नोंदणी अधिकारी तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी केले आहे.

## डॉ. गिरीश गांधी यांच्यावरील लेख विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १६ :
डॉ. गिरीश गांधी यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांच्यावर 'सावली' हा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला होता. त्या ग्रंथातील डॉ. अक्षयकुमार काळे यांनी लिहिलेला 'अजातशत्रू' हा लेख राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या बी. कॉम. द्वितीय वर्षासाठी क्षमता वृद्धिंगत अभ्यासक्रमाकरिता (एइसी) मराठी विषयाचे पाठ्यपुस्तक अनुबंध भाग १ (सत्र ३) मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

अर्पित खंडेलवाल यांच्या राघव पब्लिशर्स अँण्ड डिस्ट्रिब्युटर्सने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. डॉ. गणेश चव्हाण, डॉ. अजय कुळकर्णी, डॉ. रामलाल चौधरी, डॉ. मनिषा नागपुरे, डॉ. जगजीवन कोटांगळे या संपादक मंडळाने हे पाठ्यपुस्तक संपादित केले आहे. हे पाठ्यपुस्तक २०२५-२६ वर्षासाठी असून अभ्यासक्रम उन्हाळ्यात झालेल्या बैठकीतच ठरला, मात्र हे पाठ्यपुस्तक अलिकडे प्रकाशित झाल्याचे कळते.



या पाठ्यपुस्तकात गद्य, पद्य, रोजगाराभिमुख मराठी-व्यावहारिक कौशल्ये व व्यावहारिक मराठी असे विभाग आहेत. गद्य विभागात दोन शब्दात दोन संस्कृती हा वि. दा. सावरकरांचा, भारतीय संविधानाची विज्ञाननिष्ठा हा यशवंत मनोहर यांचा, गाडगेबाबांचे रचनात्मक कार्य हा सतीश तराळ यांचा आणि अजातशत्रू हा डॉ. गिरीश गांधी यांच्या कार्यावरील डॉ. अक्षयकुमार काळे यांचा लेख समाविष्ट करण्यात आला आहे. पद्य विभागात समर्थ रामदास, केशवसुत, कुसुमाग्रज आणि भुजंग मेश्राम यांचे काव्य आहे. रोजगाराभिमुख मराठी विभागामध्ये डॉ. आनंद काटीकर, प्रा. वैशाली कार्लेकर, डॉ. उज्वल जोगळेकर यांचे लेख आहेत. व्यावहारिक मराठी विभागामध्ये डॉ. नंदकुमार मोरे यांचा लेख आणि वाक्प्रचार व म्हणी आहेत.

डॉ. गिरीश गांधी म्हणजे विदर्भातील सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळीचे अध्वर्यु, त्यांचे सातत्याने सुरू असलेले संस्कृती संवर्धनाचे कार्य विद्यार्थ्यांना माहिती व्हावे, या उद्देशाने डॉ. अक्षयकुमार काळे यांचा 'अजातशत्रू' हा लेख अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे.

**डॉ. अजय कुळकर्णी, वाणिज्य भाषा अभ्यास मंडळ सदस्य**

ललित गद्य हा मराठी साहित्यातील मुख्य वाङ्‌मय प्रकार असून व्यक्तिचित्र हा त्यातील उपप्रकार आहे. 'अजातशत्रू' हा लेख डॉ. गिरीश गांधी यांचे व्यक्तिचित्र असून त्यांच्या व्यापक मैत्रभावाचे चित्रण करण्याच्या दृष्टीने लिहिलेला ललित लेख आहे. तो अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आल्यामुळे ललित गद्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना ललित गद्याच्या अभिव्यक्ती वैशिष्ट्यांचे स्वरूप अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता येईल.

**डॉ. अक्षयकुमार काळे**
**अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष**

## आंतरराष्ट्रीय गोल्फ लीगमध्ये शिव अग्रवाल यांनी केले भारताचे प्रतिनिधित्व

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :
प्रसिद्ध जर्मन कार उत्पादक कंपनी मर्सिडीज-बेंझने आयोजित केलेल्या या आंतरराष्ट्रीय गोल्फ लीगमध्ये ६० वेगवेगळ्या देशांतील ६०,००० गोल्फपटूंनी भाग घेतला. त्यापैकी ६० देशांतील १८० खेळाडूंनी त्यांचे वैयक्तिक राष्ट्रीय अंतिम फेरी जिंकली आणि जर्मनीतील ब्लॅक फॉरेस्ट येथील ओच्सबर्गोफ गोल्फ अँड कंट्री क्लब येथे झालेल्या जागतिक अंतिम फेरीत प्रवेश केला. नागपूरमधील एका प्रसिद्ध औषध उत्पादक कंपनीचे संचालक शिव अग्रवाल यांनी पुण्यातील राष्ट्रीय अंतिम फेरी जिंकल्यानंतर भारताचे प्रतिनिधित्व केले.

वर्ल्ड फायनलमध्ये ६० देशांतील अंतिम फेरीतील खेळाडूंना पराभूत करून ऐतिहासिक विजय मिळवल्याबद्दल शिव अग्रवाल यांनी टीम इंडियाचे मनापासून अभिनंदन केले. गेल्या २४ वर्षांत भारतासाठी ही एक उल्लेखनीय कामगिरी आहे आणि गोल्फमध्ये भारत आणि नागपूरसाठी अभिमानाचा क्षण आहे.

## बांधकामावरून साहित्य लंपास

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :
नवीन बांधकामाच्या ठिकाणाहून 1 लाख 66 हजाराचे साहित्य चोरून नेल्याप्रकरणी सदर पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. शेवटचा बसथांबा, जयताळा येथे राहणारे आशिष रामेश्वर नितनवरे (35) हे सेन्ट्रोक कंपनीत इंजीनियर म्हणून कार्यरत आहेत. कंपनीच्या वतीने सदर हद्दीत कामठी मार्गावरील रियान कार्पोरेटजवळ नवीन बांधकाम सुरू आहे. 7 ते 10 ऑक्टोबर दरम्यान नितनवरे यांनी बांधकामासाठी लागणारे साहित्य आणून ठेवले होते. त्यापैकी 441 किलो कॉपर तार, वायरचे 6 क्वॉईल असा 1 लाख 66 हजाराचा माल चोरून नेला.

## सी.पी.अँड बेरारमध्ये एमबीएच्या नव्या बॅचचा स्वागत समारोह

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :
सी. पी. अँड बेरार ई. एस. कॉलेज, रवीनगर येथील बिझनेस मॅनेजमेंट विभागामध्ये 2025-2027 बॅचच्या एमबीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारोह पार पडला. कॉलेजच्या हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात समन्वयक एस. डी. भावे यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. विभागाचे टीपीओ डॉ.आशिष लिंगे यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास आणि प्रामाणिकपणासह आपले कौशल्य कसे वाढवता येईल, याबाबत मार्गदर्शन केले.

## वीजबिलात बचत करण्याची सुवर्णसंधी

### नागपूर परिमंडलातील ग्राहकांना 3 महिन्यांत ७3 लाखांची सवलत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :
महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने वीज ग्राहकांना दिवसा वापरल्या जाणाऱ्या विजेवर प्रति युनिट 80 पैशांची सवलत जाहीर केली आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी ग्राहकाला फक्त टाइम ऑफ डे (टीओडी) मीटर बसवून घ्यावा लागेल. नागपूर परिमंडलात, आतापर्यंत 3 लाख 54 हजार 429 ग्राहकांनी टीओडी मीटरचा वापर सुरू केला आहे आणि त्यांना जुलै ते सप्टेबर या तीन महिन्यात तब्बल 73 लाख 12 हजार 186 रुपयांची सवलत मिळाली आहे.

यात नागपूर जिल्ह्यातील ग्राहकांना 65 लाख 82 हजार 711 तर वर्धा जिल्ह्यातील ग्राहकांना 7 लाख 29 हजार रुपयांची सवलत मिळाली आहे. त्यामुळे ज्या ग्राहकांनी हे मीटर लावले आहेत, त्यांचे वीजबिल कमी येण्यास मोठी मदत झाली आहे.

महावितरणच्या नागपूर परिमंडलात टीओडी मीटरचा वापर करून वीजबिलात सवलत घेणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. जुलै महिन्यात नागपूर जिल्ह्यातील 88 हजार 737 ग्राहकांना 7 लाख 13 हजार 825, ऑगस्ट महिन्यात 1 लाख 21 हजार 745 ग्राहकांना 22 लाख 77 हजार 70 तर सप्टेंबर महिन्यात 2 लाख 18




हजार 211 ग्राहकांना 35 लाख 91 हजार 815 रुपयांची सवलत मिळाली आहे. तर, वर्धा जिल्ह्यातील जुलै महिन्यात 11 हजार 176 ग्राहकांना 69 हजार 790, ऑगस्ट महिन्यात 9 हजार 153 ग्राहकांना 1 लाख 7 हजार 872 तर सप्टेंबर महिन्यात 35 हजार 844 ग्राहकांना 5 लाख 51 हजार 872 रुपयांची सवलत मिळाली आहे. महावितरणकडून सर्वत्र हे मीटर लावण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरु असून बिलींग सायकलप्रमाणे टीओडी वीजदराची सवलत मिळविणा-या ग्राहकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

टीओडी मीटरमुळे ग्राहकांना त्यांच्या वापराप्रमाणे अचूक वीजबिल मिळत आहे. यामुळे सरासरी वीज बिल आणि सदोष मीटरमुळे येणाऱ्या तक्रारींमध्ये मोठी घट झाली आहे. वापराएवढेच अचूक बिल देणाऱ्या या स्मार्ट टीओडी मीटरसाठी नागपूर परिमंडलात 654 ग्राहकांनी स्वतःहून महावितरणकडे मागणी केली आहे. यात नागपूर जिल्ह्यातील 463 तर वर्धा जिल्ह्यातील 91 ग्राहकांचा समावेश आहे.

महावितरणचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी माहिती दिली की, सकाळी 9 ते सायंकाळी 5 या वेळेत वीज वापरल्यास चालू आर्थिक वर्षात प्रति युनिट 80 पैसे सवलत मिळत आहे आणि टप्प्याटप्प्याने ही सवलत 1 रुपयापर्यंत वाढणार आहे. यामुळे ग्राहकाच्या वीजबिलात थेट मोठी बचत होणार आहे.

महावितरण हे टीओडी मीटर ग्राहकांना पूर्णपणे मोफत बसवून देत आहे. ग्राहकांवर कोणताही आर्थिक भार येणार नाही. हे मीटर अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असल्याने त्याचे मासिक रीडिंग आपोआप घेतले जाते, ज्यामुळे मानवी हस्तक्षेपाची गरज राहत नाही आणि वेळेत बिल मिळते.

वीजबिलात बचत आणि अचूक बिलिंगच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमात ग्राहकांनी महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले आहे.

## बुलेटमध्ये ३ फूट लांबीचा तस्कर साप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :
पदमावती नगर रहिवासी शुभम वनकर यांची बुलेट गाड़ी कंपाउंड मध्ये उभी होती, दुपारी 12 वाजता घराबाहेर जाण्यासाठी गाड़ी जवळ जाताच गाड़ीत साप जाताना दिसला, ही माहिती "हेल्प फॉर ॲनिमल वेलफेअर असोशिएशन नागपूर" चे सर्पमित्र आशिष राहेकवाड, सचिन झोड़े यांना देण्यात आली, सर्पमित्रांनी घटनास्थळ गाठले, गाड़ीची संपूर्ण पाहनी केली असता साप कुठे लपला, याची खात्री होत नव्हती, अखेर साप बुलेट च्या सीट खाली दिसला, हा साप तस्कर जातीचा असुन त्याची लांबी 3 फूट होती, हा साप बिन विषारी असतो, सापाचा सकुशल रेस्क्यू करुन निसर्गमुक्त करण्यात आले.



तस्कर सापाला वन्यजीव संरक्षण अधिनियम 2022 अनुसार शेड्यूल 2 अंतर्गत विशेष संरक्षण प्राप्त आहे. हा साप मुख्यता रात्रिच्या सुमारास बाहेर पड़तो, क्वचितच दिवसा सुध्दा आढळतो, हया सापाचे मुख्य खाद्य उन्दीर, पाली, सरडे, बेडूक आहे. हया सापाचे शरीर हलक्या रंगाचे असते ज्यावर काळे आणि पांढरे रंगाचे पॅटर्न असते, पुढच्या अर्ध्या भागावर चेकरबोर्डसारखे ठिपके किंवा पट्टे असतात आणि मागच्या अर्ध्या भागावर गडद उभे पट्टे असतात.

मागील काही दिवसांपासून ग्रामीण व शहरी भागात कार, किचन, शू स्टँड, बेसिन मध्ये साप आढळून आले आहेत. पण नागरिकांच्या सतर्कतेने कोणतीही जीवित हानी घडली नाही.

## श्रीसिद्धिविनायक पब्लिसिटीची दिवाळी पहाट

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १६ :
दीपावलीच्या शुभ मुहूर्तावर श्रीसिद्धिविनायक पब्लिसिटीतर्फे दोन सुरेल दिवाळी पहाट कार्यक्रमांचे येत्या, 18 व 19 ऑक्टोबर रोजी दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन्ही कार्यक्रमाची संकल्पना श्रीसिद्धीविनायक पब्लिसिटीचे संचालक समीर पंडीत यांची आहे.

तात्या टोपे नगर नागरिक मंडळाच्या सहकार्याने शनिवार 18 ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता तात्या टोपे नगर येथील श्री गणेश मंदिर, तात्या टोपे हॉल येथे मंगलदीप प्रभात होईल. या कार्यक्रमात श्रेया खराबे-टांकसाळे, सारंग जोशी आणि निकेता जोशी आपली गायनकला सादर करतील. लायन्स क्लब ऑफ नागपूर हेरिटेज यांच्या सहकार्याने रविवार, 19 ऑक्टोबर रोजी सकाळी 6 वाजता सीताबर्डी येथील अमृत भवन, उत्तर अंबाझरी रोड येथे स्वरदीप हा कार्यक्रम होईल. यात आरती बुरडकर, सारंग जोशी, निकेता जोशी आणि शशिकांत वाघमारे हे कलाकार सुरेल गाणी सादर करतील.

# मानसिक आरोग्य जागरूकता सत्राचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :



मा. इरा हीलिंग्स यांच्या वतीने आणि लायन्स क्लब ऑफ नागपूर मेट्रोपॉलिटन यांच्या संयुक्त विद्यमाने स्नेहांगण दिव्यांग मुलांची शाळा, मातृसेवा संघ, नागपूर येथे मानसिक आरोग्य जागरूकता सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्राचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये, शिक्षकांमध्ये आणि पालकांमध्ये मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करणे तसेच तणावमुक्त, आनंदी आणि सकारात्मक जीवनशैली अंगीकारण्यासाठी सोप्या आणि प्रभावी पद्धती शिकविणे हा होता.

सत्राचे मार्गदर्शन मा. इरा हीलिंग्सच्या संस्थापक व हीलर पियू लाहोरी यांनी केले. त्यांनी मनातील तणाव, चिंता, आत्मविश्वासाची कमतरता आणि नकारात्मक विचार यावर नियंत्रण मिळविण्यासाठी ध्यान, श्वसनक्रिया आणि सकारात्मक विचारसरणीचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमात मा. इरा हीलिंग्सच्या अपूर्वा खोडे आणि सरंग खोडे यांचीही उपस्थिती लाभली. त्यांच्या योगदानामुळे सत्राचे आयोजन अधिक प्रभावी आणि यशस्वी झाले. या कार्यक्रमास इंडियन ऑईलचे प्रतिनिधी रोहित विशेष उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थिनींना आरोग्य व स्वच्छता किट्सचे वितरण केले तसेच सर्व मुलांना चॉकलेट देऊन आनंदाचे क्षण दिले. त्यांच्या सहभागामुळे कार्यक्रमात आनंद, प्रेरणा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका मृणालिनी देशमुख यांनी कार्यक्रमाचे कौतुक करत सांगितले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो, भावनिक स्थैर्य निर्माण होते आणि मानसिक स्वास्थ्य सुधारते. लायन्स क्लब ऑफ नागपूर मेट्रोपॉलिटनच्या सदस्यांसह शिक्षकवर्ग आणि पालकांनी या सत्रात सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांसाठी अल्प ध्यान व शांती सत्र घेण्यात आले, ज्यामुळे वातावरणात शांतता, समाधान आणि आनंदाची अनुभूती निर्माण झाली.

# सेवानिवृत्त शिक्षकांचे समस्यांचा आ. अडबोले यांनी घेतला आढावा

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १६ :



मा शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांचे उपस्थितीत शिक्षणाधिकारी (प्राथ ). मा वित्त अधिकारी. उप मुख्यकार्यकारी अधिकारी वं त्यांचे संबंधित अधिकारी व लिपीक वर्ग,सर्व इएड वं त्यांचे संबंधित लिपिक यावेळी उपस्थित होते.

सर्व संघटना असल्यामुळे आपल्याला वेळ कमी पडला. आपले ४८ से निशिक्षक व जि पदधिकारी मा दगडे सर आपले अध्यक्ष यांचे नेतृत्वात उपस्थित होते. सर्व शिक्षक संघटना सोबतच से. नि शिक्षक महासभेची समस्या निवारण सभा खेडकर सभागृह जिप नागपूर येथे दुपारी १ ते ६ वाजेपावेतो सभा घेतली शिक्षणाधिकारी (प्राथ ). वित्त अधिकारी. उप मुख्यकार्यकारी अधिकारी वं त्यांचे संबंधित अधिकारी व लिपीक वर्ग. सर्व इएड वं त्यांचे संबंधित लिपिक उपस्थित होते. सर्व संघटना असल्यामुळे आपल्याला वेळ कमी पडला. आपले ४८ से निशिक्षक व जि पदधिकारी मा दगडे सर आपले अध्यक्ष यांचे नेतृत्वात उपस्थित होते. सर्व उपस्थित पिडीत से नि शिक्षकांना आपली बाजु मांडण्याची संधी मिळाली. असेच आमदार अडबाले साहेबांचे सहकार्य लाभत राहिल्यास आपल्या समस्या सुटण्यास मदत होईल. एखाद्या पेन्शन अदालती ला मला आवर्जुन बोलवा. पेन्शन अदालतीचे कार्य कसे चालते हे मला बघायचे आहे असे अडबाले या वेळेस आमचेशी बोलतांना सांगितले.

# इंदिरा गांधी कला वाणिज्य महाविद्यालयात आर्थिक साक्षरतेवर व्याख्यान

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. १६ :




इंदिरा गांधी कला वाणिज्य महाविद्यालय, कलमेश्वर, द्वारा कमलाताई वासनिक सभागृहामध्ये "आर्थिक साक्षरता आणि शेअर बाजारातील गुंतवणुकीच्या संधी" या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे होते, या कार्यक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना शेअर बाजाराविषयी शिक्षण देणे आणि त्यांना बाजार संधी आणि आव्हानांसाठी तयार करणे आहे. डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कॉलेज, नागपूरचे प्रा. राहुल खरवडे यांनी शेअर बाजारात सेबीचे महत्त्व आणि भूमिका यावर लक्ष केंद्रित करून अंतर्दृष्टी व्याख्यान दिले. डॉ. कांबळे यांनी विद्यार्थ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली आणि त्यांना शेअर बाजारात भविष्यातील संधींचा शोध घेण्यास प्रोत्साहित केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मलिक जावेद यांनी केले तर, प्रा. मंजुषा कापसे यांनी सूत्रसंचालन केले प्रा. दुर्गे यांनी आभार प्रदर्शन केले.

# क्रिकेट खेळतांना मुलाचा मृत्यु

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. १६ :



भिवापूर शहरातील झाशी राणी चौकातील प्रणय अनिल आगलावे हा राष्ट्रीय विद्यालय भिवापूर येथे ७ व्या वर्गात सेमी इंग्रजी माध्यमात शिक्षण घेत होता. आज सायंकाळच्या सुमारास भिवापूर महाविदयालय परिसर मैदानात मित्रा सोबत चार ते पाच वाजताच्या सुमारास किकेट खेळत असतांना क्रिकेट बाल व बॅट छातीवर लागल्यामुळे तो जागीच मरण पावल्याची घटना घडली. त्यामुळे शहरात एकच हळहळ व्यक्त केली जात आहे.

नुकताच दोन महिन्या पुर्वी त्यांचे वडिल मिरची व्यवसाईक अनिल आगलावे यांचेही निधन झाले होते. वडिला पाठोपाठ मुलाचे अचानक मृत्यु झाल्याने आगलावे कुटूंबिय व मित्रपरिवारात तसेच शहरात एकच हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चयात परिवारात आई व इयत्ता तिसऱ्या वर्गात शिकणार एक भाऊ आहे.

# आक्षेपांची चौकशी करून मतदार यादी दुरुस्त करा

## महाविकास आघाडीचे मुख्याधिकारी यांना निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १६ :

राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार मतदार यादीवर आक्षेप घेण्यासाठी १३ ऑक्टोबर ही मुदत देण्यात आली होती. त्यानुसार विविध पक्षांनी मतदार यादीची पडताळणी केली असता, वाडी शहरातील प्रभाग क्रमांक १ ते १३ मधील प्रारूप मतदार यादी भौगोलिक नकाशानुसार कुठेही बसत नाही. तसेच प्रभागीय मतदार यादीचा ताळमेळ दिसून येत नाही. एकाच कुटुंबातील सदस्यांची नावे वेगवेगळ्या प्रभागात आहेत, तसेच एकाच व्यक्तीचे नाव त्याच प्रभागात २ ते ३ वेळआलेले आहे. शिवाय, मृत मतदारांची नावे यादीतून कमी करण्यात आलेली नाहीत. यासंदर्भात घेण्यात आलेल्या आक्षेपांची चौकशी करून मतदार यादीमध्ये दुरुस्ती करण्यात यावी, या मागणीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी नगर परिषद वाडी यांना महाविकास आघाडीतर्फे निवेदन देण्यात आले. यावेळी यावेळी माजी नगराध्यक्ष प्रेम झाडे, शिवसेना हिंगणा विधानसभा संघटन प्रमुख संतोष केचे, युवासेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य तथा माजी बांधकाम सभापती हर्षल काकडे, माजी नगरसेवक श्याम मंडपे, काँग्रेसचे नागपूर तालुका अध्यक्ष प्रकाश कोकाटे, काँग्रेसचे जिल्हा महासचिव अनिल पाटील,शिवसेना उपजिल्हाप्रमुख मधू माणके पाटील,राष्ट्रवादी काँग्रेसचे वाडी शहर अध्यक्ष वसंतराव इखनकर, शिवसेना तालुकाप्रमुख रूपेश झाडे, युवासेना जिल्हा समन्वयक विजय मिश्रा, काँग्रेसचे वाडी शहर अध्यक्ष शैलेश थोराणे, युवासेना उपजिल्हाप्रमुख अखिल पोहनकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे वाडी शहर कार्याध्यक्ष दिनेश उईके, माजी सरपंच अशोक माने, माजी सरपंच भीमराव लोखंडे, योगेश कुमकुमवार उपस्थित होते.

## जीवन मुंगले यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य अनुकरणीय

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. १६ :

पारशिवनी तालुक्यातील प्रगतशील समाजसेवक जीवन मुंगले हे शिक्षण क्षेत्राशी घट्ट जोडलेले असून त्यांच्या माध्यमातून तीन महाविद्यालये संचालित आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शहरी विद्यार्थ्यांप्रमाणे प्रगती करावी, या हेतूने ते सतत गरजवंत विद्यार्थ्यांना सहकार्य करत असतात. त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून जीवन मुंगले व मित्र परिवारातर्फे अलीकडेच टेकाळे, खंडाळा, गवहिवरा खेडी, बोरी, राणी बोरडा, साटक, वराडा, वाघोली व निलज या गावांतील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय बॅग, बूट व साहित्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. या कार्यक्रमाला पंचायत समिती सदस्य नरेश मेश्राम, युवा कार्यकर्ते अमोल देऊळकर तसेच स्थानिक सरपंच व नागरिक उपस्थित होते. त्याचबरोबर, मराठवाड्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी जीवन मुंगले यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी 51,000 चा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला. शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी यापूर्वी अदानी पॉवर प्रकल्पाच्या हाय टेन्शन लाईनविरोधातही आंदोलन करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला होता. समाजकार्यातील सातत्य, शैक्षणिक विकासासाठीची तळमळ आणि शेतकऱ्यांबद्दलची आत्मीयता यामुळे जीवन मुंगले हे आज अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.

# खडगाव ग्रा.पं. व दत्ता मेघे आयुर्वेद तर्फे आरोग्य शिबिर

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १६ :




खडगाव ग्रामपंचायत आणि दत्ता मेघे आयुर्वेद यांच्या संयुक्त सहकार्याने आरोग्य शिबिराचे आयोजन बुधवार१५ ऑक्टोबर रोजी करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात धन्वंतरी देवतेची पूजन करुन करण्यात आली.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच देवराव कडू तर प्रमुख पाहूणे म्हणून उपसरपंच किशोर सरोदे, उपप्राचार्य डॉ. मोहन राऊत, डॉ. संतोष पुसदकर, डॉ. गभणे, डॉ. करोटकर उपस्थित होते. आयुर्वेदाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व स्पष्ट करून प्रत्येकाने आपल्या घरात किमान एक आयुर्वेदिक झाड लावावे, असे प्रतिपादन सरपंच देवराव कडू यांनी केले. प्रास्ताविक उपसरपंच किशोर सरोदे यांनी केले.

शिबिरामध्ये एकूण ८० नागरिकांची आरोग्य तपासणी, बीपी व शुगर चाचणी करण्यात आली. डॉ. संतोष पुसदकर यांनी ५५ रुग्णांवर विद्ध कर्म उपचार केले. यामध्ये काही रुग्ण जे चालू शकत नव्हते ते उपचारानंतर चालू लागले, अशी माहिती देण्यात आली. सर्व रुग्णांना मोफत औषधे व समुपदेशन सेवा पुरविण्यात आली. विशेषतः वातव्याधी व संधिवातग्रस्त रुग्णांवर मोफत उपचार व मार्गदर्शन करण्यात आले. प्रास्ताविक उपसरपंच किशोर सरोदे यांनी तर तर संचालन व आभार प्रदर्शन सरफराज बराडे यांनी केले.

यावेळी ग्रा.पं. सदस्य भोजराज मांडवगडे , शैलेश कडू, किशोर मांडवगडे, सरला कडू, पायल गणवीर, शितल उइके, स्मिता गणवीर, अर्चना मांडवगडे तसेच गावातील नागरीक उपस्थित होते.

## दिवाळी पाडवा पहाट संगीतमय कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

पश्चिम नागपूर नागरिक संघ आणि रोटरी क्लब ऑफ नागपूर एलिट यांच्या संयुक्त विद्यमाने सूरमयी दिवाळी पाडवा पहाट या सुमधुर गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम श्रीराम मंदिर, रामनगर येथे बुधवार दिनांक २२ऑक्टोबरला सकाळी ७.०० वाजता आयोजित की करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक सना पंडीत, समीर पंडीत व संच यांचे सादरीकरण होणार आहे.दिवाळी पाडव्याच्या मंगल मुहूर्तावर होणाऱ्या या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



*नागपूर : दिवाळी तीन दिवसांवर येवून ठेवली आहे. सर्वात मोठा सण मानल्या जाणाऱ्या या सणानिमित्त सर्वत्र कपडे, सजावट साहित्य आणि इतर प्रकारची खरेदी करण्यासाठी बाजारात प्रचंड गर्दी होवू लागली आहे. उपराजधानीच्या महाल, सिताबर्डी, आणि शहराच्या सर्वच भागात वाहतुकीची प्रचंड कोंडी होत आहे*

# दादाराव मुळे यांची विशेष कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १६ :



न.प. वानाडोंगरी निवासी सामाजिक कार्यकर्ता दादाराव नारायण मुडे यांची विशेष कार्यकारी अधिकार पदी दुसऱ्यांदा नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्ती बद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व आमदार समीर मेघे यांचे आभार मानले आहेत.

मुळे गेल्या दहा वर्षापासून संजय गांधी निराधार योजना सदस्यपदी नियुक्ती झालेली आहे.त्यांच्या या नियुकी बदल त्यांचे नागपूर जिल्हा महामंत्री संध्या गोतमारे, माजी सरपंच महानंदा पाटील, माजी बांधकाम सभापती आबा काळे ललिता राऊत गजानन झाडे भागवत काळे सुलोचना झाडे नितीन साखरे वाना डोंगरी शहराध्यक्ष राजेंद्र लोहकरे मंडल अध्यक्ष सचिन मेंडजोगे माजी शिक्षण सभापती अर्चना मुडे अनिताताई गुप्ता माजी गटनेते बाळू मोरे आशिष अजमेरे यांनी आणि परिसरातील नागरिकांनी अभिनंदन केले आहे.

# पंकज घाटोळे यांना सावनेर कळमेश्वर विधानसभा मतदारसंघातील सार्वत्रिक निवडणूकीचे सर्व अधिकार



■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. १६ :

सावनेर येथील कामाक्षी सेलिब्रेशन येथे बुधवार लाआम आदमी पार्टीच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत सावनेर कळमेश्वर विधानसभा मतदारसंघातील नगरपरिषद, जिप,पंस व ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूकीतील उमेदवाराचे निवड करणे इत्यादी चे सर्व अधिकार आम आदमी पक्षाचे तालुकाध्यक्ष अध्यक्ष पंकज घाटोळे यांना देण्यात आले असल्याचे ची माहिती महाराष्ट्र संघटन मंत्री भूषण ढाकुलकर यांनी पत्रकार परिषदेत दिली यावेळी प्रदेश सचिव सुनील वडसकर, प्रदेश सचिव शाहीदअली जाफरी, जिल्हाध्यक्ष वृषभ वानखेडे, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश ढोबळे, जिल्हा महासचिव जमुवंत वारकरी, ज्येष्ठ नेते संजय टेंभेकर, तालुका अध्यक्ष पंकज घाटोडे शहराध्यक्ष गजु चौधरी आदी पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच सावनेर नगर परिषदेत नगराध्यक्ष पदासाठी खालील महिलांची नावे चर्चेत असल्याचेही घोषित करण्यात आले. अनीता रमेश धानवले, प्रमिला संजय तेंभेकर, ज्योती कालिदास बुधोलिया, अश्विनी पंकज घाटोडे पक्षाच्या कार्यकारिणीने नमूद केले की, अजून काही नावे प्राप्त होणार असून, सर्व उमेदवारांची सखोल पडताळणी झाल्यानंतर अंतिम यादी लवकरच जाहीर करण्यात येईल. पक्षाने सावनेर शहर आणि परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी खालील महत्त्वाचे ९ मुद्दे जाहीर केले. सावनेरकरांसाठी सोलार प्रकल्प – ज्यामुळे वीज बिलाचा भार मोठ्या प्रमाणात कमी होईल. शाळांचे आधुनिकीकरण – नगर परिषदेच्या सर्व शाळांचे इन्फ्रास्ट्रक्चर आणि खेळाच्या मैदानांचे उन्नतीकरण करून दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यात येईल. पाण्याच्या टाक्यांचे नुतनीकरण – जुन्या टाक्यांचे पुनर्बांधणी व आधुनिक वॉटर फिल्टर प्लांटची स्थापना. स्पर्धा परीक्षार्थींसाठी आधुनिक वाचनालय – संगणक आणि नवीन तंत्रज्ञानासह, तसेच वयोवृद्ध नागरिकांसाठी कादंबरी वाचनासाठी सुविधा. वृद्ध नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र – 60+ वयोगटासाठी आराम व त्यांच्या कौशल्यांचा उपयोग होईल असे प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्यात येईल. युवकांसाठी रोजगार शिबिरे – तसेच बचत गटांच्या उत्पादनांची विक्री होण्यासाठी स्थानिक मॉल स्थापन केला जाईल. नगर परिषदेच्या माध्यमातून नवे कॉम्प्लेक्स व रोजगार निर्मिती उपक्रम सुरू केले जातील. शहरातील रस्ते, नाले, बागा, खेळाचे मैदाने यांचे सौंदर्यीकरण व नुतनीकरण केले जाईल. सावनेरचा सर्वांगीण विकास हा आम आदमी पार्टीचा संकल्प – नागरिकांच्या सहभागातून प्रामाणिक आणि पारदर्शक शासन. या पत्रकार परिषदेत पक्ष पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, आम आदमी पार्टी सावनेरचा विकास आणि पारदर्शक स्थानिक प्रशासन यासाठी कटिबध्द असल्याचे पंकज घाटोडे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

## दुर्गा मंदिरात वसुबारस निमित्त गोमाता पूजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

भारतीय कृषी संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेल्या गोमातेच्या पूजनाचा उत्सव वसुबारस निमित्त प्रताप नगरातील श्री दुर्गा मंदिरात आयोजित करण्यात आला आहे.हा कार्यक्रम उद्या, दिनांक शुक्रवार, १७ ऑक्टोबर,आश्विन वद्य द्वादशीला सकाळी ८.३० वाजता श्री दुर्गा मंदिर, प्रताप नगर येथे होणार आहे.

दीपावली उत्सवाची सुरुवात गोवत्स पूजनाने होते. याच परंपरेचा मान राखत मंदिरात मागील वर्षाप्रमाणे यंदाही मंत्रोच्चारात गोमाता पूजन होणार आहे. परिसरातील सर्व नागरिकांसाठी पूजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.नागरिकांनी या पूजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर विश्वस्त मंडळाकडून करण्यात आले आहे.

# प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेचा मुख्याध्यापकांच्या खिशावर ताण

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १६ :

शाळांमधून इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना देण्यात येत असलेल्या मध्यान्ह भोजनाच्या ' प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेचे' अनुदान मागील चार महिण्यापासून थकीत असल्यामुळे मुख्याध्यापकांची आर्थिक कुचंबणा होत असून त्यामुळे मुख्याध्यापकांमध्ये प्रचंड असंतोष पसरला असल्याचे दिसून येते.

स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खाजगी अनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत शाळेत दररोज मध्यान्ह भोजन दिल्या जाते. योजनेसाठी आवश्यक धान्य व धान्यादी मालाचा पुरवठा शासनामार्फत होत असतो, परंतु इंधन, भाजीपाला व पुरक आहाराचा खर्च मात्र शाळा व्यवस्थापन समिती ला महीना अखेरीस उपलब्ध करून दिल्या जातो.

इयत्ता १ ली ते ५ वी करीता प्रतीविद्यार्थी २.५९ रुपये तर इयत्ता ६ वी ते ८ वी ३.८८ रुपये अनुदान अनुज्ञेय असते. शासनाकडून हा निधी शाळांना उपलब्ध होईपर्यंत हा सर्व खर्च मुख्याध्यापकांना स्वताजवळून करावा लागतो. परंतू मागील जून महीण्यापासून चार महीण्याचे अनुदान थकीत असल्याने या योजनेचा खर्च मुख्याध्यापकांना स्वताच्या खिशातून करावा लागत आहे. त्यामुळे मुख्याध्यापकां कडून संताप व्यक्त होत आहे.

### दिवाळीपुर्वी थकीत अनुदान उपलब्ध व्हावे

चार महीने एखाद्या दैनंदिन खर्चाच्या योजनेचा आर्थीक बोजा मुख्याध्यापकांना सहन करावा लागणे ही बाब मुख्याध्यापकांची आर्थीक कुचंबणा करणारी आहे. मुख्याध्यापकांनी स्वताच्या खिशातून योजनेची अमलबजावणी कशी व का करावी हा प्रश्न आहे. विद्यार्थ्यांच्या भोजनाच्या योजनेचा अनुदान थकीत असणे ही बाब दुर्दैवी व तेवढीच संतापजनक आहे. शासनाने हे थकीत अनुदान दिवाळी पुर्वी तातडीने उपलब्ध करुन द्यावे. अशी मागणी आहे.

**लीलाधर ठाकरे, जिल्हाध्यक्ष**
**महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, नागपूर**

### मागील वर्षी मिळाला होता अग्रीम

मागील वर्षी ३ महीण्याचा अग्रीम निधी शाळा व्यवस्थापन समितीला उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यामुळे यावर्षी सुद्धा अग्रीम उपलब्ध होईल अशी मुख्याध्यापकांची अपेक्षा होती, परंतू अग्रीम तर सोडाच दरमहा खर्चाचा निधी सुद्धा थकीत आहे.

### अंडी गायब....

मागील दोन वर्ष या योजने अंतर्गत आठवड्यातून एक दिवस अंडी अथवा केळी देण्याची तरतूद करण्यात आली होती. यावर्षी मात्र या योजनेतून अंडी/केळी गायब झाल्याचे चित्र आहे.

# हिवरकर कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत स्वच्छता



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १६ :

दत्तवाडीतील हिवरकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात मराठी व समाजशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने आणि राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत स्वच्छता अभियान, वृक्षारोपण व ग्रंथालय भेट या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ( महाप्रज्ञा बुद्धविहार भन्ते ) भदंत महाथेर महाथेरो होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून धम्मकिर्तीनगर राजगृह वाचनालयाचे राजेंद्र कांबळे उपस्थित होते.

कार्यक्रमाला महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रकाश हिवरकर, प्राचार्या डॉ. लता खापरे,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. राजेश्वरी सांगोळकर उपस्थित होते.वृक्षारोपण उपक्रमात माजी विद्यार्थी समृद्धी गणवीर (माजी अध्यक्ष) आणि साक्षी रागीट (माजी सचिव) यांनी सहभाग घेतला. या उपक्रमात क्रातीक धुर्वे या विद्यार्थ्यांनी तीन झाडांची भेट दिली.

ग्रंथालय भेट, स्वच्छता अभियान आणि वृक्षारोपण या सर्व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले, तर अमन गजभिये आणि साहिल आत्राम हे कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक होते.

आभार प्रदर्शन दुर्गा उईके यांनी केले, तर छायाचित्रणाचे कार्य प्रा. निशा पिसे, प्रा. प्राजंली मस्के यांनी पार पाडले.

या उपक्रमात प्रा. शुभांगी बनसोड, प्रा. विद्या साखरे, प्रा. अंकित जगताप, प्रा. प्रतिभा भागवत, प्रा. साक्षी तैले, प्रा. शीतल गोमकर, प्रा. वर्षा बेलोरकर ,प्रा. आतिश गजभे यांसह सर्व प्राध्यापक व विद्यार्थीवर्ग यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

# आरपीएफ नागपूरची सतर्क कारवाई

## रेल्वेतून अवैध दारू तस्करीचा प्रयत्न उधळला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :



ऑपरेशन सतर्क अंतर्गत नागपूर आरपीएफ पोस्टला अवैध दारू तस्करी रोखण्यात महत्त्वपूर्ण यश मिळाले. निरीक्षक, गुप्तचर शाखा नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली आरपीएफ/सीआयबी युनिट आमला पथक मादक पदार्थ व अवैध दारू तस्करीवर नियंत्रणासाठी देखरेख ठेवत होते. या दरम्यान ट्रेन क्रमांक 16032 मध्ये भरतवाडा स्टेशनजवळ तपासणी करताना कोच क्रमांक र-6 मधील बर्थ क्रमांक 71 च्या खाली एक संशयास्पद जड बॅग आढळून आली.

प्रवाशांना विचारपूस केल्यावर एका प्रवाशाने ती बॅग स्वतःची असल्याचे सांगितले. बॅगमध्ये काय आहे असे विचारल्यावर त्याने त्यात दारूच्या बाटल्या असल्याचे सांगितले. तत्काळ आरपीएफ पथकाने ही माहिती नागपूर आरपीएफ अधिकाऱ्यांना कळविली.

ट्रेन नागपूर स्थानकावर सकाळी 10:03 वाजता प्लॅटफॉर्म क्रमांक 2 वर पोहोचल्यावर आरपीएफ नागपूर पथकाने बॅग जप्त करून तपासणी केली. तपासणीदरम्यान बॅगमध्ये ऑल सीझन्स कलेक्टर्स कलेक्शन रिजर्व व्हिस्की या इंग्रजी दारूच्या एकूण 8 बाटल्या (750` च्या 5 व 2000` च्या 3) आढळून आल्या, ज्यांची एकूण किंमत अंदाजे 7,490/- इतकी होती.

आरपीएफ पथकाने प्रवाशी व जप्त केलेली दारू संबंधित विभागाकडे पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी सुपूर्द केली. या प्रकरणी कलम 65(ई) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

आरपीएफ नागपूरची ही तत्पर आणि दक्ष कारवाई रेल्वेत अवैध कृत्ये रोखण्यासाठी त्यांच्या बांधिलकीचे द्योतक आहे. ऑपरेशन सतर्क अंतर्गत आरपीएफ नागपूरकडून नियमित तपासणी, गस्त आणि जनजागृती मोहीम राबवून प्रवाशांच्या सुरक्षेची काळजी घेतली जाते. प्रवाशांनी कोणतीही संशयास्पद हालचाल किंवा वस्तू दिसल्यास तात्काळ आरपीएफ किंवा रेल्वे अधिकाऱ्यांना कळवावे.

# मविआ संयुक्तपणे लढणार वाडी न. प. ची निवडणूक



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १६ :

वाडी नगर परिषदची निवडणूक महाविकास आघाडी संयुक्तपणे लढणार असल्याची घोषणा दत्तवाडीतील शुभम मंगल कार्यालयात बुधवार १५ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या महाविकास आघाडीच्या महत्त्वपूर्ण बैठकीत करण्यात आली. या बैठकीचे अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सचिव तथा माजी नगराध्यक्ष प्रेमनाथ झाडे होते. बैठकीला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) तसेच राष्ट्रीय काँग्रेस पक्ष या तीनही घटकपक्षांचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आघाडीच्या नगरपरिषद निवडणुकीतील उमेदवार निवड, प्रचार धोरण, स्थानिक प्रश्नांवरील भूमिका आणि आपापसातील समन्वय या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकी दरम्यान काही मतभेद आणि स्थानिक पातळीवरील असंतोषाची चर्चा रंगली असली तरी शेवटी सर्व पक्षांनी एकत्र राहून निवडणूक लढविण्याचा आणि भाजपला पराभूत करण्याचा निर्धार व्यक्त केला. महाविकास आघाडी ही विचारांची लढाई लढत आहे. दीड लाख लोकसंख्येच्या वाडीला सर्वच्च स्थानी नेण्यासाठी आपण एकत्र राहून विकासाच्या मागार्चीं निवड करण्याचे आवाहन माजी नगराध्यक्ष प्रेमनाथ झाडे यांनी केले. बैठकीचा शेवट एकमताने ठराव मंजूर करून करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष प्रेम झाडे, शिवसेना हिंगणा विधानसभा संघटन प्रमुख संतोष केचे, युवासेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य तथा माजी बांधकाम सभापती हर्षल काकडे, माजी नगरसेवक श्याम मंडपे, काँग्रेसचे नागपूर तालुका अध्यक्ष प्रकाश कोकाटे, काँग्रेसचे जिल्हा महासचिव अनिल पाटील,शिवसेना उपजिल्हाप्रमुख मधू माणके पाटील,राष्ट्रवादी काँग्रेसचे वाडी शहर अध्यक्ष वसंतराव इखनकर, शिवसेना तालुकाप्रमुख रूपेश झाडे, युवासेना जिल्हा समन्वयक विजय मिश्रा, काँग्रेसचे वाडी शहर अध्यक्ष शैलेश थोराणे, युवासेना उपजिल्हाप्रमुख अखिल पोहनकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे वाडी शहर कार्याध्यक्ष दिनेश उईके, माजी सरपंच अशोक माने, माजी सरपंच भीमराव लोखंडे, योगेश कुमकुमवार आदीसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# अजनी इलेक्ट्रिक लोको शेडने बसविले लोकोमोटिवमध्ये पहिल्यांदाच वॉटरलेस युरिनल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

कर्मचारी सुविधा आणि स्वच्छतेला प्रोत्साहन देण्यासाठी मध्य रेल्वेच्या अजनी इलेक्ट्रिक लोको शेडने लोकोमोटिव क्रमांक 30310 मध्ये वॉटरलेस युरिनल यशस्वीरित्या बसविले आहे. या महिन्यात लोकोमोटिवमधील हार्मोनिक फिल्टर क्यूबिकल नवीनतम मार्गदर्शक तत्त्वे नुसार काढण्यात आले आणि रिकामी जागा कुशलतेने वापरून ही विशेष सुविधा पुरवण्यात आली. यामुळे अजनी शेड मध्य रेल्वेत वर्गाच्या लोकोमोटिवमध्ये वॉटरलेस युरिनल बसविणारा पहिला शेड बनला आहे.



सर्व बदल अत्यंत काळजीपूर्वक आणि अचूकतेने केले गेले, ज्यामुळे लोकोमोटिवच्या कार्यक्षमतेवर आणि विद्युत सुरक्षेवर कोणताही परिणाम झाला नाही. आवश्यक सर्किट बदल पूर्वीच्या क्यूबिकलमधील करंट सेन्सर आणि सर्ज रेसिस्टन्स योग्य ठिकाणी हलवून केले गेले. या सुधारामुळे उपलब्ध जागेचा अधिक चांगला वापर झाला असून, वॉटरलेस डिझाईन स्वीकारल्यामुळे देखभाल कमी झाली आणि संसाधनांचा बचाव झाला.

ही योजना विशेषतः लांब पल्ल्याच्या रेल्वे सेवांमध्ये लोकोमोटिव कर्मचाऱ्यांसाठी सुविधा आणि आराम सुधारण्यास महत्त्वपूर्ण ठरते, जिथे स्वच्छता सुविधा मर्यादित असतात. अजनी शेडने आधीच 46 WAG-9 लोकोमोटिवमध्ये वॉटरलेस युरिनल बसविले आहेत आणि WAP-7 लोकोमोटिवमध्ये ही नवीन स्थापना आणखी एक प्रगतिशील टप्पा ठरली आहे. ही प्रकल्प अजनी इलेक्ट्रिक लोको शेडच्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी, कार्यक्षमतेसाठी आणि रेल्वे देखभाल प्रथांमध्ये नवकल्पना आणण्याच्या सक्रिय दृष्टिकोनाचे प्रतीक आहे.

# आंतर महाविद्यालयीन कथाकथन स्पर्धा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

धरमपेठ शिक्षण संस्थेच्या आर. एस. मुंडले धरमपेठ कला व वाणिज्य महाविद्यालयात आज १६ ऑक्टोबर रोजी भाषा विभागाच्या वतीने आंतर महाविद्यालयीन कथाकथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचा प्रारंभ दीपप्रज्वलनाने झाला. प्रमुख अतिथी व परीक्षक म्हणून रामदेव बाबा महाविद्यालयाच्या प्रा. आरुषी वालगावकर आणि धनवटे महाविद्यालयाच्या प्रा. श्रीया ओक उपस्थित होत्या. स्पर्धेत विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी रस्किन बॉन्ड, ओ. हेन्री, अण्णा भाऊ साठे, सुधा मूर्ती, मुन्शी प्रेमचंद यांच्या कथा सादर केल्या. यातील पुरस्कार विजेते आहेत, प्रथमः सारा वर्गिस (एल.ए.डी. महाविद्यालय), द्वितीयः नेहा पुकाले (गुल्हाने महाविद्यालय),तृतीय (संयुक्त) जीया रामपुरीया (रामदेव बाबा महाविद्यालय) व सजल उके (आंबेडकर महाविद्यालय)स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड, आत्मविश्वास आणि कथाकथनाचे कौशल्य वाढवणे हा होता.

# गांजा ओढणाऱ्या सात जणांना अटक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १६ :

एका बंद खोलीत गांजा ओढणाऱ्या सात जणांना नंदनवन पोलिसांनी अटक करून त्यांच्या ताब्यातून 3 लाख 58 हजाराचा मुद्देमाल जप्त केला. पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंघल यांच्या संकल्पनेतून ऑपरेशन थंडर-एकत्र येऊया, नशामुक्त समाज घडवू या ही मोहीम राबविण्यात येत आहे. मिरे ले आऊट येथील दत्त मंदिरामागे पक्के बांधकाम केलेल्या खोलीत काहीजण गांजा पित आहेत अशी विश्वसनिय माहिती नंदनवन पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिस घटनास्थळी गेले असता बंद खोलीत काहीजण गांजा पित असल्याचे दिसून आले. अंकित शिवदास चौधरी (23) तिरंगा चौक, नेहरूनगर, स्वप्निल सुधाकर कोंगरे (25) नरसाळा, प्रणय सुरेश अंकित सुरेश जैस (34) नेहरूनगर, प्रकाश अंबादास गायकवाड (21) आणि अशोक विनायक पुडकेलवार (66) मिरे ले आऊट यांना ताब्यात घेतले.

# काँग्रेस पक्षाच्या उमेदवारी अर्ज वाटपाला सुरुवात : अश्विन बैस

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १६ :



नगर परिषद, नगर पंचायत तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका २०२५ च्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने उमेदवारी अर्ज वाटपाची प्रक्रिया सुरू केली आहे. नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीच्या गणेशपेठ येथील कार्यालयात या अर्जांचे वितरण सुरू झाले असून, इच्छुक उमेदवारांना सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयात येऊन अर्ज घेण्याचे आवाहन राष्ट्रीय काँग्रेस कमिटीचे नागपूर जिल्हाध्यक्ष अश्विन बैस यांनी केले आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या निवडणुकांसाठी अध्यक्ष पदाचे, प्रभागाचे तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य पदांचे आरक्षण निश्चित झाले असून, पक्षांतर्गत उमेदवारी प्रक्रियेला गती मिळाली आहे. या निवडणुकीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेशाध्यक्षांच्या सुचनेनुसार नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीमार्फत गणेशपेठ येथील कार्यालयात उमेदवारी फॉर्म उपलब्ध करून देण्यात आले आहेत. इच्छुक कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी नियोजित वेळेत कार्यालयात येऊन फॉर्म घेऊन भरावेत, असे आवाहनही करण्यात आले आहे. जिल्हाध्यक्ष अश्विन बैस यांनी सांगितले की, या निवडणुका काँग्रेस पक्षासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी आणि विकासाचा ध्यास घेण्यासाठी योग्य उमेदवारांना पक्षाची उमेदवारी देण्यात येईल. इच्छुकांनी पक्षशिस्त आणि कार्यनिष्ठा लक्षात घेऊन अर्ज करावेत.असे त्यांनी स्पष्ट केले.

# दहा फुटाचा आढळला अजगर



■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. १६ :

जवळी येथे शेतात सोयाबिनची कटाई करीत असतांना दहा फुटाचा अजगर आढळून आला. त्यामुळे शेतमजुरात भितीचे वातावरण तयार झाले.

यावेळी सर्पमित्राला पाचारण करण्यात आले होते. शेतामध्ये मजूर काम करत असताना सुरेंद्र पांडे नामक शेतकऱ्याच्या शेतात अचानक एक हा दहा फुट लांबीचा अजगर आढळून आला. यावेळी सर्पमित्राला पाचारण करण्यात आले. यावेळी योगेश मडावी, सागर हरडे, कुणाल मडावी राकेश परमरे, लोकेश मडवी, रितिक चंदन बावणे हे उपस्थित होते. पकडण्यात आलेल्या अजगराला उमरेड कऱ्हाडला अभयारण्य येथील अधिकाऱ्याच्या हवाली करण्यात येत आहे.

# नरेंद्र तिडके महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवस साजरा



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १६ :

श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, रामटेक येथे डॉ .ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरी करण्यात आली. ग्रंथालय विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांकडून ग्रंथ वाचन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना व मराठी विभागाच्यावतीने या कार्यक्रमाची सुरुवात भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शरद पोकळे हे होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा.संतोप जाधव यांनी केले.

याप्रसंगी डॉ. बाळासाहेब लाड, डॉ. स्वप्निल मनघे,प्रा. कल्याणी बीटकुरे,प्रा. अश्विनी डाखोरे,प्रा. सीमा प्रा.आकाश मोहबिया उपस्थित होते.

# पारंपरिक कला आणि आधुनिक फॅशनचा अद्भुत संगम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

भारतातील अग्रगण्य ज्वेलरी ब्रँड तनिष्कने सणासुदीसाठी नवे आकर्षक कलेक्शन मृगांका सादर केले आहे. या कलेक्शनमध्ये पौराणिक आणि कल्पनारम्य जगातून प्रेरणा घेऊन सोन्यात तरंगते राजवाडे, आकाशीय उद्याने आणि अलौकिक प्राणी साकारले गेले आहेत.

कुंदन, मीनाकारी, थ्रीडी आकृतिबंध आणि जटिल जाळीच्या लेयर्सच्या प्रगत तंत्रांचा वापर करून तयार केलेल्या या दागिन्यांमध्ये पारंपरिक कला आणि आधुनिक फॅशनचा अद्भुत संगम आहे. मृगांका कलेक्शन प्रत्येक परिधान करणाऱ्याला काल्पनिक आणि अलौकिक जगात घेऊन जाते, जिथे मिथक, कलात्मकता आणि सणासुदीच्या आनंदाची जाणीव एकत्रितपणे अनुभवता येते.

या कलेक्शनसाठी माजी मिस वर्ल्ड आणि अभिनेत्री मानुषी छिल्लर यांची निवड करण्यात आली असून, तनिष्कने आधुनिक भारतीय महिलेसाठी सणासुदीच्या दागिन्यांची नवी व्याख्या सादर केली आहे.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ६८ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :




नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. गुरूवार (ता.16) रोजी शोध पथकाने 68 प्रकरणांची नोंद करून 36,300 रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 27 प्रकरणांची नोंद करून 10,800 रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 100/- दंड) या अंतर्गत 2 प्रकरणांची नोंद करून रू.200 चे दंड वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 4प्रकरणांची नोंद करून रू.1,600 चे दंड वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 9 प्रकरणांची नोंद करून 6,500 रुपयांची वसुली करण्यात आली. चिकन सेंटर, मटन विक्रेता, यांनी त्यांचा कचरा रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा, अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000 रुपयांची वसुली करण्यात आली.

सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी कचरा टाकणे/साठवणे या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून १००० रुपयांची वसुली करण्यात आली. वर्कशॉप, गॅरेजेस व इतर दुरूस्तीचे व्यावसायिकाने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी कचरा टाकणे/साठवणे या अंतर्गत 4 प्रकरणांची नोंद करून 4,000 रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी कचरा टाकणे/साठवणे या अंतर्गत 16 प्रकरणांची नोंद करून 3,200 रुपयांची वसुली करण्यात आली.उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 16 प्रकरणांची नोंद करून 3,200 रुपयाचा दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 4 प्रकरणांची नोंद करून रु. 4,000 चे दंड वसूल करण्यात आलेला आहे.सार्वजनिक ठिकाणी ओला किंवा सुका कचरा जाळून उपद्रव निर्माण केल्यामुळे 1 प्रकरणाची नोंद करून रू.5,000 रूपयाची वसुली करण्यात आली. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. तसेच उपद्रव शोध पथकाने पथकाने धरमपेठ झोन अंतर्गत मे.श्रीनाथ क्रिएशन यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यालगत टाकल्याने रु.१०,००० दंड वसूल करण्यात आले. गांधीबाग झोन अंतर्गत आशिष किराणा स्टोअर यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबदल रु. ५,०००/- चे दंड वसूल करण्यात आले.

# मिसाईल मॅन डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना महावितरणचे अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :




महान शास्त्रज्ञ, द्रष्टे लेखक आणि कोट्यवधी तरुणांचे प्रेरणास्त्रोत असलेले माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आज महावितरणने त्यांना विनम्र अभिवादन केले.

भारताच्या तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासासाठी 20 वर्षांचा कृती आराखडा तयार करणाऱ्या आणि मिसाईल मॅन म्हणून जगभर ओळखल्या जाणाऱ्या डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला महावितरणच्या अधिकाऱ्यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. महावितरणच्या नागपूर परिमंडलातील काटोल मार्गावरील 'विद्युत भवन' या प्रशासकीय मुख्यालयात हा आदरांजलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके यांनी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. यावेळी अधीक्षक अभियंता मंगेश वैद्य, कार्यकारी अभियंता विजय तिवारी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, प्रणाली विश्लेषक प्रविण काटोले, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर, वरिष्ठ व्यवस्थापक (मानव संसाधन) सुशील विखार यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी डॉ. कलाम यांच्या कार्याला सलाम केला. डॉ. कलाम यांच्या जीवनमूल्यांचे स्मरण करून त्यांच्या 'स्वप्न बघा आणि ती पूर्ण करा' या संदेशाची आठवण या निमित्ताने करण्यात आली.

# परिणामकारक अभिवाचनातून अजरामर नाट्यकृतींचे स्मरण

## वाचन प्रेरणा दिनानिमित्त स्मरण पुरुषोत्तमाचे वि.सा.संघाचा उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

नागपूरचे भूषण ज्येष्ठ नाटककार स्व. पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या तीनही लोकप्रिय नाटकांतील निवडक प्रवेशांच्या परिणामकारक अभिवाचनाने अनेक वर्षांनंतर प्रत्यक्ष नाट्यकृतींचे स्मरण करून दिले. जिल्हाधिकारी कार्यालय व भाषा संचालनालय आणि विदर्भ साहित्य संघ ग्रंथसहवास यांच्या संयुक्त विद्यमाने माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त विदर्भ साहित्य संघाच्या अमेय दालनात बुधवारी, स्मरण पुरुषोत्तमाचे या दारव्हेकर यांच्या प्रसिद्ध नाटकांमधील निवडक प्रवेशांचे अभिवाचन करण्यात आले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वि.सा. संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयातील अधीक्षक कमलाकर गायकवाड व ज्येष्ठ साहित्यिक प्रकाश एदलाबादकर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

अभिवाचनाचा प्रारंभ वऱ्हाडी मानसं या नाटकाने झाला. त्यातील वऱ्हाडी बोलीची गोडी अभिवाचनात देखील व्यक्त होताना दिसली. त्यानंतर चंद्र नभीचा ढळला व कट्यार काळजात घुसली या नाटकातील संवादाने नाटकातील चित्र उपस्थितांच्या डोळ्यापुढे उभे करून गेले.

नाट्य अभिवाचनानंतर औपचारिक समारंभात प्रमुख वक्ता म्हणून प्रकाश एदलाबादकर यांनी दारव्हेकर मास्तरांच्या आठवणी सांगत, दारव्हेकर मास्तर हे विदर्भाच्या मराठी रंगभूमीला मिळालेले नक्षत्राचे देणे असल्याचे सांगितले, तर कमलाकर गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. शेवटी अध्यक्षीय भाषणात प्रदीप दाते यांनी, पुरुषोत्तम दारव्हेकर जन्मशताब्दीनिमित्त आगामी वर्षभरात विविध कार्यक्रम होणार असल्याचे सांगितले.

या अभिवाचन उपक्रमात प्रसिद्ध नाटककार पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त चंद्र नभीचा ढळला, कट्यार काळजात घुसली, वऱ्हाडी मानसं या तीन प्रसिद्ध नाटकांमधील निवडक प्रवेशांचे अभिवाचन रवींद्र दुरुगकर, डॉ. विवेक अलोणी, विनय मोडक, अभिषेक काणे, अभिलाष भुसारी, कल्याणी गोखले, मेघश्याम बडकस, गौरी सोनटक्के, मंजूषा देव, वृषाली देशपांडे यांनी उत्कृष्ट अभिवाचनातून नाटकातील प्रसंग प्रत्यक्ष रसिकांसमोर उभे केले. अभिवाचनात सहभागी सर्व कलाकारांचा यावेळी सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन आणि आभारप्रदर्शन वृषाली देशपांडे यांनी केले.

# राष्ट्रवादी काँग्रेस नागपूर शहराची जम्बो कार्यकारिणी जाहीर




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नागपूर शहराची जम्बो कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. नागपूर शहराध्यक्ष अनिल अहिरकर व शहर कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर यांच्या नेतृत्वाखाली नव्या कार्यकारिणीत विविध विभागांतील अनुभवी तसेच नव्या उत्साही कार्यकर्त्यांचा समावेश करण्यात आला आहे.

या कार्यकारिणीमुळे पक्ष संघटन अधिक बळकट होईल आणि आगामी निवडणुकांमध्ये पक्ष अधिक प्रभावीपणे काम करू शकेल, असा विश्वास शहराध्यक्ष अहिरकर यांनी व्यक्त केला.

कार्यकारणी खालील प्रमाणे शहर कोषाध्यक्ष वीरेंद्र यादुका विभागीय अध्यक्ष पूर्व नागपूर अध्यक्ष ब्रह्मानंद मस्के, पश्चिम नागपूर अध्यक्ष राजपाल सिंग चौहान, उत्तर नागपूर अध्यक्ष दिनेश रोडगे, दक्षिण नागपूर अध्यक्ष मुकेश रेवतकर, द.पश्चिम नागपूर अध्यक्ष संदीप सावरकर, मध्य नागपूर अध्यक्ष किरण नंदनवार, शहर उपाध्यक्ष राकेश घोसेकर, मोंटी गंडेचा, राजू मिश्रा, राजेश शुक्ला, संतोष भुजाडे, शहर महासचिव, हरविंदर सिंग मुल्ला,प्रवीण पाटील, राजेश समर्थ, नानाजी जांभुळकर, भारत मुधळे, सुशांत पाली, राजेंद्र भोयर, रीतेश लक्केवार, संजय तिवारी, विनय सावलकर, शहर सचिव लक्ष्मीकांत पांडे, सुशांत पाली, ऋषी बोरोटे, महेंद्र देशपांडे, प्रभूदास तायवडे, संजय पाटील, संजय जोशी, निखिल चाफेकर, उमाजी कोहळे, संघटन सचिव अमित भोंगाडे, भरत शर्मा, अविनाश पार्डीकर सुरेंद्र दुधनकर यावेळी राजाभाऊ टाकसाळे, प्रशांत पवार, आभा पांडे, बजरंग सिंग परिहार, तानाजी वनवे, सुनीता येरणे, रमण ठवकर, दिलीप पनकूले, आनंद सिंग, राजेश माटे, जानबा मस्के, विश्वजीत तिवारी आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आशीनगर झोनमधील स्वच्छता निरीक्षक व जमादारांना कारणे दाखवा नोटीस

# अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांचे निर्देश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी आशीनगर झोन अंतर्गत येणाऱ्या प्रभाग २ मधील हजेरी स्थळांना भेटी दिल्यानंतर अनेक सफाई कर्मचारी गैरहजर असल्याचे आढळून आले. तसेच स्वच्छता निरीक्षक व जमादार योग्यरितीने देखरेख करीत नसल्याचे दिसून आले. आशीनगर झोनचे स्वच्छता निरीक्षक प्रफुल्ल रंगारी व स्वच्छता जमादारअनुप रंगारी व मनोज मलिक यांच्यावर कामात कुचराई केल्यावरून कारणे दाखवा नोटीस बजाविले आहे.



शहरातील प्रत्येक झोनमध्ये स्वच्छतेच्या कामाला गती देण्यासाठी मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी गुरुवारी (ता.१६) आशीनगर झोनमधील विविध हजेरी स्थळांना भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

यात कामचुकारपणा केलेल्या स्वच्छता निरीक्षक प्रफुल्ल रंगारी, स्वच्छता जमादार अनुप समुद्रे व मनोज मलिक यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. आशीनगर झोनमधील प्रभाग क्रमांक २ मधील रंगारी यांच्या अखत्यारित असलेल्या हजेरी स्थळावर ३० सफाई कामगार गैरहजर असल्याचे आढळून आले. त्याचप्रमाणे स्वच्छता जमादार असलेल्या अनुप समुद्रे यांच्या अखत्यारितील हजेरी स्थळावर २६ सफाई कर्मचारी गैरहजर असल्याचे आढळून आले. तर जमादार मनोज मलिक यांच्या नियंत्रणातील हजेरी स्थळावर ४ सफाई कर्मचारी कोणतीही सूचना न देता गैरहजर असल्याचे आढळून आले.

या पाहणीनंतर अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी उपायुक्त राजेश भगत यांना या तिन्ही कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याचे निर्देश दिले. यानुसार उपायुक्त राजेश भगत यांनी या तिन्ही कर्मचाऱ्यांवर कामात कुचराई केल्यावरून कारणे दाखवा नोटीस बजवले आहे.

सर्व स्वच्छता निरीक्षक व स्वच्छता जमादारांना कामाची देखरेख योग्यरितीने करण्याच्या सूचना यापूर्वीही देण्यात आल्या होत्या. तरीही कामात कुचराई केल्याचे निदर्शनास आल्यामुळे या तिन्ही कर्मचाऱ्यांना उपायुक्त राजेश भगत यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या संदर्भात पुढील २४ तासात कारणे दाखवा नोटीसचे उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत. २४ तासात उत्तर न मिळाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा नियम (शिस्त व अपील) १९७९ च्या तरतुदीनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे.

# ज्येष्ठ नागरिक कक्षातर्फे वृक्षारोपण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

**एक पेड माँ के नाम उपक्रमात सक्रीय सहभाग**

नागपूर महानगरपालिका ज्येष्ठ नागरिक कक्षाच्या वतीने एक पेड माँ के नाम उपक्रमांतर्गत शनिवार १८ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता ओंकारनगर चौक, मानेवाडा येथे वृक्षारोपण करण्यात येणार आहे. कार्यक्रमात मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. समाज विकास विभागाच्या उपायुक्त डॉ. रंजना लाडे, सामाजिक न्याय विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशनी तेलगोटे यांच्या हस्ते वृक्षारोपण केल्या जाणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी सिनीअर सिटीजन कौन्सिल ऑफ नागपूर डिस्ट्रिकचे मनोहरराव खर्चे राहणार आहेत. अशी माहिती मनपा ज्येष्ठ नागरिक कक्षाचे समन्वयक सुरेश रेवतकर यांनी दिली. शहरातील ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येत उपस्थित राहत वृक्षारोपण कार्यक्रमात सक्रीय सहभाग नोंदवावा.

# अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :



नागपूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांनी गुरुवारी (ता. १६) शहरातील दुर्गानगर येथील हिंदी व मराठी प्राथमिक शाळा तसेच माध्यमिक शाळेला भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या काही प्रश्न विचारून शैक्षणिक प्रगतीबद्दल चाचपणी केली. यावेळी मनपाचे सहायक शिक्षणाधिकारी संजय दिघोरे, शाळा निरीक्षक विजय सोनी आणि शाळेचे शिक्षक कृष्णा उजणे यांच्यासह इतर शिक्षकवृंद उपस्थित होते. वैष्णवी बी. यांनी माध्यमिक विद्यार्थ्यांची परीक्षा सुरु असताना भेट दिली. त्यानंतर दुर्गा नगरच्या बालवाडीला भेट दिली. त्यांनी बालकांना काही प्रश्न विचारले, काही इंग्रजीतील नावे सुद्धा विचारले, त्यानंतर रंगाची नावे, वस्तू आणि फळाचे नावे याबबत माहिती विचारली. विद्यार्थ्यांनी ही बरोबर उत्तरे दिली. विद्यार्थ्यांची उत्तम प्रगती पाहुन अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांनी समाधान व्यक्त केले. या भेटीदरम्यान अतिरिक्त आयुक्तांनी बालवाडीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कृतीयुक्त गाणी आणि गोष्टींच्या सादरीकरणाचे विशेषत्वाने अवलोकन केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या या उपक्रमांचे कौतुक करत असतानाच, त्यांनी शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता आणि प्रशासकीय बाबींसंदर्भात शिक्षकांना काही महत्त्वाच्या सूचनाही दिल्या.

# महिला लोकशाही दिन सोमवारी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

नागपूर, दि.16 : जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्या अनुषंगाने जिल्हास्तरावर उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली 20 ऑक्टोबर रोजी सकाळी 11 वाजता महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. अर्ज विहीत नमुन्यात असावा. तक्रार अर्ज दोन प्रतीत सादर करावा. तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असावे. न्यायप्रविष्ठ प्रकरणे, विहीत नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती जोडलेला अर्ज, सेवा विषयक, आस्थापना विषयक बाबी, तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे नसेल तर अशा प्रकारचे अर्ज महिला लोकशाही दिनासाठी स्वीकृत करण्यात येणार नाही.



*नागपूर : दिवाळी म्हटले की फटाके आलेच. काही शहरांमध्ये फटाके वाजविण्यावर बंदी असली तरी उपराजधानीत तसे काही आदेश आले नाहीत. आतिषबाजीत बच्चे कंपनीला अधिकच रस असतो . दिवाळीनिमित्त शहरात सर्वत्र फटाक्यांची दुकाने सजली असून, यावर्षी रॉकेट, अनार आणि इतर काही फटाक्यांचे नवीन प्रकार दुकानात पाहावयात मिळत आहेत.*

# अपूर्ण भिंतीमुळे नाल्याची दयनीय अवस्था

■ प्रमोद जांभूळकर
नागपूर, दि. १६ :

आशी नगर झोनच्या प्रभाग क्रमांक २ मधील ठवरे कॉलनीजवळील नाल्याचे काम गेल्या वर्षभरापासून अर्धवट अवस्थेत सोडण्यात आले असून, यामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या नाल्याच्या बाजूला भिंत बांधण्याचे काम सुरू करण्यात आले होते, परंतु ते अद्याप पूर्ण न झाल्याने जनावरे व नागरिक घसरून नाल्यात पडण्याचे प्रकार घडत आहेत. विशेषतः रात्री अंधारात अपघात होण्याची शक्यता अधिक आहे.

नाल्यात मोठ्या प्रमाणावर कचरा आणि सांडपाणी साचले आहे. आजूबाजूच्या परिसरात दुर्गंधी व डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर होत आहे. अपूर्ण भिंतीमुळे रस्ता व नाल्यात कधीही जीवघेणा अपघात होण्याचा धोका आहे.





**नागरिकांच्या तक्रारी व मागण्या:**

या समस्येकडे प्रशासनाने वेळोवेळी लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे. अंबरीश रामटेके, शैलेश बोदिले, अनुप राहाटे, विकास कोटांगळे, संदीप चौधरी, कमल मुंघाटे, सतीश जांभूळकर, प्रवीण पाटील, प्रभू गजभिये, हेमराज जांभूळकर, मुकेश भोतमांगे, प्रशांत साखरे, अजय सहारे यांनी नाल्याची अपूर्ण भिंतीचे काम तातडीने पूर्ण करावे. नाल्याभोवती सुरक्षेसाठी लोखंडी जाळी बसवावी.नाल्याची संपूर्ण सफाई करून सांडपाण्याची निचरा व्यवस्था सुधारावी. पयार्याने रस्ता डागडुजी करून सुरक्षित करण्यात यावा. प्रकाशयोजना (स्ट्रीट लाइट्स) लावण्यात यावी या मागण्या केल्या आहेत. ही गंभीर व धोकादायक परिस्थिती महानगरपालिका, स्थानिक नगरसेवक आणि झोनल अधिकाऱ्यांनी गांभीर्याने घेतली पाहिजे. अन्यथा नागरिकांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# अखेर चांपा येथील वन्यजीव बाजार बंद

## हेल्प फॉर ॲनिमल वेलफेअर असोशिएशनच्या प्रयत्नांना यश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

नागपूर पासून 20 कि.मी अंतरावर उमरेड तहसील अंतर्गत येणाऱ्या चांपा गावात वनविभाग कार्यालयासमोर शनिवारी दुपारी 2 वाजता नंतर बाजार भरतो, हया बाजारात उघड्यावर मोठ्या संख्येत वन्यप्राणी घोरपड, तितर, बटेर, जंगली ससे विकायला येतात. वन्यजीव संरक्षण अधिनियम 2022 नूसार शेड्यूल 1 व शेड्यूल 2 अंतर्गत संरक्षित प्रजातीचे घोरपड़, तीतर, बटेर जंगली ससे विकायला येतात. तसेच जंगली डुक्कर देखील विकायला येतात.

या वन्यजीवांचे क्रूर पद्धतिने पाय बांधलेले असतात, हया वन्यजीवांची विक्री झाल्यास त्यांना तेथील चिकन शॉप दुकानदारच कापून देतात. या गंभीर विषयाचा पदार्फाश हेल्प फॉर ॲनिमल वेल्फेअर असोसिएशनने केला आहे. या संस्थेच्या प्रयत्नांना अखेरीस यश येऊन हा बाजार बंद झाला आहे.

हया बाजारात जीवंत जंगली डूक्कर अतिशय क्रूरपने कापले जाते व मांस विक्री होते, तितर, बटेर जंगली ससे, घोरपड़ यांची जीवंत विक्री 500 रु ते 1000 रुपयात होते, तसेच 300- 500 रुपयात जंगली डुकराच्या मासाची विक्री होते, हे सर्व दृश्य उघड्या डोळ्यांनी पाहायला मिळते.



डिमांड केल्यास हरिण, सांबर, मोर, नीलगाय या प्राण्यांचे मांस देखील सहजतेने उपलब्ध होते, हया गंभीर विषयाचा पदार्फाश "हेल्प फॉर ॲनिमल वेलफेअर असोशिएशन नागपूर" चे आशिष खाड़े, विश्वजीत ऊके, स्वप्निल बोधाने, सचिन काकडे, अनिकेत सुरुशे, सचिन झोड़े यांनी केला होता, त्यामुळे मनेका गांधी यांनी देखील हया विषयावर संज्ञान घेतले होते, वनविभाग यंत्रणा अलर्ट झाली, आणि दोन आठवड़े झालेत वन्यजीवांचा बाजार भरला नाही.

उमरेड तहसील मध्ये अनेक झुडपी जंगल, तसेच मोठा जंगलाचा भाग आहे.

हया भागात मोठ्या प्रमाणात बीबट, वाघ, अस्वल, खवले मांजर तसेच इतर असंख्य वन्यप्राणी, वन्यपक्षी आहेत, हया बाजारात वन्यजीव विक्री करणाऱ्या लोकांपासून प्राण्यांना धोका आहे, म्हणून हया प्रकरणात विशेष दखल घेउन वन्यप्राण्यांची विक्री, मांस विक्री करणाऱ्या लोकांची माहिती काढून त्यांच्या घरावर छापेमार कार्यवाही करन्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. वनविभाग समोर हा बाजार सुरु असुन देखील कार्यवाही न करणाऱ्या संबंधित राउंड ऑफिसर, वनकर्मी यांची उच्च स्तरीय चौकशी करुन दोषी सिद्ध झाल्यास निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी, हया प्रकरणाला गंभीरतेने घेउन बाजारात नेहमीसाठी वनविभागाची चौकी प्रस्थापित केली जावी म्हणून हेल्प फॉर ॲनिमल वेलफेअर असोशिएशन चे अध्यक्ष आशिष खाड़े यांनि मुख्यमंत्री, वनमंत्री, प्रधान मुख्य वनसंरक्षक महाराष्ट्र, मुख्य वनसंरक्षक, उपवनसंरक्षक, कलेक्टर यांना निवेदन दिले आहे.

# गटार लाईनचे पाणी वाहत असल्याने नागरिकांना त्रास

■ प्रदीप पौनिकर, नागपूर, दि. १६ :

प्रभाग क्र.५,पोळा मैदान,नवी मंगळवारी बाबूराव निमजे यांच्या घराजवळ ,दिवाळीच्या सणाच्या वेळी घरासमोर गटार लाइनचे पाणी वाहत असल्याने नागरिकांना त्रास होत आहे.

गटार लाइनची दुरुस्ती न केल्याने पाणी रस्त्यावर आणि घरांसमोर येत आहे. गटार लाइनच्या पाण्यामुळे पाण्याबरोबरच विविध आजारांचे जंतू पसरतात, गटार लाइनचे पाणी वाहत असल्याने दुर्गंधी आणि अस्वच्छता निर्माण होत आहे.

गटार लाइनचे पाणी रस्त्यावर आणि घरांमध्ये वाहत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ही समस्या निर्माण झाली आहे.मनपा प्रशासनाने गटार लाइनची त्वरित दुरुस्ती करावी.जेणेकरून पाणी रस्त्यावर येणार नाही. अन्यथा आम आदमी पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल अशा इशारा देण्यात आला.




यावेळी प्रदिप पौनिकर किशन निमजे, विजय नंदनवार, हेमराज कुंभारे, अनिल संभे, नानक धनवानी, आरती दलाल, संदीप साखरे, किशोर मौंदेकर, केतन ठाकूर, दिपक कोदरलीकर, सुनिल गजभिये, दिलीप रामटेककर, राजू दुधे, मनोज फटींग, क्षितिज वंजारी, निलकंड टाकलीकर, हरिहर पराते, चेतन सोनकुसरे, कृष्णा पाठराबे, प्रिती पौनिकर, स्वाती तारवानी, अंशु बिरेवार, अमोल उके, संजू पटले, राजकुमार किटाळीकर, जयघोष कोटांगले, गोविंदा केळवदकर, अरुण गुणारकर, बाबुराव निमजे व आम आदमी पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.